।। ज्ञानमयो भव ।।

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

शिवाजीनगर, पुणे ५.



## गुरुवर्य कै. वि. त्र्यं. ताटके जन्मशताब्दी समारोह स्मृतिग्रंथ

चैतन्याची प्रसन्नमूर्ती । ज्ञानवंत अन् ज्ञानव्रती
दूरदर्शी ध्येयवादी जी । नमितो आम्ही अत्यादरे ।।



व्हाईस प्रेसिडेंट सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते
आदर्श शिक्षक राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारताना गुरुवर्य ताटकेसर



सौ. व गुरुवर्य श्री. वि. त्र्यं. ताटके - १९७१

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे-५

### पदाधिकारी



**पद्मश्री मा. श्री. बाळासाहेब भारदे**
अध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५



**डॉ. गजानन र. एकबोटे**
कार्याध्यक्ष, नियामक मंडळ,
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५

## पदाधिकारी



**डॉ. माधव शं. नामजोशी**
उप-कार्याध्यक्ष, नियामक मंडळ
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५



**श्री. दिलीपसिंह परदेशी**
उप-कार्यवाह,
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५



**प्रा. प्रकाश दीक्षित**
उप-कार्यवाह,
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५



**प्रा. सुरेश तोडकर**
सह-कार्यवाह,
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५

आजीव सदस्य व कर्तबगार कार्यवाह

आणि

मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ चे

मुख्याध्यापक

# गुरुवर्य कै. वि. त्र्यं. ताटके

## जन्मशताब्दी समारोह : २००२ - २००३

# स्मृ ति ग्रं थ

◆ जन्मशताब्दी समारोह समिती ◆

संपादक मंडळ

- डॉ. गजानन र. एकबोटे-अध्यक्ष
- ॲड. बाबासाहेब चव्हाण
- प्रा. प. स. चिरपुटकर
- श्री. व्ही. जे. उर्फ नाना कुलकर्णी
- डॉ. अ. के. पांडे
- प्राचार्य अ. गो. गोसावी
- सौ. सुजाता पंडित
- श्री. दिलीपसिंग परदेशी
- सौ. वर्षा वि. पडाळकर
- सौ. शुभांगी ओगले
- सौ. मृगजा कुलकर्णी
- प्रा. ए. व्ही. रायरीकर
- प्रा. आर. व्ही. कुलकर्णी

● प्रकाशक

डॉ. गजानन रमाकांत एकबोटे

अध्यक्ष, गुरुवर्य कै. वि. त्र्यं. ताटके
जन्मशताब्दी समारोह समिती
कार्याध्यक्ष, नियामक मंडळ
प्रो. ए. सोसायटी, पुणे ५.

● प्रकाशन

दि. २५ जानेवारी २००३

● मुद्रक : आयडियल प्रिंटर्स

शिवाजीनगर, पुणे ५.

या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मनोगत - डॉ. गजानन र. एकबोटे | ३ |
| २. | संपादकीय | ५ |
| ३. | कै. विष्णू त्र्यंबक ताटके - जीवनपट | ८ |
| ४. | आमचे ध्येयवादी, चैतन्यशील ताटके सर - श्री. ग. प्र. प्रधान | १० |
| ५. | आदर्श कुटुंबप्रमुख, समर्थ प्रशिक्षक, सामाजिक श्रेष्ठ पुरुष - डॉ. जयंत विष्णू ताटके | १३ |
| ६. | आठवणीतील गुरुवर्य - मा. श्री. अरुण फिरोदिया | १९ |
| ७. | चिंतन - एका चैतन्यमयी जीवनाचे - डॉ. प्र. ल. गावडे | २१ |
| ८. | सव्यसाची संस्थाचालक - प्रा. प. स. चिरपुटकर | २३ |
| ९. | कर्तृत्वसंपन्न व निगर्वी अध्यापक - श्री. वि. शं. गोखले | २६ |
| १०. | आमचे ताटके सर - डॉ. अ. शं. गोळविलकर | २८ |
| ११. | **A Sage Like Teacher - Prof. V. G. Joshi** | २९ |
| १२. | कृतकृत्यता - सौ. इंदुमती भडभडे | ३१ |
| १३. | संकलित माहिती - सौ. सुजाता पंडित | ३४ |
| १४. | गुरुवर्य ताटके सरांच्या आठवणी - श्री. ना . गो. प्रभुणे | ३८ |
| १५. | ध्येयवादी शिक्षक - डॉ. स्नेहल तावरे | ४० |
| १६. | शिक्षणक्षेत्रातील एक प्रसन्न व कर्तबगार व्यक्तिमत्त्व - श्री. वि. वि. कौजलगीकर | ४२ |
| १७. | स्मृती-गंध - श्रीमती कमल लेले | ४५ |
| १८. | सुवर्णयुगाचे मानकरी - सौ. मनोरमा सी. अभंग | ४६ |
| १९. | गुरुवर्य - सौ. नीला वि. रानडे | ४७ |
| २०. | मला भावलेले ताटके सर - श्रीमती सुधा कुलकर्णी | ४८ |
| २१. | आठवणी कै. ताटके सरांच्या - सौ. निर्मला कुलकर्णी | ४९ |
| २२. | संस्थेची भरारी- ॲड. बाबा चव्हाण | ५० |



डॉ. गजानन र. एकबोटे

# मनोगत

महाराष्ट्र राज्यात खाजगी शिक्षणसंस्थांचे मोठे योगदान आहे. पुणे शहर व परिसर यांमध्ये देखील अशा अनेक शिक्षणसंस्था कार्यरत आहेत. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी ही अशीच नामवंत शिक्षणसंस्था आहे. या शिक्षणसंस्थेची स्थापना मा. गुरुवर्य कै. शंकरराव कानिटकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत १६ मे १९३४ (अक्षयतृतीया) या दिवशी केली. त्या सहकाऱ्यांपैकी गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके हे एक होते.

त्या काळात पुण्यामध्ये काही नावाजलेल्या खाजगी शिक्षणसंस्था कार्यरत होत्या. त्या संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते समाजातील प्रसिद्ध व्यक्ती होत्या. अशा परिस्थितीत पुण्यामध्ये एक नवीन शिक्षणसंस्था स्थापन करणे, तिचा विकास करण्याचे स्वप्न उराशी बाळगणे, हे फार मोठे धाडस होते. काही व्यक्तींनी त्यावेळी कै. कानिटकरांच्या ह्या उपक्रमाची कुचेष्टा केली, उपहासही केला. परंतु प्रचंड आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी व स्वत:च्या कार्याविषयी पूर्णपणे झोकून देण्याची वृत्ती या गुणांमुळे लवकरच प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी ही संस्था नावारुपाला आली.

या संस्थेच्या स्थापनेपासून १९७० सालपर्यंत संस्थेचे काम शालेय स्तरापर्यंत मर्यादित होते. परंतु नंतर येणाऱ्या काळाची पाऊले ओळखून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी महाविद्यालय सुरू करण्याचे ठरविले. गुरुवर्य कै. ताटके यांचे संस्थेचे कार्यवाह या नात्याने मॉडर्न महाविद्यालय स्थापन करण्यात फार मोठे योगदान होते.

गुरुवर्य ताटके गणिताचे एक नामवंत शिक्षक होते. तसेच ते मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ चे अनेक वर्षे मुख्याध्यापक होते. शिवाय प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य व कार्यवाह होते. प्रो. ए. सोसायटी नावारुपाला आणण्यात गुरुवर्य कै. कानिटकर, गुरुवर्य ताटके, गुरुवर्य चाफेकर व इतर गुरुजन व्यक्तींचेअथक परिश्रम, त्याग व तळमळ कारणीभूत आहेत. गुरुवर्य कै. ताटके यांचे जन्मशताब्दीनिमित्त त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे हा स्मृतिग्रंथ काढण्यामागील प्रमुख उद्देश आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या पूर्वस्मृतींना उजाळा देऊन त्यांच्यापासून प्रेरणा मिळविणे आपल्या कार्याचे आत्मपरीक्षण करणे हेही सध्या कार्यरत असलेल्या संस्थाचालकांना या स्मृतीग्रंथामुळे शक्य होणार आहे. निरनिराळ्या वेळी गुरुवर्य ताटके सरांचे वागणे कसे होते, त्यांचे विचार कसे होते याची माहिती घेणे हेही फार महत्त्वाचे वाटते. यामुळे संस्थाचालकांचे व समाजाचे मोठे प्रबोधन होईल असे वाटते.

१९८६ यावर्षी काही तरुण व धडाडीच्या कार्यकर्त्यांनी या संस्थेचे काम करण्याचे ठरविले. संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने तो एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. सध्या या संस्थेच्या अंतर्गत सुमारे ४० शाळा, महाविद्यालये आहेत. त्यामध्ये सुमारे पंचवीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयीन स्तरावर कला, शास्त्र, वाणिज्य, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, अभियांत्रिकी (Engg.), संगणकशास्त्र इ. अनेकविध विद्याशाखांमध्ये शिक्षण देण्याची सोय आहे. येत्या काही वर्षांत अजूनही काही शाळा-महाविद्यालये काढण्याचे व सध्या अस्तित्वात असलेल्या शाळा-महाविद्यालयांचा विकास करण्याचे संस्थेने ठरविले आहे.

१९८७-८८ हे वर्ष गुरुवर्य शंकरराव कानिटकर यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून संस्थेने साजरे केले. यावेळेस त्यांच्या आठवणीवर आधारित 'कानटिकर स्मृतिग्रंथ' संस्थेने प्रकाशित केला होता. त्यावेळी मी संस्थेच्या नियामक मंडळाचा सदस्य होतो. शिवाय त्या स्मृतिग्रंथाच्या संपादक मंडळाचा एक सदस्य होतो.

योगायोग असा आहे, की प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी नावारुपाला आणण्यात ज्यांचा बहुमोल वाटा आहे अशा गुरुवर्य ताटके यांचा 'स्मृतिग्रंथ' प्रकाशित करण्याचे वेळी म्हणजे सध्या मी संस्थेचा कार्याध्यक्ष आहे. गेली आठ वर्षे मी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा कार्याध्यक्ष म्हणून काम करीत आहे. त्याचप्रमाणे मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ चा मी माजी विद्यार्थी आहे.

गुरुवर्य कानिटकर, गुरुवर्य ताटके, गुरुवर्य चाफेकर व इतर गुरुजनांनी जो निष्काम कर्मयोग आचरला, त्याचे फळ म्हणून या संस्थेचा विकास झाला आहे व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी ही संस्था नावारुपाला आली अशी माझी व माझ्या सहकाऱ्यांची धारणा आहे. त्या थोर गुरुजनांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार यापुढेही आमच्या सर्वांच्याकडून शिक्षणक्षेत्रात कार्य होवो, अशी श्रीपरमेश्वर चरणी प्रार्थना करून माझे मनोगत संपवतो.

– डॉ. गजानन र. एकबोटे
M.S., M.N.A.M.S.
कार्याध्यक्ष, नियामक मंडळ
प्रो. ए. सोसायटी, पुणे ५.

# संपादकीय

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ ह्या दोन्ही ठिकाणी कै. वि. त्र्यं. ताटके यांनी बहुमोल काम केले. त्यांचा जन्मशताब्दी समारोह साजरा करण्याचे संस्थेने ठरविले. त्यानिमित्त काही कार्यक्रम आयोजित केले. ही स्मरणिका ही त्या उपक्रमांपैकीच एक आहे. ही स्मरणिका आपल्या हाती देत असताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

८ फेब्रुवारी २००२ हा कै. ताटके सरांचा जन्मशताब्दी दिवस. संस्थेसाठी अखंड परिश्रम केलेल्या एका शिक्षकाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे व त्यांना आदरांजली वाहणे हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून स्मरणिका तयार केली आहे. हे करत असताना संस्थेची गेल्या ६८ वर्षांची वाटचाल पाहणे, त्यामधील महत्त्वपूर्ण गोष्टींची नोंद करणे हेही साध्य झाले आहे. संस्थेच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण घटना असल्यामुळे संस्थेच्या स्थापनेपासून आजमितीपर्यंत ज्या अनेकविध शिक्षण संस्था स्थापन केल्या, त्यांची वाढ केली व ज्या व्यक्तींचा ह्या प्रक्रियेमध्ये सहभाग होता त्यांचा नामनिर्देश होणे आम्हाला अगत्याचे वाटते.

संस्था आणि तिच्या शाखा ह्यांना उज्ज्वल यश मिळवून देण्यात ज्या व्यक्तींचा सहभाग होता, त्यामध्ये कै. ताटके सरांचा मोलाचा वाटा होता. मॉडर्न कॉलेज, पुणे ५ च्या संस्थापक सदस्यांपैकी ते एक होते. अशा संस्था नावारुपाला आणताना व एक अव्वल दर्जाचे शिक्षक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू आजच्या पिढीपुढे ठेवणे हे आम्हाला अतिशय महत्त्वाचे वाटते. विशेषत: एक असामान्य शिक्षक, कुशल संस्थाचालक व सामाजिक गोष्टींमध्ये रस घेणारे व्यक्तिमत्त्व अशा अनेक पैलूंचे ओझरते दर्शन घडविण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

एकविसावे शतक सुरू झाले आहे. शिक्षणसंस्था व विद्यार्थी यांच्यापुढे वेगवेगळी आव्हानेउभी ठाकली आहेत. देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने दूरगामी ठरू शकतील अशा प्रकारची ही आव्हाने आहेत. गेल्या ५०-५५ वर्षांत देशात शिक्षणाची गुणवत्ता मात्र खालावत चालली आहे हे नाकबूल करता येणार नाही. आपला आजचा विद्यार्थी उद्या अतिप्रगत देशांतील विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत कसा टिकू शकेल हा एक चिंतेचा विषय आहे. विशेषत: उदारीकरणामुळे अतिप्रगत देशातील विद्यापीठे व शिक्षणसंस्था आपले हातपाय आपल्या देशात पसरू लागले आहेत. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता जास्तीत जास्त कशी वाढविता येईल ह्यावर आपले सारे लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक होऊन बसले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपल्या बुद्धिमान मुलामुलींच्या गुणवत्तावाढीची विशेष काळजी घेऊन जोपासना केली पाहिजे. हे करीत असताना भारतीय संस्कृतीने घालून ठेवलेल्या थोर आदर्शांचा व मूल्यांचा आपल्या विद्यार्थ्यांना विसरही पडता कामा नये.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली तेव्हाच्या समस्या व आव्हाने वेगळी होती. पण ह्या संस्थेचे संस्थापक कै. शंकररावजी कानिटकर व त्यांचे सहकारी कै. ताटके सर यांनी शिस्त, अखंड परिश्रम, विद्येची आस व आवड आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांबद्दल व पर्यायाने समाजाबद्दल असणारी आस्था ह्या गुणांमुळे प्रचंड काम केले. उत्तमोत्तम विद्यार्थी घडविणे आणि नागरिक म्हणून समाजाला, देशाला देणे हा राष्ट्रसेवेचा एक उत्तम मार्ग आहे असे त्यांनी मानले व त्याप्रमाणे कार्य केले. आजच्या विमनस्क करणाऱ्या परिस्थितीला तोंड देऊन देशाला ऊर्जितावस्था आणावयाची असेल तर प्रत्येकाने आपल्या



कार्यक्षेत्रात तळमळीने व सचोटीने काम करणे हीच देशसेवा आहे. त्यामुळेच कै. कानिटकर, कै. ताटके सर, कै. चाफेकर सर यांच्या गुणांचे स्मरण करणे, त्यांचे विचार आचरणात आणणे हे अगत्याचे झाले. आपल्या विद्यार्थ्यांपुढे कितीही मोठी आव्हाने उभी असली तरी शिस्त, अखंड परिश्रम आणि काही मूल्यांची प्राणपणाने जपणूक केल्यास ती आव्हाने आपले विद्यार्थी समर्थपणे पेलू शकतील असा आम्हाला विश्वास वाटतो. ह्या विश्वासापोटीच ही स्मरणिका सिद्ध केली आहे.

ही स्मरणिका तयार करण्यासाठी अनेकांनी मोलाचे सहाय्य केले आहे. कै. ताटके सरांच्या कुटुंबियांनी सरांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'आठवणी' असा एक ग्रंथ सिद्ध केला आहे. त्यातील माहिती, फोटो व लेख वापरण्यास परवानगी दिल्याबद्दल ताटके सरांच्या कुटुंबियांचे आम्ही शतश: आभारी आहोत. त्याचप्रमाणे काही जणांनी ताटके सरांवर लेख लिहून, कविता करून त्यांना आदरांजली वाहिली आहे. त्या व्यक्तींना आभार मानणे रुचणार नाही, पण त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आम्हाला आवश्यक वाटते. तसेच या स्मरणिकेसाटी आवश्यक असलेल्या जाहिराती देणाऱ्या सर्व जाहिरातदारांचे मन:पूर्वक आभार !

श्री. दीपक मराठे ह्यांनी अगदी थोड्या अवधीत हस्तलिखित शब्दांना अतिशय सुबक आणि देखणे छापील रूप दिले. त्यांना आपल्या संस्थेबद्दल विलक्षण आस्था व प्रेम आहे. त्यांनी ह्या छपाईच्या कामाकडे एक उत्तम सेवेची संधी म्हणून पाहिले आहे. त्यामुळे उपकार म्हणूनही आभार मानलेले त्यांना रुचणार नाही. पण त्यांच्या सहकार्याची अगत्यपूर्व नोंद करणे आम्हाला आवश्यक वाटते. ■■■

***With Best Compliments from***

# Balaji Travels

Buses & Video Coach Available on Contract Basis
For School, Factories,
Marriages & Special Tours

**Shop No. 4, Prasanna Co-op. Housing Society,**
**Opp. Sugandha Lawns, Bibwewadi, Pune 411037.**
**PH : 4216018 / 4215800**

**भारत सरकार**

# शिक्षा मन्त्रालय

यह राष्ट्रीय पुरस्कार

श्री विष्णु त्रिम्बक ताटके, प्रधानाध्यापक,

मॉडर्न हाई स्कूल, पूना. (महाराष्ट्र)

को अध्यापन के क्षेत्र में प्रशंसनीय लोक सेवा के लिए सम्मानार्थ प्रदान किया जाता है।

प्रेम किरपाल

नयी दिल्ली — भारत सरकार के

तारीख 31 अक्तूबर, 1961. — शिक्षा सलाहकार

# गुरुवर्य कै. विष्णू त्र्यंबक ताटके - जीवनपट

| | |
|---|---|
| १९०२ | ८ फेब्रुवारी. जन्म - माहुली, जिल्हा सातारा |
| १९१९ | मॅट्रिक - न्यू इंग्लिश स्कूल, सातारा |
| १९२३ | बी. ए. - फर्ग्युसन कॉलेज, पुणे |
| १९२४ | शिक्षक-जनरल एज्युकेशन इन्स्टिटट्यूट, कल्याण |
| १९२५ | शिक्षक - शारदा सदन हायस्कूल, केडगाव बेट |
| १९२७ | विवाह |
| १९२९ | शिक्षक - न्यू इंग्लिश स्कूल, पुणे |
| १९३४ | १९ मे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व मॉडर्न हायस्कूलची स्थापना कै. शंकरराव कानिटकर यांचेबरोबर |
| १९४७ | सेक्रेटरी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे |
| १९५३ | मुख्याध्यापक, मॉडर्न हायस्कूल, पुणे |
| १९६१ | राष्ट्रपती पारितोषिक - आदर्श शिक्षक |
| १९६४ | सन्माननीय दंडाधिकारी |
| १९६७ | निवृत्त मुख्याध्यापक, मॉडर्न हायस्कूल, पुणे |
| १९७५ | निवृत्त सेक्रेटरी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे |
| १९८० | १६ डिसेंबर. मृत्यू. |

# गुरुवर्य कै. विष्णू त्र्यंबक ताटके यांची विविध कार्यक्षेत्रे

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्याध्यापक | - मॉडर्न हायस्कूल, पुणे |
| २) | सेक्रेटरी | - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे |
| ३) | खजिनदार व कार्यवाह | - आंतरशालेय क्रीडा समिती (२ वर्षे) |
| ४) | सभासद | - पुणे विद्यापीठ कोर्ट १९६० |
| ५) | सभासद | - कार्यकारी मंडळ, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ स्कूल्स |
| ६) | अध्यक्ष व सभासद | - कार्यकारी मंडळ, हेडमास्टर्स असोसिएशन, पुणे |
| ७) | सभासद | - स्टेट ॲडव्हायझरी कमिटी (१०+२+३) मुंबई |
| ८) | सभासद | - गणित अभ्यासक्रम समिती |
| ९) | अध्यक्ष | - पुणे जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन |
| १०) | चालक | - पूरग्रस्त केंद्र, मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ (पानशेत पुराची आपत्ती) |
| ११) | अध्यक्ष | - पुण्यातील शाळांमध्ये राहिलेल्या पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी नेमलेली सरकारी कमिटी |
| १२) | कार्याध्यक्ष | - सेमिनार ऑफ सेकंडरी टीचर्स-पुणे जिल्हा, जानेवारी १९६१ |
| १३) | सभासद | - ज्युनियर एन्सीसी ॲडव्हायझरी कमिटी, पुणे |
| १४) | उपाध्यक्ष व कार्यध्यक्ष | - पूना रिजन ॲमॅच्युअर ॲथलेटिक असोसिएशन |
| १५) | उपाध्यक्ष | - महाराष्ट्र स्टेट ॲथलेटिक असोसिएशन |
| १६) | सल्लागार | - फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण |




# आमचे ध्येयवादी, चैतन्यशील ताटके सर

- श्री. ग. प्र. प्रधान

अनेक शिक्षक निष्ठापूर्वक शिकवताना विद्यार्थ्यांच्यावर आणि ज्ञानावर प्रेम करत असतात. त्यांच्यापैकी काही असामान्य शिक्षकांच्या अध्यापनाला जणू प्रतिभेचा स्पर्श झालेला असतो, आणि अशा गुरुंना विद्यार्थी कधीच विसरू शकत नाही. मला असे दोन अविस्मरणीय गुरु, मी पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये असताना लाभले. ते म्हणजे भूगोल आणि गणित शिकविणारे व्ही. टी. ताटके सर आणि इंग्रजी शिकविणारे वाय. जी. पटवर्धन सर. या दोन गुरूंची व्यक्तिमत्वे म्हणजे जणू दोन टोकेच होती. ताटके सर म्हणजे मूर्तिमंत उत्साह आणि चैतन्य आणि पटवर्धन सर शांत, सौम्य आणि मितभाषी. ताटके सर शिकवताना स्वत:च अध्यापनाच्या विषयात रंगून गेलेले असत.

शिकविण्यातला आनंद त्यांच्या शब्दांमध्ये, चेहेऱ्यावर इतकेच काय पण त्यांच्या प्रत्येक हालचालीतून व्यक्त होई. पटवर्धन सर खूपसे तटस्थ, सौम्य हसणारे मोजकचे पण वेचक बोलणारे. मात्र या दोघांच्याही मध्ये एक विलक्षण साम्य होते. त्यांच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांना ते शिकवित असलेले विषय आवडत. इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांचे मन त्या विषयात रंगून जात असे. आणि त्यांच्या बुद्धीला जणू पंख फुटत असत. मॉडर्न हायस्कूलमध्ये शिकत असताना ताटके सरांचा मी विद्यार्थी होतो, त्याचप्रमाणे मॉडर्न हायस्कूलमध्ये एक वर्ष नोकरी करताना त्यांच्या हाताखाली काम करण्याचे भाग्यही मला लाभले. माझ्या या गुरुंच्या अनेक आठवणी माझ्या मनात उचंबळून येत आहेत. कारण ८ फेब्रुवारी २००२ हा ताटके सरांचा जन्मशताब्दी दिन आहे. आमच्या ताटके सरांच्या ध्येयवादी आणि कर्तृत्वशील जीवनाचा अल्प परिचय तरी नव्या पिढीतील अध्यापकांना व्हावा असे मला वाटते.

ताटके सर आम्हाला सहावीत (आत्ताच्या १० वीत) भूगोल शिकवायला आले आणि म्हणाले, मी पहिले चार तास भूगोलावरील साहसी प्रवासी या पुस्तकावर घेणार आहे. नंतर आपण आपल्या अभ्यासक्रमाला सुरुवात करू. भावे हायस्कूलमधील एक शिक्षक मोडक यांनी लिहिलेले हे पुस्तक तुम्ही सर्वांनी वाचले पाहिजे. या पुस्तकाची एक प्रत आपल्या ग्रंथालयात आहे. सर वर्गात पृथ्वीचा गोल घेऊन आले होते आणि फळ्यावर त्यांनी जगाचा नकाशा लावलेला होता, ते चार तास केवळ अद्भुत होते. ताटके सरांनी आम्हाला त्या साहसी प्रवाशांच्या समवेत जगाची सफरच जणू घडविली.

उत्तर ध्रुवावर पोहोचण्याचे अनेकांनी केलेले प्रयत्न आणि शेवटी नॅन्सेनला आलेले यश याचे सरांनी बहारीचे वर्णन केले. दक्षिण ध्रुवावर प्रथम पोचायचे या जिद्दीने प्रवास करणारा स्कॉट हा इंग्रज प्रवासी तेथे पोहोचला आणि त्याच्या पूर्वी दक्षिण ध्रुवावर पोहोचलेल्या अमुंडसेनने तेथे रोवलेला नॉर्वे देशाचा ध्वज पाहून तो कसा निराश झाला आणि परतीच्या प्रवासात तो आणि त्याचा सहकारी यांचा दुर्दैवी अंत कसा झाला याचे सरांनी केलेले वर्णन ऐकताना वर्गातल्या आम्हा सर्वांची मने हेलावून गेली. ताटके सरांनी त्या चार तासात आम्हाला लिव्हिंगस्टन समवेत कांगोच्या खोऱ्यात हिंडवून आणले. मॅगेलनची सामुद्रधुनी दाखविली आणि पॅसिफिक महासागरा जवळील अँडीज पर्वतातून उगम पावणाऱ्या आणि ॲटलांटिक महासागराला मिळणाऱ्या ॲमेझॉनचे आणि ॲमेझॉनच्या खोऱ्यातील पशु-पक्ष्यांचे आणि त्या निसर्गाचाच भाग असलेल्या तेथील आदिवासींच्या जीवनाचे दर्शन घडविले. त्या चार दिवसात ताटके सरांनी या रीतीने आम्हा विद्यार्थ्यांचे भूगोलाशी

कायमचे नाते जोडले.

त्यावेळी मॉडर्न हायस्कूल शनिवार पेठेतील मेहुणपुऱ्यात तीन समोरासमोरील वाड्यात भरत असे. परंतु शालेय जीवनात कधीही विस्कळीतपणा आला नाही. ताटके सर मॅट्रिकला आम्हाला बीजगणित हा विषयही शिकवीत. गणित हा त्यांच्या स्वत:चा खास आवडीचा विषय. ते आम्हाला म्हणत, गणित हा विषय तुम्हाला नीट समजला की तुमच्या विचारात कधीही भोंगळपणा येणार नाही. बुद्धीला शिस्त लावणारा हा विषय आहे. साहित्याची विशेष आवड असल्यामुळे पूर्वी मी गणिताचा नीट अभ्यास करीत नसे.

परंतु ताटके सरांची शिकवण्याची पद्धतच अशी होती की, मलाही बीजगणितात रस वाटू लागला. आमच्या वर्गातील एकही जण गणितात मॅट्रिकला नापास झाला नाही आणि ७०% हून अधिक मार्क १०-१२ जणांनी मिळविले. याचे श्रेय ताटके सर आणि कोपरकर सर या आमच्या गुरुंनाच दिले पाहिजे.

१९४३-४४ साली एक टर्म मी मॉडर्न हायस्कूलमध्ये अध्यापन केले. ताटके सर मला म्हणाले, "शिकविणे ही एक कला आहे. वर्गातले विद्यार्थी शिक्षकांच्या धाकामुळे गप्प बसले, तर त्याचे कौतुक नाही, शिकविताना मुले स्वत:ला विसरून गेली तरच तो शिक्षक यशस्वी झाला. असा शिक्षक होण्याचा तू प्रयत्न कर. मात्र हे एका वर्षात जमणार नाही, हेही लक्षात ठेव."

मी एम.ए. झाल्यानंतर ताटके सरांना भेटायला गेलो तेव्हा ते म्हणाले, "कॉलेजमध्ये शिकविणे हे एक आव्हानच आहे. तू आता खूप वाचन, व्यासंग कर. आता परीक्षेचे जंजाळ नाही. मुक्त वाचन करायची तुला संधी आहे. शिकविणे प्रथम कठीण जाईल. पण हळूहळू जमेल." सरांचे हे शब्द ऐकून खूप धीर वाटला. १९५४ ते १९६७ असे १३ वर्षे ताटके सर मॉडर्न हायस्कूलचे मुख्याध्यापक होते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक आगळाच ठसा मॉडर्न हायस्कूलवर उमटला. पुण्यामध्ये नूतन मराठी विद्यालयाचे नाना नारळकर आणि दत्तो वामन पोतदार, शिवाजी मराठा हायस्कूलचे गुरुवर्य जगताप, कॅंप एज्युकेशन सोसायटीचे आचार्य अत्रे, अनाथ विद्यार्थी गृहाचे ग. श्री. खैर असे नामवंत मुख्याध्यापक मी विद्यार्थी असताना होते, ती उज्ज्वल परंपरा आमच्या ताटके सरांनी पुढे चालविली. अभ्यास, खेळ, वक्तृत्त्व, नाटक आद सर्व क्षेत्रांत मॉडर्न हायस्कूलचे विद्यार्थी चमकले पाहिजेत म्हणून सरांची अविश्रांत धडपड चालू असे. ते मला एकदा म्हणाले, "तू एकदा शाळेत ये. माझे सर्व शिक्षक म्हणजे एम.सी.सी.ची टेस्ट क्रिकेट खेळणारी टीम आहे." शाळा हा चैतन्याचा झरा असला पाहिजे, हा सरांचा आग्रहअसे आणि त्यांच्या चैतन्यशील व्यक्तिमत्त्वाने हे साध्य झाले.

नेतृत्त्वाची खरी कसोटी संकट काळात होते. आणि अशी वेळ १९६१ च्या जुलै महिन्यात पानशेत धरण फुटले त्यावेळी अली. पुण्यावरील या संकटाच्या वेळी कॉंग्रेस हाऊसच्या समोर आणि रोकडोबाच्या परिसरात राहणाऱ्या गरीब माणसांना पुराचा जबर तडाखा बसला. ही सारी माणसे मॉडर्न हायस्कूलमध्ये आश्रयाला आली तेव्हा ताटके सर व त्यांचे सहकारी यांनी या पूरग्रस्त बांधवांना खंबीर आधार दिला. ताटके सर तीन दिवस शाळेतच होते. सरांनी भवानी पेठेतल्या आपल्या विद्यार्थ्यांना फोन करून तांदूळ आणि बेसन हक्काने मागितले आणि सर्वस्व वाहून गेलेल्या त्या माणसांना प्रथम गरम गरम पिठलं-भात खाऊ घातला. हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या संचालिका-त्यांच्या मदतीने टॅंकरने पाणी आणले, त्याचवेळी ताटके सरांच्या शनिवारातील घरात ४ फूट पाणी होते. सरांना जेव्हा एक मित्र म्हणाले, तुम्ही इकडे काम करताय हे चांगलेच आहे. पण तुमच्या घराचे काय ? यावर सर म्हणाले, तिकडे बघायला माझी बायको पूर्णपणे समर्थ आहे. ताटके सरांच्या

या कामामुळे सरकारने पूरग्रस्त सहाय्यक समितीवर त्यांना घेतले. त्यावेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ताटके सरांना बरोबर घेऊन काही पूरग्रस्त पेठांतून हिंडले.

ताटके सरांचे पूर्वायुष्य तसे कष्टाचेच होते. ८ फेब्रुवारी १९०२ ला एका मध्यमवर्गीय कुटुंबात साताऱ्या शेजारच्या संगममाहुली या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील नामवंत वैद्य होते. वेण्णा कृष्णेच्या संगमावरील माहुली गावात विद्यार्थीदशेत ताटके सर पुरामध्ये बेधडक उडी मारून पोहत असत. त्यांच्या लहानपणीच प्लेगच्या साथीत त्यांचे आई-वडील निवर्तले. थोरल्या भावाने कुटुंबाची जबाबदारी घेतली. सातारला हायस्कूलचे शिक्षण पुरे केल्यावर सरांनी पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. ची डिग्री सायन्स हा खास विषय घेऊन १९२३ साली मिळवली. नंतर केडगावच्या मिशन स्कूलमध्ये ते शिक्षक म्हणून काम करू लागले. दोन वर्षांनी ते पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये अध्यापक झाले. १९३४ साली त्या शाळेतील काही शिक्षकांना घेऊन एस. आर. कानिटकर यांनी मॉडर्न हायस्कूलची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्यासमवेत न्यू इंग्लिश स्कूलमधील कोपरकर, ताटके, वाय. जी. पटवर्धन, जी. जी. दामले आदी हायस्कूल चालविणाऱ्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सुरुवातीपासूनचे आजीव सदस्य होते.

१९४७ पासून १९७५ अखेरीपर्यंत ते सोसायटीचे सचिव होते. शिक्षण क्षेत्रात ताटके सरांनी विविध जबाबदाऱ्यांची कामे केली. पुणे विद्यापीठ सिनेटचे ते सदस्य होते. शासनाच्या शिक्षण सल्लागार समिती आणि अन्य अनेक समित्यांवर त्यांनी कामे केली. मात्र त्यांनी निवडणूक लढवावी असे ज्यावेळी एका नेत्यांनी त्यांना सुचविले त्यावेळी राजकारण हा माझा पिंड नाही असे म्हणून त्यांनी ती सूचना स्पष्टपणे नाकारली. १९६१ साली ताटके सरांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. त्यावेळी आम्हा त्यांच्या असंख्य विद्यार्थ्यांची मान अभिमानाने आणि आनंदाने उंचावली.

त्यावेळच्या रीतीप्रमाणे ताटके सरांचे एकत्र कुटुंब होते. भावाची मुले, अकाली वैधव्य आलेल्या बहिणीची मुले हे सगळे सरांच्या घरी राहूनच शिकले. माझी बहीण आणि ताटके सरांची पुतणी लीला एका वर्गात होती. माझी बहीण ताटके सरांच्या घरी नेहमी जात असे. ती म्हणे, ''सरांचे कुटुंब साधे आहे, तिथे मला कधीही परकेपणा वाटत नाही.'' खेळीमेळीने, आनंदाने एकत्र राहणाऱ्या त्या कुटुंबावर सरांची आणि सरांच्या पत्नीची मायेची सावली होती. आणि त्या दोघांच्या सतत काम करण्यामुळे घरात शिस्त आपोआप राखली जाई. ताटके सर स्वत: एक उत्तम खेळाडू होते. क्रिकेट आणि सर्व देशी खेळ त्यांच्या आवडीचे होते. मॉडर्न हायस्कूलमधील क्रीडा विभागाला उत्तम शिक्षक असले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष होता. असे क्रीडा शिक्षक असलेल्या अण्णा पटवर्धनांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनेक बक्षिसे मिळविली, अनेक चुरशीचे सामने जिंकले, याचा सरांना मोठा अभिमान होता. पुणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे ते कार्याध्यक्ष होते.

१९७५ साली सर निवृत्त झाले. त्यानंतर मी एकदा त्यांना भेटलो. तेव्हा ते नेहमीप्रमाणे हसत हसत म्हणाले, आता मी शाळेतूनच नाही, तर मुलांच्यावर जबाबदारी सोपवून संसारातूनही मुक्त झालो. १९८० साली १६ डिसेंबरला ताटके सरांचे निधन झाले.

एक ध्येयवादी शिक्षक, कर्तबगार मुख्याध्यापक म्हणून त्यांना जीवनात साफल्य लाभले. कष्टाळू पत्नीमुळे ते कौटुंबिक जीवनातही समाधानी होते. आजही त्यांची आठवण झाली की माझ्या डोळ्यासमोर उत्साहाने ओसंडून जाणारे आणि शिकविताना स्वत:ला विसरून जाणारे त्यांचे चैतन्यशील व्यक्तिमत्त्व उभे राहते.

ताटके सरांच्या कृतार्थ जीवनाला माझे विनम्र प्रणाम !

■ ■ ■

# आदर्श कुटुंबप्रमुख, समर्थ प्रशिक्षक, सामाजिक श्रेष्ठ पुरुष

- डॉ. जयंत विष्णू ताटके

कै. आप्पांची ८ फेब्रुवारी २००२ ह्या दिवशी जन्मशताब्दी. त्या निमित्ताने त्यांच्या आठवणीचा संग्रह करायचे ठरले. म्हणून माझ्या आठवणी लिहायचा हा मनापासूनचा प्रयत्न.

मला असं वाटतं की आप्पांच्या आठवणी एक पिता, एक कुटुंबप्रमुख, एक समर्थ शिक्षक तसेच एक आदर्श समाजसेवक म्हणून नोंदविल्या तर काहीतरी, थोडंतरी भरीव काम होईल.

मला आठवतात ते आप्पा १९३९ च्या सुमाराचे. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभाचे वर्ष. आप्पांकडे शिकवणीला येणारी मुले पायजमा किंवा धोतरात येत असत. शिकविताना मुलांना गणिते घातली की, आप्पा वर्तमानपत्र वाचायचे. त्यावेळी पार्टिशनवर जर्मनी, हिटलर, रोमेल, जपान असे शब्द मी लिहिल्याचे मला आठवते. त्यावेळी ते युद्धाच्या सुद्धा गोष्टी सांगत असत. त्यांनी शिकवायला सुरुवात केली की, मी कान देऊन ऐकत असे. त्यावेळी गणित काय कळणार होते ? पण आप्पांच्या आवाजात जादू होती. पुढे पुढे आप्पा इतके कामात असत, की त्यांनी आम्हाला शिकविल्याचे आठवत नाही. पण त्यांचे आमच्याकडे पूर्ण लक्ष असायचे.

मराठी तिसरीत असेन. वर्गात गणित चुकले की आमचे नवीन मराठीतील पूजनीय श्री. आठवले गुरुजी मला म्हणायचे, "तुझ्या दोन्ही बहिणी हुशार आहेत. गणितात उत्तम आहेत. जा त्यांना बोलावून आण." आणि मग त्यांच्यासमोर माझा पाणउतारा करायचे. असे वरचेवर झाल्यावर मला गणिताची भिती वाटायला लागली. शेवटी मी एक दिवस आप्पांना रडत रडत म्हणालो, की मला तुम्हीच गणित शिकवा किंवा गणिताची शिकवणी लावा. दुसऱ्या दिवसापासून आमच्या शनिवारातील घरासमोर राहणारे एक मुरब्बी शिक्षक पुरंदरे गुरुजी मला गणित शिकवू लागले. आप्पांनी माझ्या तक्रारीची कळकळीने आणि तात्काळ दखल घेतली. परिणाम पुढल्या वर्षी - चौथीपासून मी वर्गातला पहिला दुसरा नंबर सोडला नाही.

१९५२ साली मी इंटर सायन्स झालो. आप्पांची इच्छा मी इंजिनियर व्हावे अशी होती. पण माझा पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजच्या मेरिट लिस्टमधला नंबर थोडक्यात हुकला. मी सांगलीच्या इंजिनियरिंग कॉलेजात मुलाखतीला गेलो. मुलाखतीनंतर निश्चितपणे मला पहिल्या वर्षाला जागा मिळणार असं वाटलं. पण प्रत्यक्षात दुसऱ्या दिवशी माझे नाव यादीत तर नव्हतेच; पण जागा मिळालेल्यांत माझा एक वर्गमित्र - पारखी होता. त्याला माझ्यापेक्षा १२/१३ टक्के गुण कमी होते. मला हा अन्याय वाटला आणि मी परत प्रिन्सिपॉलची मुलाखत मागितली. त्या मुलाखतीत प्रिन्सिपॉलनी अत्यंत उद्धटपणे, न पटणारी, खटकणारी कारणे दिली. इतकेच नाही तर आमच्या गरिबीवरही तोंडसुख घेतले. रातोरात मी आमची मुलाखत जशीच्या तशी लिहून आप्पांना कळवली. ते तडक डायरेक्टर ऑफ एज्युकेशनच्या ऑफिसात गेले आणि माझे पत्र त्यांच्यापुढे ठेवले. परिणामी, ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात सांगलीच्या कॉलेजात मला ॲडमिशन मिळाल्याची नोटिस लागली. आप्पांची कळकळ, तत्परता, कौटुंबिक जबाबदारी बिनतोड होती. मी मात्र झाल्या प्रकाराने इतका हिरमुसला होतो की, मी बी.एस्सी. ला फर्ग्युसनमध्ये जाऊ लागलो होतो. मला सांगलीला

ॲडमिशन मिळाल्याचे कळल्यावर ते मला म्हणाले, ''इंजिनियरिंग म्हणजे पुढे सतत उन्हात उभे राहून काम करावे लागेल. बी. एस्सी. केलेस तर ऑफिसमध्ये बसून काम करशील. तुझे तूच ठरव काय करायचे ते.'' मी सांगलीला न जाण्याचा निर्णय घेतला. माझ्या निर्णयावर आप्पांनी कधीही टीका केली नाही. पण त्यांच्या मनात मात्र मी इंजिनियर व्हावे असेच असावे. कारण १९५६ मध्ये मी एम.एस्सी. झाल्यावरसुद्धा ते म्हणाले होते, ''जयंता, तुला इंजिनियर व्हायचे असेल तर अजूनही मी तुझ्या शिक्षणाचा खर्च करायला तयार आहे.'' मोठे कुटुंब, त्या मानाने कमी मिळकत तरीही त्यांना शिक्षणाबद्दल वाटलेली तळमळ हा एक त्यांचा महत्त्वाचा परिणामकारक गुण होता.

अशीच तळमळ त्यांना त्यांच्या संस्थेबद्दल होती. 'माझ्या संस्थेत एखादा विद्यार्थी प्रवेश करता झाला की तो ग्रॅज्युएट होऊनच बाहेर पडावा' - ही त्यांची संस्थेबद्दलची तळमळ होती आणि ती त्यांनी ध्येयनिष्ठेने पूर्ण केली. त्यांनी संस्थेला शिशुशाला तर काढून दिलीच पण त्यांच्या वयाच्या ६९ व्या वर्षी संस्थेच्या मॉडर्न महाविद्यालयाची स्थापना केली. संस्थेचे कॉलेज काढणे हे आप्पांचे अलिखित ध्येय होते. ध्येय हा जीवनाचा सुगंध त्यांनी मानला होता. ज्यावेळी त्यांना ध्येयाचा ध्यास लागे त्यावेळी त्यांना श्रमाचा त्रास होत नसे.

१९७१ मध्ये मला संख्याशास्त्रात पी.एच.डी. मिळाली. त्यावेळी आप्पांनी मला रु. १००० चा चेक आशीर्वाद म्हणून दिला. इतके पैसे कशाला म्हणून विचारल्यावर, ''तुझे पूर्ण शिक्षण मी केल्याचे मला थोडे तरी समाधान मिळू दे.'' असे आप्पा म्हणाले. एक विचार मनाल चाटून गेला की, आप्पांना मला इंजिनियर करण्याचे फार मनात होते पण ते त्यांचे स्वप्नच राहिले.

कलकत्त्याला नॅशनल टोबॅको कंपनीत स्टॅटिस्टिकल क्वालिटी कंट्रोल इनचार्ज म्हणून मी नोकरीला लागलो. ३ वर्षांनंतर प्रख्यात इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटमध्ये आलेल्या अमेरिकेच्या रुजर्स स्टेट युनिव्हर्सिटीचे डायरेक्टर डॉ. एलिस ऑर यांनी माझे कंपनीतील काम पाहिल्यावर आमच्या जनरल मॅनेजरना श्री. मॉरिस यांना कळविले होते की. ''तुमच्याकडील संख्याशास्त्रज्ञाने जर त्याला ज्ञात असलेल्या संख्याशास्त्राच्या ज्ञानाचा व त्याला उपजत असलेल्या इंजिनियरिंगमधील ज्ञानाचा सुंदर मिलाफ केला, तर पुढे मागे तो यशस्वी संख्याशास्त्रज्ञ होईल. डॉ. ऑरचे विचार आप्पांच्या माझ्याबद्दलच्या आकांक्षेशी कोठेतरी जमतात.

आप्पा एक आदर्श व सद्‌हृदय कुटुंबप्रमुख होते. त्यांच्या धाकट्या बहिणीचे - शकुंतला आत्याचे यजमान अचानक निधन पावल्यावर त्यांनी बहिणीच्या संसाराची जबाबदारी घेतली. आत्याला एक मुलगा विद्याधर, मुली सुमन आणि प्रभा. सर्वजण शिकायला आप्पांकडेच होते. त्यांच्या दोन्हीही बंधूंची सर्व मुले म्हणजे आमची चुलत भावंडे जवळजवळ पूर्ण शिक्षणाला आप्पांकडेच होती. आम्ही सात भावंडे, पाच पुतणे, तीन पुतण्या आणि बहिणीचा संसार. हल्ली असे भरलेले घर आणि जबाबदार कर्तृत्ववान व आदर्श कुटुंबप्रमुख ही कल्पना नव्या पिढीला शिवणारसुद्धा नाही. चुलत भावाची हृदयविकारानंतरची विश्रांती, सर्व मुलांची सर्व प्रकारची दुखणी, स्वत:ची दोन ऑपरेशन्स... नाना प्रकारची संकटे पाठोपाठ येत असत. पण आप्पा म्हणजे धैर्याचे मेरुमणी. सर्व संकटांना त्यांनी हसत हसत तोंड दिले. हसतमुख चेहरा आणि विनोदबुद्धी हा त्यांचा स्थायीभावच होता.

'संतोष: साधुसंड.श्च विचारोऽथ शमस्तथा ।
एत एव भवाम्भोद्यावुपायास्तरणे नृणाम् ॥

त्यांचे समुद्रासारखे गांभीर्य, मेरुचे धैर्य व चंद्राची शीतलता त्यांना प्राप्त होण्यास संतोष, सत्संग, थोर विचार व शांती

आणि त्यांचे विचारी अंत:करणच कारण होते.

त्यांनी अंदाजे १२/१३ तरी लग्ने ठरविली असावीत. सिद्धीस नेली असावीत. वडील म्हणून मारून मुटकून कधी अभ्यासाला बसविले नाही. तत्त्वज्ञान शिकविले नाही. उपदेशांचे डोस पाजले नाहीत. पण सतत हसत खेळत गप्पा गोष्टी करत नकळत आम्हाला घडवले. शाळेत जसा कधी उशीर केला नाही तसे घरी जेवणाची वेळ चुकवली नाही. रात्रीच्या जेवणाला साडेआठला सर्वांनी एकत्र जेवायचा दंडक असे. घरात माणसे खूप. मोठ्या फक्त आमची आई व आत्त्या. आप्पांनी सर्व मुलांना कामे वाटून दिली होती. तेही स्वत: स्वत:चे ताट, वाटी, भांडे विसळून ठेवत असत.

आप्पांची राहाणी अगदी साधी असे. स्वच्छ निळ्या किनारीचे धोतर, शर्ट, कोट, टोपी, चपला, पावसाळ्यात आणि उन्हाळ्यात हातात छत्री, वागण्यात प्रेमळ भाव आणि विचार उच्च. कापड, कपडे लत्ते यांच्या खरेदीला कधीच बाहेर पडले नाहीत पण दर रविवारी मंडईतून भाजी आणायला चुकत नसत. खाण्यात काटछाट करणे त्यांना मान्य नसे. पण जिभेचे चोचलेही त्यांनी जोपासले नाहीत. साधे, सकस आणि पूर्णान्न ते पसंत करीत. भरपूर आमटी, भात, भाजी, भाकरी, वरण, लिंबू आणि तूप, चटणी मात्र आवर्जून करायला लावायचे. जेवताना त्यांनी कधीही गंभीर विषय काढले नाहीत. त्यांच्या प्रभुणे मास्तरांबरोबरच्या राजकीय गप्पा, विनोदाचे धबधबे त्यातच रोजचे रात्रीचे जेवण होत असे.

आप्पांचे वाचन भरपूर असे. रोज टाइम्स ऑफ इंडिया वाचायचे. नॅशनल जिऑग्राफिक हे त्यांचे अत्यंत आवडते मासिक. इतकी चौफेर भौगोलिक माहिती कदाचित या मासिकामुळेच असावी. नुसते वाचन करून त्यांचे समाधान झाले नाही तर ते वाचन ते सतत कारणी लावत. वाचन हा त्यांचा नुसता छंद नव्हता. वाचून संग्रही ठेवलेले ज्ञान योग्य वेळी, योग्य ठिकाणी उद्धृत करणे याबद्दल त्यांची जबरदस्त ख्याती होती. दुसऱ्या महायुद्धात चर्चिल इंग्लंडचे पंतप्रधान असताना त्यांनी ब्रिटिश संसदेपुढे केलेली भाषणे ही कर्तृत्त्वाचा नमुना आणि जाज्वल्य देशप्रेमाची पावती आहे असे ते मानत. त्या भाषणांचे परिच्छेद ते जसेच्या तसे म्हणून दाखवत असत. ही किमया फारच थोड्या लोकांना अवगत असते. त्यांच्यावर झालेल्या शस्त्रक्रियेनंतर दवाखान्यात पडून असताना त्यांनी माझ्याकडून भारतातील सर्व राज्यावर लिहिलेली मालिका वाचून घेतली होती. मसानीचे प्रसिद्ध पुस्तक 'अवर इंडिया' हेही त्यांनी माझ्याकडून अभ्यासून घेतले होते. त्यांचे त्या संदर्भातले एक वाक्य आठवते, "वाचनाने मनुष्याच्या ज्ञानात भर पडते आणि वाचनाने माणूस एकाकी राहात नाही. मनुष्याचे ज्ञान हे त्याचे एक भांडवल आहे, जे दुसऱ्याला देऊन कमी होत नाही आणि ते नेहमी वाढतं ठेवणे त्याच्याच हातात असतं."

आप्पांच्या मॉडर्न महाविद्यालयात संख्याशास्त्र विभागाच्या एका कार्यक्रमाला मला अध्यक्ष म्हणून बोलावले होते. माझे भाषण संपल्यावर विद्यार्थीवर्गाने मला खूप प्रश्न विचारले. मी त्यांची माझ्या कुवतीप्रमाणे समर्पक उत्तरे दिली. आपा श्रोत्यांत बसले होते. पण कार्यक्रमानंतर किंवा नंतरच्याही चार पाच दिवसांत आप्पा त्याबद्दल काही बोलले नाहीत. मला सारखं वाटत होतं की आपण आप्पांच्या परीक्षेत उतरलो नसणार. पण त्यानंतर आमच्या आत्याबाईकडे गेलो असताना त्या मला पेढेच मागू लागल्या. त्या म्हणाल्या, "अरे जयंता, तुझा कॉलेजमध्ये कार्यक्रम झाला. दुसरे दिवशी आप्पा आले होते. ते तुझी तोंड भरून स्तुती करीत होते. तुझ्या विषयात तुझी तयारी नावाजत होते. जयंताचं वाचन खूप दिसतं. केव्हा वाचतो कुणास ठाऊक म्हणत होते." आप्पांकडून इतके कौतुक आणि ते सुद्धा त्यांनी दिलेल्या कानमंत्राचा पाठपुरावा केल्याबद्दल ! आप्पांनी तोंडावर कधीही स्तुती केली नाही.

तसेच टाकून बोलणे आणि हेटाळणीही टाळली. आमचा उणंदुणं आम्हाला आत्याबाईंकडून किंवा सुमनकडून कळायचं.

नेहमी वाचन करा, ज्ञान मिळवा असे आप्पा म्हणायचे. वसिष्ठ ऋषींनी रामाला सांगितले,

ज्ञानवानेव सुखवान् ज्ञानवानेव जीवती ।
ज्ञानवानेव बलवान् तस्मात् ज्ञानमयो भव ॥

जो ज्ञानी असतो तोच खरा सुखी, तोच खरा जिवंत आणि तोच बलवान असतो. म्हणून राजा तू ज्ञानी हो. आप्पांच्या संस्थेचे ध्येयवाक्यही हे आहे. 'ज्ञानमयो भव'।

शिक्षक म्हणून आप्पा मला वेगळेच वाटायचे. घरी त्यांची कधीही भीती वाटली नाही. पण शाळेत मी त्यांना खूप भ्यायचो. मला अकरावीत ते गणित शिकवायचे. शिकविण्याची पद्धत फार सोपी. शिवाय भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, शास्त्रीय - कितीतरी विविध विषयांवरचे किस्से त्यांच्या तोंडून ऐकायला मिळायचे. नकाशाच्या सहाय्याने सिंगापूरच भौगोलिक महत्त्व त्यांनी अत्यंत रसाळ वाणीने सांगितल्याचे मला आठवते. इन्स्पेक्शनला आलेल्या बाईंनी तर त्यांची भूगोल शिकविण्याची ख्याती ऐकून गणिताचा तास असून भूगोलाचा पाठ घ्यायला लावल्याचे सर्वश्रुतच आहे.

आप्पा शास्त्र विषय घेऊन बी. ए. झाले. प्रथम शिकवत होते संस्कृत. पण खरा पिंड गणित व भूगोल शिक्षकाचा. एकदा मला आठवते. ते म्हणाले, "काही महिने इतिहास शिकवत होतो. पण मराठ्यांचा इतिहास शिकविताना आपसातले झगडे, फितुरी, दुही यामुळे मराठे हरत गेले हे शिकविताना जीव तुटे. म्हणून इतिहास शिकविणे सोडले. "न किंचन फलं धत्ते स्वाभ्यासेन विना क्रिया ॥" यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे तासावर जाण्यापूर्वी काय शिकवायचे याची तयारी ते नेहमी करायचे.

शिक्षकाचा व्यवसाय पत्करला तेव्हाच त्यांनी स्वत:वर काही बंधने घालून घेतली व ती शेवटपर्यंत पाळली. म्हणूनच मला म्हणावेसे वाटते की आप्पा खूप करारी होते. एखादा शिक्षक आला नाही की त्याचा तास घेण्यास आप्पा नेहमी तयार असायचे. अशा तासाला विद्यार्थ्यांनी कोणत्याही विषयांवरचे प्रश्न विचारावेत आणि आप्पांनी त्याची उत्तरे द्यावीत असेच व्हायचे. अशा तासाचे निमित्ताने ते विद्यार्थ्यांना सभोवतालच्या परिसराचे, सामाजिक परिस्थितीचे राजकीय उद्दिष्टांचे भान व ज्ञान देत असत. मॉडर्नचा विद्यार्थी म्हणजे गीतेचा एक तरी अध्याय पाठ असलेला, तालमीतील लाल माती लागलेला, मैदानावर न चुकता हजेरी लावणाराच असला पाहिजे असा त्यांना रास्त विश्वास होता. विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता ते शिकस्त करीत. त्यांचे शीलसंवर्धन करीत. आप्पा क्षमाशील होते, पण योग्य ठिकाणी शासनही करीत.

प्रथम शिक्षक आणि नंतर मुख्याध्यापक असताना त्यांनी शाळेत आणि शाळेबाहेर अनेक उपक्रम राबविले त्यावरून त्यांची सामाजिक जाणीव किती प्रखर होती याचा प्रत्यय येतो.

विजयादशमीच्या सीम्मोलंघन समारंभास व्याख्याता म्हणून एके वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आप्पांना बोलावले होते. विषय होता 'हिंदु धर्माच्या ऱ्हासाची कारणे आणि त्यावर योजावयाचे उपाय' या भाषणाला उभ्या महाराष्ट्रातून श्रोते उपस्थित राहिले होते. मला स्मरते, आप्पांचे भाषण होते एक तासाचे आणि प्रश्नोत्तरे झाली दीड तास! भाषणापूर्वी त्यांनी काढलेले सर्व मुद्दे त्यांच्याच हस्ताक्षरात आजही माझ्याजवळ आहेत. त्यावेळी त्यांनी एक मुद्दा प्रामुख्याने मांडला होता, तो असा 'हिंदू लोक अति उत्सवप्रिय आहेत. सणासुदीचा जो भोंगळ पसारा आहे तो कमी करायला हवा. मौजीबंधनासारखा एक अत्यंत पवित्र संस्कार निश्चित व्हायलाच हवा. 'संघाच्या गोळवलकर गुरूजींनी' हा असाच वक्ता महाराष्ट्रात मला

हिंदू धर्माची उंची वाढविण्यास हवा आहे' या शब्दांत आप्पांचा गौरव केला होता.

बॉम्बे इंजिनियरिंग ग्रुपमध्ये त्यांनी शिवाजी महाराजांवर एक अप्रतिम भाषण केले होते. त्या भाषणात त्यांनी आपल्या रसाळ वाणीने आणि बिनतोड युक्तिवादाने शिवाजी महाराजांची प्रतिमा - डोंगरातला उंदीर - याची दुसरी तितकीच प्रखर प्रतिमा साकार गेली. ते म्हणाले, 'शिवाजीने औरंगजेबासारख्या धूर्त बादशहाच्या पराक्रमी सेनापतीचा भर मैदानात सळो की पळो करून पराभव केला. ही प्रतिमा सर्व इतिहासकार विसरले आणि आपणही. पण आपले जवान विसरणार नाहीत.' आप्पांनंतर बाळशास्त्री हरिदास बोलणार होते. त्यांच्यासारखा इतिहासाचा गाढा अभ्यासू, प्रभावी वक्ता आप्पांना म्हणाला, ''गुरुजी सभा तुम्ही जिंकून गेलात. मी पामर आता काय बोलणार ?''

१९६१ च्या पानशेतच्या पुरानंतर सध्याच्या सावरकर भवनच्या जागी असलेल्या मांग कॉलनीतील निराश्रित मॉडर्न हायस्कूलमध्ये आश्रयाला आले. आप्पांनी सरकारी मदत न घेता आपल्या एका व्यापारी विद्यार्थ्याकरवी सर्व निराश्रितांना भात पिठल्याचे जेवण दिले. पिंपरीला श्री. एस्. टी. राजा, मॅनेजिंग डायरेक्टर एच्. ए. यांना फोन करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. कोणीतरी त्यांना हटकले, 'ताटके सर, तुम्ही इकडे शाळेत आहात. तिकडे शनिवारात खूप घरांतून पाणी शिरले आहे. तुमची मुले...'वाक्य पूर्ण व्हायच्या आतच ते म्हणाले. 'माझी पत्नी घराकडे आणि मुलांकडे बघायला पूर्ण समर्थ आहे.'

१९६१ साली आप्पांना शिक्षणक्षेत्रांत उत्तम कामगिरी केल्याबद्दल भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे हस्ते राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. त्यावेळी शिष्टाचाराचे काही नियम पाळावे लागतात. एका विशिष्ट जागेपर्यंत जाऊन राष्ट्रपतींसमोर उभे राहून पारितोषिक स्वीकारावे लागते. पण आप्पांचे नांव पुकारले आणि सर्व नियम दूर सारून डॉ. राधाकृष्णन स्वत: चार पावले पुढे आले. येतानाचे त्यांचे शब्द होते, 'पुण्याच्या जंगली महाराज रोडवर उत्तम वास्तू असलेल्या प्रसिद्ध मॉडर्न विद्यालयाचे तुम्ही प्रमुख ना ? तुमच्याबद्दल मी बरेच ऐकले आहे. 'सरकारी पारितोषिकापेक्षाही ही दाद अधिक मौल्यवान आहे. कारण स्वत: डॉ. राधाकृष्णनही एक शिक्षकच होते.

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण आप्पांशी वेळोवेळी काँग्रेस भवनात गुफ्तगू करीत. 'गुरुजींशी मी बोलत असताना कोणालाही आत पाठवू नका' अशी सक्त ताकीद असे. त्यांनी आप्पांना काँग्रेसच्या तिकिटावर निवडणुकीला उभे करण्याचा खूप प्रयत्न केला. त्यांच्या मनांत योजना होती की, आप्पा महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री व्हावेत. पण आप्पांनी त्यांना न दुखावता नकार दिला. राजकारण त्यांच्या स्वप्नातही नव्हते आणि अध्यापन हाडीमासी भिनले होते.

अनागतानां भोगानां वान्छनं कृत्रिमम् ।
आगतानां च संभोग इति पंडितलक्षणम् ॥

म्हणजेच अप्राप्य विषयांची इच्छा स्वाभाविक नसणे आणि प्राप्त विषयांचा उपभोग घेणे हे पंडितांचे लक्षण आहे.

एकाच वेळी आप्पांनी तीन संसार यशस्वीपणे चालवले. घरचा मोठ्या, एकत्रित कुटुंबाचा संसार, दुसरा संस्थेचा प्रगतीशील संसार आणि तिसरा कळत नकळत सामाजिक संसार. हे त्यांना सगळे कसे शक्य झाले असे विचारता ते म्हणायचे, ''कामात बदल हीच विश्रांती.' पण मला वाटते की त्यांना त्यांच्या ध्येयाचा एवढा ध्यास होता, की श्रमांचा त्यांना त्रास हाते नसे.

ते फक्त शिक्षक नव्हते तर ते समर्थ आणि प्रशिक्षित शिक्षक होते. प्रशिक्षित शिक्षक म्हणजे पदवीधारक नसून अध्यापन कुशलता प्राप्त झालेला, अध्यापन तंत्राची माहिती

असलेला व त्याचे उपयोजन करण्याची क्षमता असलेला शिक्षक ! आप्पांनी गणित आणि शास्त्र विषयांवर अनेक पाठ्यपुस्तके लिहिली. 'गणित कसे शिकवावे ?' याही विषयावर पुस्तक लिहिले. शिक्षकांसाठी कार्यशाळा घेतल्या. आपल्या विद्यार्थ्यांची क्षमता जाणून घेऊन ते त्यांना अध्यापन करीत. त्यासाठी लागणारे शिक्षणाचे तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र व अर्थशास्त्र याची त्यांना पूर्ण माहिती होती. व्यापक अर्थाने त्यांनी संस्थेचे व्यवस्थापन व प्रशासन सांभाळले. डॉ. अ. वि. गाडगीळ यांच्या भाषेत सांगायचे तर बालक, पालक, चालक, शासक यांना विद्यार्थी हितासाठी सांधणारे आप्पा एक दुवा होते. आप्पा शिस्तप्रिय, शीलसंपन्न होते. ते निर्भिड पण विनयशील होते. वृत्तीने ताठ पण कृतीने मनमिळावू, हौशी पण संयमी, रसिक पण निर्व्यसनी, सच्छील व सदाचारी असे होते आमचे आप्पा !

आप्पांच्या आठवणी कितीतरी आहेत. त्यांचे विचार, शिकवण, संस्कार आजही आम्हा सर्वांना योग्य ती वाट दाखवतात. अशा या आमच्या परमपूज्य वडिलांना, समर्थ शिक्षकाला आणि आदर्श कुटुंबप्रमुखाला त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त माझे शतशः प्रणाम !

ह्या प्रसंगी आप्पांच्या यशाला, कर्तृत्त्वाला निश्चितपणे जबाबदार असलेल्या त्यांच्या सहधर्मचरिणीची म्हणजे आमच्या आईची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. आप्पांच्या संसाराचा गाडा त्या माऊलीने हसतमुखाने कसलीही तक्रार न करता, घरातील सर्व मंडळींना लोभसवाणे प्रेम देऊन चालवला ह्यात शंकाच नाही. आमची आई प्रचंड कष्टकरणारी, अत्यंत अबोल, काटकसरी, निर्भय, धडाडीची अन् सोज्वळ स्त्री होती. अशा त्या माऊलीचे स्मरण झाले की डोळ्यात पाणी येते. त्या माझ्या आईला शतकोटी प्रणाम ! ■■■


प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेतील
अध्वर्यू मा. कै. ताटके सरांच्या
जन्मशताब्दी वर्षाच्या सोहळ्याच्या प्रसंगी

*कै. ताटके सरांच्या*
*पुण्यशील स्मृतीला विनम्र अभिवादन*



• स्नेहांकित •

**श्री. पद्माकर रामचंद्र किबे**
**किबे ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज**
**मामुर्डी, ता. हवेली, जि. पुणे.**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेमधील
ज्ञानतपस्वी मा. कै. ताटके सरांच्या
जन्मशताब्दी वर्षाच्या सोहळ्याच्या प्रसंगी
कै. ताटके सरांच्या पुण्यशील स्मृतीला
विनम्र अभिवादन

स्नेहांकित

**कृष्णराव भेगडे नागरी**
**सहकारी पतसंस्था मर्यादित,**

तळेगांव दाभाडे,
दूरध्वनी : २७९००
कल्पना लॉज, तळेगांव दाभाडे,
दूरध्वनी क्र. २३१४२

मा. श्री. शिवाजी भेगडे — चेअरमन
मा. श्री. विश्वनाथ वाजे — व्हा. चेअरमन

कै. ताटके जन्मशताब्दी - मानवंदना कार्यक्रम - दि. १९ ऑक्टोबर २००२

# आठवणीतील गुरुवर्य - मा. श्री. अरुण फिरोदिया

शब्दांकन : सौ. मृगजा कुलकर्णी

शिक्षण क्षेत्रात इतिहास घडविणारे आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगतीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे असे कै. श्री. ताटके सर यांची जन्मशताब्दी साजरी करताना प्रत्येकाचे अंत:करण आनंदाने भरून येत आहे. दि. १९ ऑक्टोबर २००२ रोजी 'कै. ताटके जन्मशताब्दी मानवंदना कार्यक्रम' झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते शिक्षणतज्ज्ञ मा. श्री. प्र. ल. गावडे आणि अध्यक्षपद भूषविले होते. कै. ताटके सरांचे विद्यार्थी प्रसिद्ध उद्योजक मा. श्री. अरुण फिरोदिया यांनी ! हा अपूर्व योगच होता. श्री. गावडे सरांनी ताटके सरांची व्यक्तिमत्त्व जवळून पाहिले होते तर श्री. अरुण फिरोदिया हे कै. ताटके सरांच्या संस्कारांनी घडलेले ! त्यामुळे श्रोत्यांना दर्शन घडले ते एक आदर्श शिक्षकाचे व एका कर्तृत्ववान संस्था घडविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे ! दोन्हीही थोर व्यक्तिमत्त्वांनी कै. ताटके सरांच्या पवित्र स्मृतीस मनापासून अभिवादन केले. सरांच्या पवित्र स्मृतीस मनापासून अभिवादन केले.

कवयित्री कुसुमावती देशपांडे म्हणतात -

'एखादाच मास्तर असा भेटतो,
डोक्यात घट्ट रुतून बसतो'

या ओळींप्रमाणेच अनेक विद्यार्थ्यांच्या हृदयात कै. ताटके सरांना मानाचे स्थान आहे. श्री. अरुण फिरोदिया यापैकीच एक. अध्यक्ष स्थानावरून 'आठवणीतील गुरुवर्य' या विषयावर बोलताना त्यांच्या प्रत्येक शब्दात गुरुंविषयीचा आदर, प्रेम जाणवत होते. सरांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने ते बोलत होते -

"कै. ताटके सरांच्या परिसस्पर्शाने आमचे जीवन उजळून निघाले. प्रथम मी मॉडर्न हायस्कूलमध्ये आलो तेव्हा ह्या भव्य दगडी इमारतीचा पगडा मनावर बसला. खरं तर मी या मोठ्या शाळेत आलो ते ताटके सरांमुळे ! आपल्या शाळेत हुशार विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा. ह्या त्यांच्या तळमळीमुळेच मी मॉडर्नचा विद्यार्थी झालो आणि माझ्या जीवनाला कलाटणी मिळाली.

शाळेतील सरांचा तास म्हणजे आम्हाला पर्वणीच असायची, कारण विषयाचे ज्ञान तर आम्हाला मिळायचेच पण इतरही खूप नवीन नवीन गोष्टी आम्हाला समजायच्या. सर, आम्हाला नवीन नवीन प्रयोग करायल उद्युक्त करायचे. त्यांनी हा संस्कार मनावर त्या वेळेस रुजविला म्हणून मी औद्योगिक क्षेत्रात नवीन नवीन प्रयोग करतो आणि सरांच्या आशीर्वादाने ते यशस्वीही होतात. मला सरांनी एक नजर दिली. त्या नजरेने आजही मी सूक्ष्म निरीक्षण करतो.

ताटके सरांचा एक शिकविण्याचा विशेष म्हणजे ते शास्त्रातील व्याख्या, संकल्पना आमच्या पाठ होण्यासाठी त्यावर श्लोक रचायचे.

'जेव्हा जेव्हा घडे क्रिया, तेव्हा तेव्हा प्रतिक्रिया' असे कितीतरी रसायनशास्त्रातील श्लोक आजही माझे पाठ आहेत.

सराशी आमचे खेळीमेळीचे संबंध होते. सुंदर शिकविण्याची त्यांची हातोटी होती. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करताना त्याला ते समजून घेत. सरांनी आम्हाला पुस्तकी ज्ञान तर दिलेच पण आम्हाला जगायलाही शिकवले.

त्यांची एक आठवण सांगतो -एस.एस.सी. परीक्षा

जवळ आली होती. मी खूप आजारी पडलो. परीक्षेला सुद्धा मी बसू शकणार नव्हतो. सरांना माझ्या आजारपणाची बातमी कळली. ते लगेच धावत माझ्या घरी आले. आस्थेने माझी चौकशी केली आणि माझी समजूत काढली व म्हणाले, ''तू एक तास पेपर लिही पण वर्ष वाया घालू नकोस. मी परीक्षेच्या काळात डॉक्टरची व्यवस्था करतो.'' सांगितल्याप्रमाणे ते एस.एस. सी. बोर्डात गेले व तेथून त्यांनी परवानगी आणली. व डॉ. नहार यांना विनंती केली. त्यांनीही ती मान्य केली. अशा प्रकारे त्यांनी मला परीक्षा देण्यास उद्युक्त केले आणि मी चांगल्या मार्कांनी पास झालो. शाळेच्या बोर्डावर माझे नाव आहे. सरांचे हे ऋण मी कसे विसरु ? सरांचा ध्यास होता. कोणत्याही क्षेत्रात नंबर १. तो ध्यास घेऊनच मी आज पुढे पुढे चाललो आहे. नंबर एक होण्यासाठी बरोबर आहेत. सरांचे संस्कार, सरांचा आशीर्वाद...

■■■

गुरुवर्य कै. ताटके सरांच्या स्मृतींना
विनम्र आदरांजली



शुभेच्छुक
विजय तडवळकर
विजयश्री प्रिंटर्स - अक्षय ट्रेडर्स
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दूरध्वनी : ५५३६९८९

# चिंतन - एका चैतन्यमयी जीवनाचे

- डॉ. प्र. ल. गावडे

जो खरा नेता असतो तो सर्व क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची मुद्रा उमटवीत असतो अशा अर्थाची इंग्रजी भाषेतील एक म्हण गुरुवर्य विष्णु त्र्यंबक ताटके यांच्या जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडविते. शिस्तप्रिय कष्टाळू विद्यार्थी, आदर्श शिक्षक, ध्येयवादी शिक्षण संस्थाचालक, अनेकांना सर्वार्थाने आधार देणारा कुटुंबप्रमुख, उत्तम वक्ता, कनवाळू समाजसेवक आणि विद्याभ्यासाला अत्यंत उपयुक्त झालेली शालेय पाठ्यपुस्तके लिहिणारा कुशल लेखक अशा सर्व क्षेत्रांत कै. गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके यांनी स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करताना आदर्श जीवनाचे प्रेरक चिंतन करण्याचे भाग्य लाभत आहे.

कै. ताटके आपले जन्मगांव असलेल्या माहुलीहून मॅट्रिकच्या परीक्षेसाठी पुण्यात आले ते अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ! प्रवासाला निघताना धरून फडक्यात बांधून दिलेली भाकरी त्यांनी एका हॉटेच्या दारापुढच्या उजेडात खाल्ली. दयाळू हॉटेल मालकाने त्या लहानग्या मुलाला हॉटेलात उरलेली पोळी-भाजी देऊन मदतीचा हात पुढे केला. मॅट्रिक परीक्षेला बसणारा हा मुलगा अत्यंत हुशार होता. त्याची स्मरणशक्ती अत्यंत तल्लख होती. 'कुमार संभव' सारखे अभिजात संस्कृत ग्रंथ त्याला मुखोद्गत होते. भेंड्या लावण्याच्या खेळात तो अत्यंत कुशल होता. असे ताटके नामवंत विद्यार्थी होते. वयाच्या बाविसाव्या वर्षी गणित विषय घेऊन ते बी. ए. झाले आणि अध्यापन व्यवसायात त्यांनी प्रवेश केला आणि सुमारे चाळीस वर्षे अध्यापनाचे कार्य अशा निष्ठेने, तळमळीने व आपले सर्वस्व झोकून देऊन केले की, शिक्षणक्षेत्रात गुरुवर्य ताटके यांची एक नाममुद्रा अनंत काल रेखाटलेली राहील.

गुरुवर्य ताटके यांच्या कर्तृत्वाचा खरा बहर झाला तो 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या संस्था उभारणीत व त्या संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व कला क्षेत्रांतील जडणघडणीत यासाठी स्वत:च्या ठायी असणाऱ्या अध्यापनाची कौशल्ये त्यांनी प्रयत्नपूर्वक विकसित केली. पूर्वतयारीशिवाय वर्गात अध्यापनासाठी जावयाचे नाही, आमच्या सूनबाईंना केलेला उपदेश त्यांनी स्वत: अंमलात आणला होता. विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञानासंबंधी कोणतेही प्रश्न आपणांस विचारावेत अशी स्वत:ची तयारी त्यांनी केली होती. आपला विद्यार्थी ज्ञानमय व्हावा यासाठी त्यांनी आपल्या संस्थेचे ब्रीदवाक्य 'ज्ञानमयो भव' असे केले होते. मॉडर्न हायस्कूलचा आपला विद्यार्थी भगवद्गीतेचा अध्याय पाठांतर केलेला, क्रीडांगणावर नित्य येऊन क्रीडाकौशल्ये आत्मसात करणारा व तालमीत जाऊन आपले शरीर बलदंड बनविणारा असावा असा त्यांचा ध्यास असे. शालांत परीक्षेच्या गुणवत्ता यादीत मॉडर्न हायस्कूलचे जे अनेक विद्यार्थी चमकले त्यामागे गुरुवर्य ताटके यांचे नेतृत्व व अध्यापन कौशल्य यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या अध्यापनाला प्रतिभेचा स्पर्श होता. भूगोल विषयाचे अध्यापन करताना भौगोलिक संशोधन करणाऱ्या ज्या जगद्‌विख्यात प्रवाशांनी विविध प्रवास केले त्यांच्या चित्तवेधक कथा सांगत सांगत ते भूगोल विषयाचे अध्यापन अत्यंत कुशलतेने करीत. त्यांच्या सामान्य ज्ञानाची व विषयावरील प्रभुत्वाची जाणीव झालेल्या एका विद्यार्थ्याने एका वर्षात ताटके सरांनी आपल्या अध्यापनात ३९४ म्हणी, ६८३ विविध विषयांची माहिती कशी उपयोगात आणली याची नोंद केली होती. आपल्या विद्यार्थ्यांवर त्यांचे कमालीचे प्रेम होते. श्री. माणिक जाजू ह्या नावाचे एक विद्यार्थी घरी जेवावयास आले असता ताटके सरांनी त्या दिवशी मुंबईच्या गव्हर्नर साहेबांचे जेवणाचे निमंत्रण सौजन्यपूर्वकतेने नाकारले व 'माझे विद्यार्थीच माझे गव्हर्नर'

असे उद्‌गार काढून आपल्या विद्यार्थीप्रेमाचा एक आदर्श उभा केला.

१९९१ च्या पानशेतच्या धरणफुटीने झालेल्या जलप्रलयात पुण्याचे जे नागरिक मॉडर्न हायस्कूलमध्ये आश्रयार्थ आले होते त्यांच्यासाठी 'पूरग्रस्त निवारा केंद्र' श्री. ताटके यांनी सुरू केले. त्या पूरग्रस्तांच्या मदतीकरिता श्री. ताटके यांनी हात पसरला तो आपल्या विद्यार्थ्यांपुढे - इतरांपुढे नाही. विद्यार्थ्यांवर हा विश्वास व ही निष्ठा ताटके सरांच्या ठायी होती.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसाटीच्या विविध संस्था उभारणीत श्री. ताटके यांनी घेतलेल्या परिश्रमांना खरोखरच तोड नाही.जंगली महाराज रस्त्यावरील ज्या खडकावर सोसायटीच्या विविध संस्था उभ्या आहेत, तो खडक साफ करून घेण्यात, त्यातील खाचखळगे भरून काढण्यात व दिवसाचे तासन् तास तेथे उभे राहून शाळा-महाविद्यालयाच्या इमारती उभ्या करण्यात श्री. ताटके यांनी दाखविलेली निष्ठा, संस्थेवरील प्रेम खरोखरच अविस्मरणीय होय. संस्थेत शिक्षक, मुख्याध्यापक, आजीव सदस्य, कार्यवाह अशा विविध नात्यांनी त्यांनी केलेले कार्य सर्वांना प्रेरक व मार्गदर्शक ठरावे असेच आहे.

शिक्षणसंस्थेचा हा संसार उभाकरताना आपल्या वैयक्तिक संसारातही श्री. ताटके यांनी अनेकांना आधार दिला, धीर दिला. स्वत:च्या संसाराबरोबरच दोन दु:खग्रस्त बहिणींचे संसार अन्य आधारासाठी आलेले नातेवाईक - या सर्वांसाठी ते मेरुसारखे धैर्याने उभे राहिले. या प्रचंड जबाबदारीत खचून न जाता त्यांनी जातिवंत शिक्षकाला आवश्यक असणारे अध्ययन लेखन चालूच ठेवले. भूगोल, बीजगणित, विज्ञान, रसायन, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, अंकगणित इ. विषयांवर एकूण त्यांनी अठरा पुस्तके प्रसिद्ध कली.

या सर्व शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळे गुरुवर्य ताटके यांना आदर्श शिक्षक म्हणून पहिले राष्ट्रपती पदक केंद्र सरकारने बहाल केले आणि

*'स्मिते जयांची चैतन्य फुले ।*
*शब्द जयांचे नवदीप कळे ।*
*कृतीत ज्यांच्या भविष्य उजळे ।*
*प्रेमविवेकी जे खुलती'*

अशा शब्दांत कवी बोरकर यांनी आदर्श व्यक्तिमत्त्वाबद्दल केलेले वर्णन गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके यांनी आपल्या ध्येयवादी, ज्ञानमय, कृतिवंत जीवनाने साकार केले.

गुरुवर्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या चैतन्यमय जीवनाचे चिंतन करून त्यांना आदरांजली वाहण्याची संधी मिळाली, त्याबद्दल वाटणारी कृतज्ञता नमूद करणे माझे कर्तव्य होय.

■ ■ ■


॥ जय श्रीराम ॥

# दिनेश पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर

**चव्हाण नगर, २४/१५,**
**पोलिस वायरलेस कॉलनी,**
**बाणेर रोड, पुणे.**
**फोन : ९८२३१-४३९९३**

**प्रोप्रा. : दिनेश मोरे**

*आमच्याकडे बंगले, फ्लॅट व इमारती इत्यादींचे रंगकाम केले जाते.*

# कै. वि. त्र्यं. ताटके - सव्यसाची संस्थाचालक

- प्रा. प. स. चिरपुटकर

कै. ताटके सर व माझा परिचय १९७० सालच्या जानेवारीत झाला. त्याची पार्श्वभूमी अशी आहे. प्रो. ए. सोसायटी या नामवंत शिक्षणसंस्थेचे त्या वर्षीच्या जूनपासून नव्याने कॉलेज सुरू होणार होते. नव्याने सुरू होणाऱ्या त्या कॉलेजमध्ये नोकरी करण्याची माझी इच्छा होती. त्यानिमित्त आमच्या काही भेटीगाठी झाल्या. लवकरच माझी गणित व संख्याशास्त्र विभागप्रमुख म्हणून नियुक्ती झाली. माझ्याप्रमाणेच इतर काही विभागप्रमुखांच्या नियुक्त्या झाल्या. जूनमध्ये कॉलेज रीतसरपणे सुरू झाले.

जानेवारी ते जून १९७० हा सहा महिन्याच्या काळात आमच्या भेटी होत असत. कॉलेज सुरू होण्यापूर्वीचे आवश्यक ते काम म्हणजे शास्त्र विभागांसाठी लागणारी उपकरणे, ग्रंथालयासाठी पुस्तके, वेळापत्रके इत्यादी कामे आम्ही त्या पाच-सहा महिन्याच्या काळात केली. कै. ताटके सर प्रो. ए. सोसायटीचे कार्यवाह होते. ते सर्व भेटींच्या वेळेस हजर असत. शिवाय कॉलेज सुरू झाल्यावरही काही वर्षे ते संस्थेचे कार्यवाह होते. त्या काळात कॉलेजमध्ये वेगवेगळया कार्यक्रमांना ते उपस्थित राहात असत.

त्या सर्व काळात संस्थाचालक म्हणून त्यांचे जे दर्शन झाले ते मी या लेखात मांडणार आहे.

मॉडर्न कॉलेज जून १९७० मध्ये सुरू झाले. त्यावेळी ताटके सर वयाच्या सत्तरीला आले होते. डेक्कन जिमखान्यावर फर्ग्युसन कॉलेज व गरवारे कॉलेज ही दोन नामवंत कॉलेजेस होती. त्यामुळे आणखी एक कॉलेज काढणे मोठ्या धाडसाचे काम होते. प्रो. ए. सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षण घेवून एस. एस. सी. परीक्षेत उत्तुंग यश मिळवून उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी अन्य शिक्षणसंस्थांच्या कॉलेजेस्‌मध्ये जात असत. तसे होऊ नये म्हणून मॉडर्न कॉलेजची स्थापना करत आहोत असे ताटके सर म्हणत असत.

मॉडर्न कॉलेज जूनमध्ये प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी ५-६ महिने आमच्या सभा होत असत. त्या मॉडर्न हायस्कूलच्या ग्रंथालयात होत असत. अशाच एका सभेमध्ये ताटके सरांनी विचारले, ''आपण कला, शास्त्र आणि वाणिज्य अशा तिन्ही शाखांमधील पहिले दोन वर्ग म्हणजे प्री. डिग्री. आणि एफ्. वाय. सुरू करीत आहोत. साधारण किती विद्यार्थी येतील असा तुमचा अंदाज आहे ?''

यावर कुणी काही, कुणी काही आकडे सांगितले. सर्वांचे बोलून झाल्यावर ताटके सर म्हणाले, ''मला वाटते ७०० ते ७२५ विद्यार्थी प्रवेश घेतील.'' आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचा अंदाज तंतोतंत खरा ठरला.

१५ जून १९७० रोजी रीतसरपणे कॉलेज सुरू झाले. त्या दिवशी प्राचार्यांच्या चेंबरमध्ये आम्ही प्राध्यापक मंडळी आणि अन्य कर्मचारी वर्ग जमलो होतो. ताटके सरांच्या सूचनेनुसार श्री. पाठक गुरुजी यांनी काही वैदिक प्रार्थना म्हटल्या. ताटके सरांनी छोटेखानी भाषण दिले. आपण नव्याने सुरू करत आहोत. आपापल्या विषयाची जबरदस्त तयारी करून विद्यार्थ्यांना शिकवा. एकोप्याने काम करा, विसंवाद होऊ देऊ नका. टीमवर्कने उत्तम प्रकारे काम करा.'' एवढे बोलून ते पुढे म्हणाले, ''ग्रंथालय, प्रयोगशाळा, अद्ययावत ठेवा. कॉलेज नवीन आहे म्हणून आमच्याकडे 'हे नाही, ते नाही' असे दीनवाणे म्हणू नका. तुम्हाला जी पुस्तके, उपकरणे हवी असतील ती आम्हाला सांगा. सर्वांची पूर्तता केली जाईल. आपली प्रो. ए. सोसायटी १९३४ साली स्थापन झाली आहे. तुमच्यामागे संस्थेची तीन तपांची पुण्याई उभी आहे.''

ताटके सरांची अशी सर्व भाषणे आत्मविश्वासाने भरलेली असत. अत्यंत तडफदारपणे ते बोलत असत. या संस्थेत नव्यानेच आलेल्या आमच्यावर त्याचे शुभसंस्कार होत असत.

मॉडर्न कॉलेज नव्यानेच स्थापन झालेले असल्यामुळे आम्हाला तेथे सर्वच गोष्टी नव्याने करावयाच्या होत्या. अगदी महाविद्यालयाचा प्रवेशअर्ज, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची निवड या कामापसून सुरुवात करावयाच होती. प्रत्यक्ष कॉलेज सुरू झाल्यावर कला, विज्ञान, वाणिज्य ह्या तिन्ही शाखांची असोसिएशन्स्, 'मॉम' हे भित्तिपत्रक एन्. एस्. एस्. , एन्.सी.सी. स्टार ॲकेडमी असे अनेकविध उपक्रम आम्ही त्या काळात सुरू केले. अशा सर्व उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी आणि नंतरही काही सभांना ताटके सर जातीने उपस्थित राहात असत. एवढेच नव्हे तर चर्चेतही भाग घेत असत.

स्टाफ ॲकेडमीच्या अशाच एका सभेमधली ही आठवण आहे. प्राध्यापकांनी भरावयाचा इन्कमटॅक्स हा विषय होता. त्यासाठी एका ज्येष्ठ इन्कम टॅक्स ऑफिसरना निमंत्रित करण्यात आले होते. मुख्य व्याख्यान झाल्यावर प्रश्नोत्तरे, चर्चा हा भाग सुरू झाला. मला अजूनही स्पष्टपणे आठवते की ताटके सर प्रश्न विचारायवास उठले. ते म्हणाले, "आपण आयकर भरण्यासंबंधी उपयुक्त माहिती दिली, त्याबद्दल धन्यवाद. आयकर भरण्यासंबंधी वर्तमानपत्रात येणारी जाहिरात व व्यक्तींना येणारी पत्रे यातील भाषा पार कठोर असते. असे न झाल्यास दंड होईल, तुरुंगवासाची शिक्षा होईल इ. इ."

एवढे बोलून ताटके सर पुढे म्हणाले, "माझ्यासारख्या शिक्षकाला तर अशी नोटीस अगर पत्र वाचून छातीत धडकी भरते. जो देय आयकर असेल तर आमच्याकडून अवश्य घ्या. पण ही दमदाटीची भाषा कशाला ?"

यानंतर ताटके सरांनी एक नितांत उपयुक्त विचार मांडला. ते म्हणाले, " **You should suck honey without damaging the flower**" अशी वृत्ती व भाषा असावी.

अशा काही निमित्ताने त्यांच्यातील कुशल संस्थाचालक दिसत असे. शाळा-कॉलेजचे प्रशासन चालवत असताना असे जाणवते की सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी यांच्या आवडी निवडी व क्षमता सारख्या नसतात. कुणाला विद्यार्थ्यांना अधिक शिकवून त्यांचे गुण वाढावेत यामध्ये आनंद वाटतो, कुणाला विद्यार्थ्यांच्या क्रीडाप्राविण्यात गती असते, तर दुसऱ्या कुणाला विद्यार्थ्यांमधील कलागुण विकसित करावे असे वाटते. संस्थेचा कारभार चालविताना अशा सर्व प्रकारच्या लोकांची गरज असते. त्यांच्या आवडीनिवडी व क्षमता लक्षात घेऊन त्यांच्याकडून संस्थेला उपयुक्त काम करून घेणे यामध्ये उत्तम संस्थाचालकाचे कौशल्य असते.

मॉडर्न कॉलेज ताटके सरांनी स्थापन केले. अवघ्या ७००-७२५ विद्यार्थी संख्येवरून सुरुवात झालेल्या या कॉलेजची विलक्षण वेगाने प्रगती झाली. ताटके सरांचे निधन १९८० साली झाले. नंतरच्या काही वर्षांत मॉडर्न कॉलेज व प्रो. ए. सोसायटीची झपाट्याने वाढ झाली. कधी कधी असे वाटते की ताटके सरांना अजून काही वर्षांचे आयुष्य लाभले असते तर त्यांचे स्वप्न साकार झाल्याचे त्यांना पहावयास मिळाले असते. पण असे तरी कसे म्हणावे ? शिक्षणक्षेत्रातील व संस्थाचालकांपैकी ते एक सव्यसाची व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी ही सर्व वाढ व विकास मन:चक्षूंनी पाहिला असणार. म्हणूनच ते स्वप्न प्रत्यक्षात उतरले.

पुण्याची म्हणून काही खास वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक आहे विविध संस्था व त्या संस्था नावारूपाला आणणाऱ्या व्यक्ती, अशा संस्था, साहित्य, संगीत, शिक्षण, क्रीडा अशा अनेकविध क्षेत्रांत कमा करणाऱ्या आहेत.

काही लोकांनी अपार श्रम करून, कष्ट करून, त्याग करून अशा संस्था मोठ्या केल्या आणि अशा संस्था मोठ्या करता करता त्या व्यक्तींना मोठेपण प्राप्त झाले. काही ठळक नावे घ्यावयाची झाल्यास इतिहास संशोधन मंडळ आणि कै. दत्तो वामन पोतदार, नू. म. विद्यालय व प्रिं. नारळकर, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर व डॉ. रा. ना. दांडेकर अशी नावे घेता येतील. तसेच प्रो. ए. सोसायटी व मॉडर्न हायस्कूलशी ताटके सरांचे नांव निगडित आहे. त्यांच्या आगेमागे कै. शंकररावजी कानिटकर व कै. चाफेकर सर यांची नावे घेता येतील.

ताटके सरांच्या छोट्या-मोठ्या भाषणातून व इतर वेळच्या बोलण्यातून प्रो. ए. सोसायटीत नव्यानेच आलेल्या आमच्यावर शुभसंस्कार होत असत. हे मी वरती एके ठिकाणी लिहिले आहे. योगायोगाची गोष्ट अशी की, मॉडर्न कॉलेजच्या स्थापनेला १९९५ च्या जूनमध्ये पंचवीस वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे १९९४-९५ हे शैक्षणिक वर्ष आम्ही रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. मी त्यावेळी कॉलेजचा प्राचार्य होतो. १९७० साली कॉलेज सुरू होताना काही वैदिक मंत्र व प्रार्थना म्हणून कॉलेजच्या कामकाजाला सुरुवात झाली होती. रौप्य महोत्सवी वर्षाच समारंभ सुरू करताना वैदिक पाठशाळेच्या वेदमूर्ती घैसास गुरुजी यांच्या वैदिक मंत्रांच्या पठणाने आम्ही शुभारंभ केला.

मॉडर्न कॉलेज स्थापन केले तेव्हा ताटके सर वयाच्या सत्तरीला आले होते. तरीही मोठ्या उमेदीने व उत्साहाने कॉलेज उभारणीचे काम ते करीत होते. एकदा कुणीतरी त्यांना विचारले, ''मॉडर्न हायस्कूलचे काम करत होता तेव्हा तुम्ही तरुण होता. वर्गात जाऊन स्वत: शिकवीत होता. आता या वयात हे कॉलेज कसे नावारूपाला येणार ?''

त्यावर ताटके सर म्हणाले, ''कॉलेजमध्ये मी वर्गात जाऊन शिकवू शकणार नाही हे खरे आहे. पण तरुणपणीचा उत्साह व जिद्द अजूनही माझ्यात आहे. या कॉलेजमध्ये जे प्राध्यापक आम्ही नेमू त्यांना किंवा संस्थाचालक व शिक्षक म्हणून असलेल्या माझ्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे मी प्रेरणा देत राहीन.

त्यांचे ते म्हणणे त्यांनी **''I will inspire my young professors to build up the new college''**

त्यांचे ते म्हणणे त्यांनी अक्षरश: खरे केले. मला असे आठवते की काही काळ प्रो. ए. सोसायटीचे ऑफिस आमच्या कॉलेजच्या प्राचार्यांच्या चेंबरशेजारील खोलीत होते. सोसायटीचे कार्यवाह या नात्याने ताटके सर तेथे रोज येत असत. रोज दुपारी १.३० ते २ चे सुमारास शनिवार पेठेतील त्यांच्या राहत्या घरापासून चालत चालत ते मॉडर्न कॉलेजमध्ये येत असत. पांढरे शुभ्र धोतर, काळा कोट, काळी टोपी, पायात वहाणा, हातात एखादे पुस्तक असे साध्या वेषातील त्यांचे व्यक्तिमत्त्व अजूनही डोळ्यांपुढे येते. बरेच वेळा असे वाटते की कुठल्याही प्रकारचा लाभ नसताना त्यांनी आणि त्यांच्या पिढीतील लोकांनी ज्या शिक्षणसंस्था आणि अन्य संस्था उभ्या केल्या, त्यामागच्या प्रेरणा काय असतील ? काही शिक्षकांनी वा निस्वार्थी लोकांनी एकत्र येऊन वेळप्रसंगी अर्धपोटी राहून महाराष्ट्रातल्या शिक्षणसंस्था स्थापन केल्या. त्या नावारूपाला आणल्या. स्वातंत्र्यपूर्व काळातील ही पिढी. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जसे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी अशा लोकोत्तर विभूती झाल्या, तशाच प्रकारचे काम करणाऱ्या व स्वत:ला झोकून देणाऱ्या व्यक्ती विविध क्षेत्रांत झाल्या. अशा काही व्यक्ती बघण्याचे भाग्य आम्हाला लाभले. अशाच व्यक्तींपैकी ताटके सर एक होते. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !

■■■

# कर्तृत्वसंपन्न व निगर्वी अध्यापक

- श्री. विनायक शंकर गोखले

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात अशा काही गोष्टी घडतात की ज्यामुळे आयुष्याला वेगळेच वळण लागते. विष्णु त्र्यंबक ताटके यांच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये मला शिक्षकाची नोकरी करण्याची संधी मिळाली आणि माझ्या आयुष्याला एक चांगले वळण लागले.

ताटके सरांची व माझी गाठ पडल्याला आता ५० वर्षांपेक्षा अधिक काळ गेला. पुण्याच्या 'टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन' या संस्थेत मी बी. टी. (सध्या बी. एड्.) चा अभ्यास करण्यासाठी नाशिकहून पुण्यास आलो. कानिटकर-ताटके-कोपरकर या अध्यापक त्रयींच्या कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वामुळे महाराष्ट्रात एक अग्रेसर शिक्षणसंस्था म्हणून प्रसिद्धी मिळालेल्या मॉडर्न हायस्कूलच्या वैभवाचा काळ होता. ताटके सरांची व माझी गाठ १९५२ साली ९ वीच्या वर्गात इंग्रजीच्या तासाला झाली. त्यावेळी ते संस्थेचे सचिव होते व माझा इंग्रजीचा पाठ पाहण्यासाठी ते वर्गात संपूर्ण तास थांबले होते. पहिल्याच भेटीत माझ्यावर त्यांची छाप पडली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी शिक्षकाचे काम सुरू केले.

श्री. ताटके सरांची बुद्धिमत्ता, वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची क्षमता, आस्थेवाइकपणा व अत्यंत साधी राहणी यांचा प्रभाव माझ्यावर पडला. ताटके सरांच्या कर्तृत्वाचा आलेख बघण्याचे भाग्य मला लाभले. ११ वीच्या वर्गाला गणित शिकविताना ताटके सरांच्या अध्यापन कौशल्याने प्रभावित झालेले विद्यार्थी मला दररोज पहावयास मिळत. कारण त्यांचा दुसरा तास असे व माझा त्याच वर्गावर तिसरा तास असायचा. तास संपल्यानंतर उत्साहात हसतहसत वर्गातून बाहेर पडणारे ताटके सर आजही माझ्या डोळ्यांसमोर येतात. त्यांच्या रक्तात व स्वभावातच शिक्षणकार्याचे बीज असावे असे वाटते.

शाळेत दर महिन्याला शिक्षकसभा होत. या शिक्षकसभा म्हणजे आम्हा शिक्षकांना प्रशिक्षणच असे. प्रत्येक विषयाचे अध्यापन कसे करायला हवे याचा वस्तुपाठ म्हणजे या सभा. सभेच्या दुसऱ्या दिवशी आम्ही शिक्षक नवीन जोमाने कामाला लागत असू. विद्यार्थ्यांमध्ये मिळून मिसळून वागणारे, शिक्षकांना आपुलकीची वागणूक देणारे, पालकांशी सतत संपर्कात असणारे ताटके सर म्हणजे उत्सहाचे मूर्तिमंत प्रतीकच होते.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा मी आजीव सेवक व्हावे असा प्रस्ताव त्यांनी माझ्यापुढे मांडला. त्यादिवशी मला झोप आली नाही. संस्थेत काम करायला लागून मला जेमतेम १० वर्षे झाली होती. त्यांचा प्रस्ताव स्वीकारावा किंवा नाही या विचाराने मला अस्वस्थ केले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता नातू बागेतल्या माझ्या घरी, तीन मजले चढून ताटके सर आले. ''काय वहिनी, कोठे आहेत आपले यजमान ?'' माझ्या पत्नीकडे त्यांनी माझी चौकशी केली. ताटके सर घरी आले हे पाहून ती जरा गोंधळून गेली. मॉडर्न हायस्कूलचे मुख्याध्यापक, संस्थेचे सेक्रेटरी एका शिक्षकाकडे आले. या विचाराने ती भारावून गेली. परंतु लगेच ताटके सर म्हणाले, ''एक अर्धा कप चहा टाका वहिनी. मी तुमचा फार वेळ घेत नाही. तुमच्या यजमानांना सांगा आजीव सेवकपद स्वीकारणे हे सतीचे वाण आहे. पण काळजी करू नका. संस्थेला चांगले आजीव सवक हवे आहेत...'' प्रापंचिक जबाबदाऱ्या सांभाळून संस्थेचे आजीव सदस्य म्हणून काम करणे ही तारेवरची कसरतच होती. परंतु ते अवघड कार्य मी ताटके सरांच्या प्रेरणेमुळेच करू शकलो.

सुसंस्कार, सहकार्य. विद्यार्थ्यांविषयी तळमळ या सर्व गुणांमुळे ताटके सर संस्थेचे उत्तम कार्यवाह ठरले. संस्थेच्या नियामक मंडळाच्या प्राचार्य सुरुसाहेब अध्यक्ष व ताटके सर सचिव यांच्यातील एकोप्यामुळे सभांचे काम उत्तम पार पाडले जाई. मॉडर्न कॉलेज, इंग्रजी माध्यमाची शाळा या सर्व संस्था यांचे प्रेरणास्थान म्हणजे ताटके सर होते.

ताटके सरांनी गणित व शास्त्र या विषयांवर अनेक पाठ्यपुस्तके लिहिली. आपल्या अनुभवाचा फायदा त्यांनी या पुस्तकांच्या रूपाने सर्व महाराष्ट्राला करून दिला. त्यांनी शिक्षकांसाठी कार्यशाळा घेतल्या. व्यापक अर्थाने त्यांनी संस्थेचे व्यवस्थापन व प्रशासन सांभाळले. बालक, पालक, चालक, शासक या सर्वांना विद्यार्थ्यांच्या हितासाठी सांधणारा एक दुवा म्हणजे ताटके सर.

कै. कानिटकर, कै. ताटके, कै. कोपरकर या सुरुवातीच्या मंडळींनी लावलेले संस्थेचे 'इवलेसे रोप' त्याचा वृक्ष आता 'गगनावरी गेला' आहे. संस्थेच्या चालकवर्गामध्ये आज संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. सध्याचे गव्हर्निंग बॉडीचे अध्यक्ष डॉ. एकबोटे हेही मॉडर्नचे माजी विद्यार्थी. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची भरभराट पाहिली, की मन आनंदान भरून येते. ताटके सरांच्या स्मृतींना विनम्र प्रणाम ! ■■■


# Setoo Security Service & Fire Consultants

206/1, Raj Plastic Building, Opp. Vishal Theatre,
Pimpri, Pune 411018.
Tel. : (O) 7484443 / 7464164
(R) 7494184 (M) 9890246474

*Strongest Chain of Asset Protection*

**Setoo helps you by offering**

1. **Investigation Wing**
   a) Misappropriation of Funds
   b) Fraud
   c) Pre & Post Employment Checkup
   d) Document Verification
2. **Security and Fire Training Wing**
   a) Identify measures and control
   b) Cost effectiveness
   c) Evaluates Security Techniques
   d) Fire protection survey and system recommendations.

# आमचे ताटके सर

- डॉ. अजित शंकर गोळविलकर

मी ज्या काळात मॉडर्न हायस्कूलचा विद्यार्थी होतो, त्या काळात खरं तर सर मुख्यत्वे प्रशासनप्रमुख असल्यामुळे त्यांनी कधी प्रत्यक्ष वर्गामध्ये तास घेतले नाहीत किंवा प्रत्यक्ष शिकविले नाही. त्यांचे गणितावरील प्रभुत्त्व मात्र आम्ही त्यांच्या गणिताच्या पाठ्यपुस्तकावरून (ताटके, पावटे) अनुभवले. १९६१ ते ६७ हा शाळेतला काळ माझ्या आयुष्यातला अतिशय महत्त्वाचा जडणघडणीचा काळ होता. अतिशय कठीण परिस्थितीत आमचे वडील आम्हा भावंडांना लहानाचे मोठे करीत होते. अशा परिस्थितीत जो वेळ मिळेल त्या वेळात अभ्यास करून वर्गामध्ये पहिला क्रमांक कसा कायम ठेवायचा व त्याच्या जोडीला खेळात, वक्तृत्व किंवा इतर उपक्रमांमध्ये भाग घेणे याकडे मी सर्व लक्ष केंद्रित करीत असे व या भांडवलाचा आजपर्यंतच्या आयुष्यात मला फायदा झाला आहे. या जडणघडणीमध्ये ज्या काही आदर्श व्यक्तींचा माझ्या मनावर ठसा उमटला किंवा ज्यांच्याकडून प्रेरणा मिळाली त्यातील एक व्यक्ती म्हणजे ताटके सर.

सातवी इयत्तेत पहिला क्रमांक मिळाल्यावर सरांनी मुद्दाम मला मुख्याध्यापक कार्यालयात बोलावले व माझे अभिनंदन केले. त्याचबरोबर शास्त्र व गणित या विषयात प्रत्येक पायरी/टप्पा नीट समजल्याशिवाय पुढे जाऊ नये असे सांगून शास्त्रावरील दोन पुस्तके वाचावयास दिली.

शाळेमध्ये कोणी इन्स्पेक्टर किंवा पाहुणे आले की, सर बहुधा आदर्श वर्ग म्हणून आमच्या वर्गावर हमखास घेऊन येत आणि एखादा आमच्या अभ्यासाशी किंवा सामान्य ज्ञानाशी संबंधित प्रश्न ते मला विचारीत. अशा विश्वासाला पात्र ठरण्याकरिता कायम सतर्क व प्रयत्नशील राहावे लागत असे.

अविश्रांत परिश्रमाचे मूर्तिमंत रूप म्हणजे सरच ! माझ्या माहितीप्रमाणे त्यांचा दिवस पहाटेपासूनच सुरू होत असे. दोन-तीनदा त्यांच्याकडे माझ्या काही मित्रांच्या प्रवेशाच्या संदर्भात घरी जाण्याचा प्रसंग आला. तेव्हा सकाळी ७ ते ८ च्या दरम्यान भेटीची वेळ मिळाली व त्यावेळीही सर जणू शाळेत जायच्या तयारीतच होते असे वाटले.

येथे सांगायचा मुद्दा खरं तर असा की, सर कायम अतिशय टापटीप असायचे - स्वच्छ धुतलेले धोतर-कुर्ता व खादीचे जाकिट हा त्यांचा पेहराव असे. व्यवस्थित व टापटीप राहण्याचा धडा मला त्यांच्यापासूनच मिळाला. दिवसाची त्यांची दिनचर्या फक्त शाळेशी निगडित कामांची भरगच्च असायची. कधीही जरासाही वेळ ते वाया घालवीत नसत. शाळेत आल्यावर इतर कामांबरोबर शाळा स्वच्छ व सुंदर कशी ठेवता येईल, सर्व विद्यार्थी कसे शिस्तबद्धपणे आपला वेळ घालवतील याकडे त्यांचा विशेष कटाक्ष असे.

सरांकडे काही कामानिमित्त गेलो असतां त्यांनी मला आपले काम पटकन् होण्याच्या दृष्टीने पूर्वतयारीने कसे जायचे याचा धडा दिला. स्टेपलर, पन्च, टोच्या, दोरा, तांबडी पेन्सील इत्यादी वस्तू नेहमी बाळगण्याचा सल्ला दिला. सर्वच बाबतीत अशी पूर्वतयारी करण्याचा उर्वरित आयुष्यात मला फायदा झाला. सरांची प्रतिमा एक अतिशय कडक मुख्याध्यापक अशी होती आणि सर्व शिक्षक व विद्यार्थी त्यांना घाबरत. पण खरे तर आपण नियमांचे पालन करणारे, शाळेला आपले मानणारे असू, तर सरांची भिती बाळगण्याचे कारणच नव्हते.

त्या काळात पुण्यातील महत्त्वाच्या समारंभात शिक्षण क्षेत्रातील तज्ञांना महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्याच हस्ते समारंभाची सुरुवात व समारोप होत असत. त्यामध्ये फर्ग्युसन, स. प., वाडिया महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बरोबरीने मॉडर्नच्या मुख्याध्यापकांचे - ताटके सरांचे स्थान असे. त्याच काळात सरांचा राष्ट्रपतींच्या हस्ते उत्कृष्ट शिक्षक म्हणून बहुमान झाला होता. त्या काळात देशात बहुमान होणाऱ्या मोजक्या शिक्षकांपैकी सर एक होते. त्या काळामध्ये सरांनी पुणे शहराचे प्रतिनिधित्व केले असे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही अशी अतिशयोक्ती होणार नाही.

'गेले ते दिवस' असे म्हणणे श्री. अनंत कणेकरांना मान्य नव्हते, पण मला मात्र म्हणावेसे वाटते - 'गेले ते दिवस...'

■ ■ ■

*Fond Memories of*

# A Sage Like Teacher : Shri V. T. Tatke

- by **V. G. JOSHI** (M. A.)
Vice-Principal (Retd.)
Modern College, Pune 5.

The first encounter that I had with him was at the time of my interview for Lecturer's post in Modern College, Shivajinagar, Pune, some time during May 1972. He was present as the Secretary of P. E. Society, Pune. He was a very simple person, wearing a black cap, coat and dhoti. Though simple thus in his dress, he had an imposing personality. The manner in which he was interviewing me, it appeared that he was a man of simple living and high thinking. I learnt from my acquaitance with him that he had a great sense of humour. Though he used to teach Algebra, Geometry and Trigonometry he was a deeply read person of English classics. Whenever I used to meet him at his residence I could hardly resist the temptation of going through the shelves for ascertaining what titles of English Classics those personal library shelves decorated his possession of books !

I remember he had asked me a question on going through my bio-data, "You are a qualified architect and you have applied for the post of Lecturer in English by virtue of your having completed Post Graduation with Entire English, i. e. having taken all eight papers of English, would you if selected for the post, be in a position to stick to the job till you complete your tenure of service as a Lecturer in English or would you give it up half way as you are an architect, for carrying out that profession successfully ?" My answer to his querry was simple that my first love is studying English literature and sharing my knowledge if given a chance, with my students. I was selected and I am glad today that I could keep my words of promise given to him. I carried out my full tenure of service as a Lecturer in English and for the last couple of years I was being honoured by P. E. Society and its Chairman Dr. G. R. Ekbote to lead Arts Faculty, as Vice-Principal. I could not forget that in the very same room during the tenure as Secretary of Progressive Education Society, he used to occupy the same room adjoining the Principal's chamber. Exactly at 4.00 p.m. he would come to his Secretary's office, he was very punctual and used to work very hard. He was also holding the post of Head Mater, Modern High School for a number of years, there are hundreds of his students,

who are occupying high positions in different walks of life.

I am right glad that Progressive Education Society is celebrating his Birth Centenary and consider it to be a matter of pride for me that I had the opportunity to meet him and work under his able guidance as the Secretary of the Society. Shri. V. T. Tatke, as I have stated above, was thus a man of simple living but high thinking. In concluding my memories I would like to quote him as he had dreamt and aspired to see "Modern College, as a quality college, in Pune. Of course, he wished that the student strength should not exceed one thousand." Though the strength has multiplied today, it has crossed six thousand, still under the able leadership of present Principal A. G. Gosavi and his team, I am happy to state that ours is one of the best Colleges in Pune.

With high sense of respect and reverence I pay my tribute to the sage-like teacher from the bottom of my heart, on his Birth Centenary being celebrated durign 2002-2003.

He had succeeded in cleansing his mind from all alien thoughts and made his heart so pure and shining that it was ever reflecting Divine radiance and glory. He always had cherished smile on his frace. That is how I ever remember him and will continue to remember ! ■ ■ ■

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेतील
प्रकाशमान थोर तपस्वी ज्ञानमहर्षी
मा. कै. ताटके सरांच्या जन्मशताब्दी
वर्षाच्या सोहळ्याच्या प्रसंगी
त्यांच्या पुण्यप्रद स्मृतीला
विनम्र अभिवादन
स्नेहांकित
संपादक
मा. श्री. सुरेश साखवळकर
साप्ताहिक अंबर
(स्थानिक लोकाभिमुख वृत्तपत्र)
तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे
दूरध्वनी : २३१०३, २६१९८, २६१९९

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेतील
एक थोर तपस्वी ज्ञानसंपन्न शिक्षक
मा. कै. ताटके सरांच्या जन्मशताब्दी
सोहळ्याच्या प्रसंगी
त्यांच्या पुण्यशील स्मृतीला विनम्र अभिवादन
स्नेहांकित
श्री. शैलेश शहा श्री. दीपक शहा
नम्रता ग्रुप
प्रमोटर्स ॲन्ड बिल्डर्स
तळेगांव दाभाडे, जि. पुणे ४१०५०६.
फोन : २२५६२, २२४८१

# कृतकृत्यता

- सौ. इंदुमती भडभडे

कृतकृत्यता वाटावी असा हा आजचा दिवस.

महाराष्ट्राचे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ श्री. वि. त्र्यं.ताटके माझे आदरणीय काका, यांच्यासंबंधी एक गौरवग्रंथ प्रकाशित करायचा निर्णय संस्थेने घेतला. त्यांच्यासंबंधी वाटणाऱ्या माझ्या कृतज्ञतेच्या भावना व्यक्त करण्याची संधी त्यामुळे मला मिळाली.

आनंदाचे डोही आनंद तरंग ॥

तुकारामाच्या अभंगाचे स्वर माझ्या कानावर पडताच मी तल्लीन झाले आणि पाण्यावरचे तरंग जसे आपल्याकडे येताना दिसतात तशाच आप्पांच्या कर्तृत्वाचा आनंद देणाऱ्या आठवणी माझ्या डोळ्यासमोर येऊ लागल्या.

हिमालयात गंगोत्रीजवळ गोमुखातून प्रकटणारी गंगा कलकत्त्याजवळ अनेक उपनद्यांसकट त्रिभुज प्रदे तयार करीत सकल जनांना तोषवीत विशाल रूप धारण करून कृतार्थतेने सागराला मिळताना पाहून मनाला जो आनंद मिळतो अगदी तसाच आनंद आप्पांच्या कर्तृत्वाचा चढता आलेख आठवून माझ्या मनाला होतो. या स्फूर्तिदायक आलेखाचा आप्पांच्या कर्तृत्वाचा प्रत्येक टप्पा पाहण्याचा पुण्ययोग मला प्राप्त झाला हे माझे भाग्य !

शिक्षणकार्याचा मेरूमणी असणाऱ्या माझ्या काकांच्या आठवणी सांगताना माझे मन पाखरू खूपखूप वर्षामागे भूतकाळात गेले आहे.

मी ५ वी पासून कॉलेजची दोन वर्षे होईपर्यंत मी आप्पांकडेच राहात होते. नंतर माझे लग्न झाले. आप्पांचे घर म्हणजे गुरुकुल होते. आप्पांच्या दोन्ही भावांची बहिणीची मुले आम्ही सर्व आप्पांकडेच शिकावयास होतो. घरातील अत्यंत पवित्र, प्रेमळ वातावरण ! त्या आठवणी अत्यंत रम्य आनंददायी आहेत. त्या वातावरणामुळे जे संस्कार झाले त्यांचा पुढील जीवनात फारच उपयोग झाला.

योजनाबद्ध जीवनाचा आप्पांनी पायाच घालून दिला. आप्पांच्या जीवनात ज्या व्यक्ती आल्या,ज्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेतली, त्या सर्व व्यक्ती आप्पांना सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा गौरीशंकर मानतात. अत्यंत तडफदार, आश्वासक, आदरणीय व्यक्तिमत्त्व मला मार्गदर्शक म्हणून लाभले. आप्पांचा आदर्श डोळ्यांपुढे असल्याने मी शैक्षणिक व्यवसाय पत्करला. पुणे सेवासदन संस्थेत शिक्षिका म्हणून आजीव सेविका म्हणून, मुख्याध्यापिका, जनरल सेक्रेटरी म्हणून काम केले.

माझ्या डोळ्यासमोर आप्पांचे कार्य सातत्याने होते. आप्पांनी विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार व्हावेत यासाठी अध्यापन हे एक व्रत म्हणून चालविले. अध्यापन हा एक आनंददायी व्यवसाय आहे, हे आप्पांनी स्वत:च्या वागण्याने, कृतीने आमच्या मनावर बिंबवले. कोणतेही काम करताना मन रुक्ष बनवू नका ही त्यांची मोलाची शिकवण !

सेवासदन सारख्या सामाजिक संस्थेत काम करताना समाजसेवा हे एक आनंददायी क्षेत्र समजून कार्य कर हा त्यांचा बहुमोल उपदेश !

माझ्या उत्कर्षाला सातत्याने खतपाणी घालून, मला कर्तृत्वाबाबत त्यांनी जागरूक ठेवले. त्यांच्या आठवणी सांगताना मी भावनावश होते. परंतु ज्या आठवणीने माझे जीवन बदलून टाकले त्या माझ्या दृष्टीने बहुमोल आठवणीचा उल्लेख केल्याशिवाय राहावत नाही.

पहिली एक आठवण पुणे कॉर्पोरेशनमधली. मी सेवासदन संस्थेची आजीव सेविका आणि जनरल सेक्रेटरी या नात्याने, त्यावेळचे कमिशनर पाळंदे साहेब यांना भेटावयास गेले होते. पाळंदेसाहेब आणि मी सेवासदनबद्दल बोलत होतो. तेवढ्यात त्यांना एकचिठ्ठी आली. चिठ्ठी वाचत असताना त्यांच्या चेहेऱ्यावरील उत्सुकतेचा, आनंदाचा भाव मी टिपला. ते म्हणाले, "इंदुताई माझी अत्यंत आवडती व्यक्ती आली आहे. तुम्ही

थोड्या थांबाल का ?'' मी पाहिले तर माझे काका ! ताटके मास्तर ! पाळंदे साहेब खुर्चीतून उठले व त्यांना खाली वाकून नमकार केला. मॉडर्न कॉलेजसाठी देणगी मागण्यासाठी आप्पा गेले होते. पाळंदे साहेबांनी चेकबुक काढले, सही केली आणि आप्पांना रक्कम लिहावयास सांगितले.

आदर्श गुरू आणि आदर्श विद्यार्थी यांचे पवित्र नाते मला पहावयास सापडले. हा प्रसंग मला खूप काही शिकवून गेला. सुसंस्कार, सहकार्य, विद्यार्थ्यांविषयी तळमळ, जबाबदारी मानणारं आणि पेलणारं सुजाण नागरिकत्व यामुळेच आप्पांच्या रक्तात आणि स्वभावात शिक्षणकार्याचे बीजच असावे असं मला वाटलं. संस्कारक्षम विद्यार्थ्यांचेही मला दर्शन झाले.

दुसरा एक आनंददायी प्रसंग. पुण्यात मुख्याध्यापक, शिक्षक, सरकारी कार्यकर्ते यांचा शैक्षणिक सेमिनार होता. महाराष्ट्रातील बहुसंख्य शिक्षण क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. सेमिनारचा शेवटचा दिवस होता. आप्पा अध्यक्ष होते. डॉ. चित्रा नाईक भारतीय शिक्षण संस्थेच्या संचालिका यांनी सेमिनारचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या, ''मला ताटके सरांसारखे गुरू गणित किवावयास लाभले असते तर मी रँगलर चित्रा नाईक झाले असते.'' शिक्षणक्षेत्रातील सातत्याने कार्यरत असणाऱ्या थोर विचारवंत स्त्रीने काढलेले हे उद्‌गार ! ''ताटके सरांचा अनुभव, ज्ञान आणि शिकविण्याची हातोटी मी पाहिली !'' महाराष्ट्रातील थोर विचारवंत, चिंतनशील अशा चित्राताईंनी केलेला आप्पांचा गौरव पाहून अभिमानाने डोळ्यात आनंदाश्रू आले.

सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती लक्ष्मीदेवी नाईक निंबाळकर होत्या. त्यांचे सेवासदन संस्थेवर आणि तेथील कार्यकर्त्यांवर नितांत प्रेम होते. त्यांच्या घरी कोणीही प्रतिष्ठित व्यक्ती आली तर त्या मला घरी बोलावत, त्यांची ओळख करून देत. संस्थेच्या कार्यासाठी इंदुताईंना मदत करा असे आवर्जून सांगत.

एक प्रसंग मला आठवतो. कै. मुरारजीभाई देसाई पंतप्रधान असताना त्यांचा राणीसाहेबांच्या घरी पुण्यास मुककाम होता. राणीसाहेबांनी मला आणि आप्पांना बोलाविले होते. परगावी गेल्यामुळे आप्पा येऊ शकले नाहीत. मी गेले होते.

राणीसाहेबांनी सेवासदनच्या कार्याची माहिती सांगितली. ''मी इंदुताईंना घेऊन दिल्लीला येईन असे सांगितले.''

कै. मोरारजीभाई म्हणाले, ''राणीसाहेब आपण राजघराण्यातला राजवाडा सोडून समाजकार्याला वाहून घेतलेत याचे मला कौतुक वाटते.''

राणीसाहेब म्हणाल्या, ''माझ्या स्वभावात, विचारात जी क्रांती झाली याचे सर्व श्रेय माझे पूजनीय गुरू ताटके सर यांना आहे. त्यांनी माझे मॅट्रिकपर्यंत शिक्षण केले. आठवड्यातून दोन दिवस जनरल नॉलेज घेत असत. इंग्रजी व मराठीवर मी त्यांच्यामुळेच प्रभुत्व मिळवू शकले. निरनिराळ्या विषयांवर भाषणे करण्यास शिकविले. मला सभाधीट बनविले. कितीही मोठ्या समाजापुढे मी भाषण करू शकले. वेळेचा, पैशाचा, तुमच्या कर्तृत्वाचा उपयोग समाजासाठी करा असा मला कानमंत्र दिला. त्यांच्याच प्रोत्साहनाने फलटणमधील अनेक कुटुंबांना मी आधार दिला. अनेक गरीब मुलींना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविले. या समाजकार्यामुळे मला जो आनंद मिळाला ह्यात ताटके सरांचा सिंहाचा वाटा आहे.

ताटके सरांनी माझ्या बुद्धीला चालना दिली. माझ्या डोळ्यांना वाचनाची सवय लावली. एवढेच नव्हे तर समाजाकडे बघण्याची दिव्य दृष्टी दिली.''

मोरारजीभाई हे ऐकून म्हणाले, ''चांगला गुरू मिळावयास फार मोठे भाग्य लागते.''

सोलापूरमध्ये आप्पांचे शिक्षकांसाठी व्याख्यान होते. आप्पांचे शब्द आजही माझ्या कानात घुमतात.

आप्पा म्हणाले, ''नीतिमत्ता हे अध्यापन व्यवसायाचे अधिष्ठान आहे. शिक्षकांच्या नीतिमध्ये ज्ञानाला अग्रस्थान आहे. विद्यार्थ्यांबद्दल आत्मीयतेला महत्त्वाचे स्थान आहे. अध्यापकाच्या नीतिमत्तेत वैयक्तिक चारित्र्य आणि शील फार महत्त्वाचे आहे कारण विद्यार्थ्यांवर चारित्र्याचा सहजतेने

फार खोलवर संस्कार होतो.

ह्या सर्व गोष्टी आप्पांनी आत्मसात केल्या होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांवर पितृतुल्य प्रेम केले. सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्याला गणितासारखा विषय समजला पाहिजे, इतकेच नव्हे तर त्याला गोडी वाटली पाहिजे हे उद्दिष्ट ठेवून आप्पांनी आयुष्यभर अध्यापक केले.

साधी राहाणी, तत्त्वनिष्ठ विचारसरणी, कोणतीही तडजोड न करता कार्य करीत राहण्याची निष्ठा, उच्च अभिरुची आणि जीवनमूल्ये यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अनोखा संगम झालेला होता. त्यांची सौंदर्यदृष्टी आणि रुचीसंपन्नता वाखाणण्यासारखी होती. त्यांचा उत्साह तरुणांनाही लाजवणारा होता. उत्साहाने आणि निर्धाराने सातत्याने काम करण्याचे काय रहस्य असावे ?

मला वाटले जीवनाकडे पाहण्याची पूर्ण आशावादी वृत्ती हे त्यांच्या चैतन्यमय जीवनाचे संजीवन आहे. निराशा, भिती, चिंता यांनी ग्रासलेले मी कधीही पाहिले नाही. त्यांचा उदंड उत्साह त्यांच्या अविचल आत्मविश्वासातून आणि दृढ श्रद्धेतून त्यांना प्राप्त झाला होता. विद्यार्थ्यांच्या विकसनशील मनाशी एकरूप होताना त्यांना जो आनंद मिळाला त्यामुळेच त्यांच्या मनाचे चैतन्य टिकले.

अत्यंत कर्तृत्ववान संचालक मंडळांनी संस्था प्रगतीपथावर राहण्यासाठी जे श्रम केले त्याबद्दल कृतज्ञता वाटते. संस्थेच्या भविष्यातील अनेक योजना कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाने आणि परमेश्वराच्या आशीर्वादाने नक्की यशस्वी होतील. माझ्या प्रिय शाळेची उत्तरोत्तर प्रगती होवो हीच सदिच्छा !

परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी आठवणींचा समारोप करते -

"जे दिव्य असे ते कधी न ढळे
जे सुमन सुगंधित कधी न गळे
जे प्रकाशमय ही कधी न जळे
दे प्रशांतता ! दे प्रसन्नता !"

■■■

With Best Compliments from

**IndiaSoft**

IndiaSoft Technologies (P) Ltd.

**Applying Knowledge**

**Head Office** : Plot No. 4, Survey No. 16/B, Swapna Mandir Hsg. Soc.,
Patwardhan Baug, Erandwane, Pune 411004. India.
Ph. : 91-020-5462268, 4002395/6/7, Fax : 91-020-5460998
Email : mail@indiasoft.co.in

**Mumbai Branch Office :** 108, Champaklal Udyog Bhavan,
105, Sion Koliwada Road, Sion (E), Mumbai 400042. India.
Ph. : 91-022-24607363/4 Fax : 91-022-24040599
Email : mail@indiasoft.co.in Website : www.indiasoft.co.in

# संकलित माहिती

- सौ. सुजाता पंडित

संपादकीय-१९६०

संस्थेच्या इतिहासात प्रस्तुत वर्ष अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन होऊन यावर्षी २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. पंचवीस वर्षांचा काळ सार्वजनिक जीवनात खूप मोठा मानला जात नसला तरी तो एका पिढीचा काळ आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या जीवनातील तो एक महत्त्वाचा टप्पा आहे. आपल्या संस्थेने मोठ्या आनंदाने आणि योग्य अभिमानाने प्रस्तुत रौप्यमहोत्सव उगवत्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ एप्रिल १९६० ला साजरा केला. याप्रसंगी संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी गरीब विद्यार्थ्यांना सहाय्य म्हणून जमवलेला निधी माननीय अध्यक्षांच्या हस्ते संस्थेचे कार्यवाह श्रीयुत वि. त्र्यं. ताटके यांना देण्यात आला. त्याच प्रसंगी संस्थेचे प्रारंभापासूनचे अध्यक्ष श्री. सर माणेकजी एन. मेहता आणि संस्थेचे आद्य संस्थापक श्री. शं. रा. कानिटकर यांच्या भव्य प्रतिमांचे अनावरण मान्यवर अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले.

### १९६१ - वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या वेळी श्री. ताटके (मुख्याध्यापक) यांनी वाचलेल्या अहवालाचा काही भाग

मॉडर्न हायस्कूल स्थापन झालेल्या घटनेला आता २५ वर्षे होऊन गेली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली रौप्यमहोत्सव साजरा झाला. या प्रसंगी त्यांनी ''भविष्यकालातही भरीव कार्य होवो'' अशी अपेक्षा केली होती. त्यांच्याअपेक्षा पूर्ण करण्याची संस्थेचे चालक पूर्ण पराकाष्ठा करतील असे आश्वासन शाळेच्या वतीने मी दिले आणि समाधानाची गोष्ट अशी की, यावर्षीच शाळेने एस.एस.सी. परीक्षा आणि आंतरशालेय क्रीडा स्पर्धा यामध्ये नेत्रदीपक यश मिळविले. १९४६ साली ''मॉडर्नचा'' विद्यार्थी पद्माकर दुभाषी हा शालांत परीक्षेत पहिला आला. १९५५ साली कुमार पंचवाघ ह दुसरा आला. १९५९ साली मुलींच्या हायस्कूलमधील विद्यार्थिनी कु. सुधा देवरे पहिली आली आणि सर्व विद्यार्थ्यांत प्रथम येण्याचा स्पृहणीय मान आमच्या अनिल खर्शिकरने मिळविला व शाळेच्या कीर्तिस्तंभावर कळस चढविला. बौद्धिक क्षेत्रांप्रमाणेच क्रीडा क्षेत्रातही शाळेच्या विद्यार्थ्यांनी असाच विक्रम करून शाळेला बहुमान मिळवून दिला. शाळेने बास्केट बॉलमध्ये सतत ८ वर्षे अजिंक्यपद मिळविले, तसेच बेसबॉल, व्हॉलीबॉल, पोहणे, गोल खो खो, मल्लखांब यांतही संघांनी अजिंक्यपदे मिळविली. आंतरशालेय स्पर्धेत भाग घेतलेल्या ३२ शाळांमध्ये सांघिक बाबीत यंदा शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

### १९६२

दि. १२ जुलै १९६१ हा दिनांक उल्लंघून १९६१ सालची स्मृती पुढे जाणार नाही. ज्या दिवशी पानशेतचे धरण फुटले आणि पाण्याच्या त्या प्रचंड लोंढ्याने पुण्याला विजेच्या वेगाने भेट दिली. अर्ध्या दिवसात या पाणलोटाने पुण्याच्या जीवनाची अमाप हानी केली. दुसऱ्या दिवसापासून शाळा, महाविद्यालये, मंगल कार्यालयाकडून निराधारांसाठी साह्य केंद्रे सुरू झाली. आपल्या शाळेतसुद्धा असे केंद्र सुरू होते. हे केंद्र उत्कृष्ट प्रकारे चालविले गेले हे आपणा सर्वांना भूषण आहे.

आपत्ती येतात आणि जातात, हा जीवनाचा भाग आणि भोग आहे तो कुणाला टाळता येत नाही. त्याची

निभावणी करणे पुरुषार्थी मानवाचे कर्तव्य असते.

या आपत्तीनंतर मॉडर्न हायस्कूलला अतिशय आनंददायक असाही एक प्रसंग यावर्षी घडला. मॉडर्न हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. विष्णु त्र्यंबक काटके यांना यावर्षीचे माध्यमिक शिक्षकांसाठी असलेले ''राष्ट्रीय पुरस्कार पारितोषिक'' मिळाले. हे प्रशस्तीपत्र श्री. वि. त्र्यं. ताटके या व्यक्तीला जसे मिळाले तसेच ते मॉडर्न हायस्कूल या संस्थेलाही मिळाले, असे आम्ही मानतो. कार्यक्षेत्र कोणतेही असो माणसाने निरलसपणाने आणि महत्त्वाकांक्षेने आपले कार्य करीत राहावे हाच संदेश आपणांस त्यांच्या जीवनरेखेतून घेता येईल.

आमच्या मॉडर्नचा विद्यार्थी परीक्षेच्या मंडपात ज्याप्रमाणे चमकला, त्याचप्रमाणे तो क्रीडांगणावर व वक्तृत्त्वाचा व्यासपीठावरही चमकला पाहिजे, एवढेच काय रस्त्यातून चालतानाही हा मॉडर्नचा विद्यार्थी हे त्याच्या ऐटदार पण विनयशील वागणुकीवरून ओळखता आले पाहिजे.

### मित्रांच्या शब्दांत श्री. ताटके -

"I congratulate you on your receiving the National Award, a befitting recognition of long and meritorious services rendered by you in the cause of Secondary Education"

''एका तेजस्वी शिक्षकाच्या, सांसारिक दु:खांनी आणि संकटांनी भरलेल्या जीवनाचा राष्ट्राकडून झालेला हा गौरव पाहून परम संतोष झाला. (एका न्यायाधिशाच्या पत्रातून)

### पारितोषिक वितरण समारंभ

मॉडर्न हायस्कूलचा वार्षिक पारितोषिक समारंभ पुणे विद्यापीठाचे कुलगुरु म. म. दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्याप्रसंगी माननीय मुख्याध्यापक श्री. ताटके यांनी माध्यमिक शिक्षणासंबंधी बहुमोल विचार मांडले. ते म्हणाले, ''शिक्षणाची सार्वत्रिक वाढ व त्याच झपाट्याने प्रसार ही चालू काळाची वैशिष्ट्ये आहेत. पण वाढत्या प्रसाराबरोबर त्याचा दर्जा कसा उंचावेल यासाठी आपण दक्ष राहिले पाहिजे. हे उद्दिष्ट समोर ठेवूनच या शाळेची प्रतिष्ठापना करण्यात आली. इंग्रजीचे अध्यापन ही आजच्या माध्यमिक शाळांपुढील कठीण समस्या आहे ती कशी सोडवता येईल याबाबत आमच्या शाळेत गेल्या वर्षभर प्रयोग चालू आहेत. सध्याची स्ट्रक्चर पद्धती फलदायी कशी करावी हा प्रधान हेतू आहे.

शिक्षणाचे अंतिम ध्येय जगात नांदणाऱ्या अनेक मानवी समूहात परस्पर प्रेम व सलोखा निर्माण करणे हे होय. इतर देशातील चालीरीती व संस्कृती यांच्यासंबंधी माहिती देऊन आंतरराष्ट्रीय तंटे तोडणाऱ्या युनो संघटनेची माहिती द्यावयाची या हेतूने शैक्षणिक प्रयोग शाळेत सुरु केला आहे. माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात देशात निरनिराळ्या ठिकाणी काही नमुनेदार संस्था निर्माण व्हाव्यात म्हणून मध्यवर्ती सरकारने काही शाळांची निवड केली आहे. मॉडर्न हायस्कूलची या योजनेसाठी निवड झाली आहे हे सांगण्यास मला आनंद वाटतो.

### आपला भारत देश

आपला देश क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगात सातव्या क्रमांकाचा व लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचा आहे. या देशाची लोकसंख्या ४३ कोटी ६४ लक्ष आहे.

हा आपला देश बहुभाषी व बहुवेषी आहे. जगातील एकूण चार हजार भाषांपैकी १२०० भाषा एकट्या भारतात बोलल्या जातात. फक्त १४ भाषाच प्रौढ असून त्यांना राष्ट्रीय भाषा म्हणून मान मिळालेला आहे. निरनिराळ्या राज्यातील लोकांच्या पोषाखात, आचारात, विचारात, स्वभावात व वागणुकीत नमुनेदार पण वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपणा आहे. काही जाती अत्यंत सुधारलेल्या तर काही कमालीच्या मागासलेल्या आहेत. वेगळेपणामुळे आणि विविधतेमुळे आमचा देश जास्त आकर्षक दिसतो. याचे

मूळ कारण या विविधतेत व वैचित्र्यात एक सांस्कृतिक एकात्मता आहे. आमच्या विस्तीर्ण देशात एकसंघी राज्य निर्माण झाले असून ते लोकशाहीप्रधान व समाजवादी आहे. यामुळे एकात्मतेत निश्चित मदत होईल.

### "राष्ट्रीय एकता-दिन प्रतिज्ञा"

कितीही कष्टप्रद व दीर्घकालीन लढा द्यावा लागला, तरी तो देऊन आणि कितीही मोठा त्याग करावा लागला तरी तो करून आपल्या मातृभूमीचे स्वातंत्र्य आणि एकात्मता यांचे परिरक्षण करण्यासाठी भारतीय जनतेने जी प्रतिज्ञा केलेली आहे तिचा मी निष्ठापूर्वक पुनरुच्चार करतो.

राष्ट्राची एकता आणि सामर्थ्य यांच्या संवर्धनासाठी निर्धारपूर्वक परिश्रम करण्याची मी प्रतिज्ञा करतो.

### आपले राष्ट्रगीत

बंकिमचंद्र चतर्जी यांचे 'वन्दे मातरम्' व रवीन्द्रनाथ टागोर यांचे यांचे 'जनगणमन' ही आपली दोन राष्ट्रगीते आहेत. बंकिमचंद्र यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत हे गीत प्रसिद्ध झाले. 'जनगणमन' नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारने सदर गीतास हिंदुस्थानी स्वरूप देऊन त्याचा राष्ट्रगीत म्हणून स्वीकार केला.

### आपला राष्ट्रध्वज

दि. २२ जुलै १९४७ साली घटना समितीने हल्लीचा राष्ट्रध्वज मान्य केला. तो तिरंगी असून त्यावर केशरी, पांढरा व हिरवा या तीन रंगांचे सारख्या आकाराचे तीन पट्टे आहेत. पांढऱ्या पट्ट्याच्या मध्यभागी गर्द निळ्या रंगाचे 'अशोक चक्र' आहे. ध्वजाची लांबी रुंदीच्या दीडपट आहे. केशरी रंग धैर्य व त्याग यांचे प्रतीक आहे. पांढरा रंग सत्य व शांतीचे प्रतीक आहे आणि हिरवा रंग निष्ठा व शौर्य यांचे प्रतीक आहे. अशोक चक्राला ५००० वर्षांची परंपरा असून ते सामर्थ्य, प्रगती व गतिमानता यांचे प्रतीक आहे.

आपला हा तिरंगी राष्ट्रध्वज ापल्या राष्ट्राचा मानबिंदू असल्यामुळे त्याची प्रतिष्ठा राखणे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. मग हे कर्तव्य पाळण्यात रक्ताच्या नद्या वाहिल्या तरी चालतील.

### आपल्या राष्ट्राचे मानचिन्ह

राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, एकात्मतेची प्रतिज्ञा यांच्याइतकेच महत्त्व आपल्या राष्ट्रीय मानचिन्हाला आहे.

आपले राष्ट्रचिन्ह (राजमुद्रा) म्हणजे सारनाथ येथे सम्राट अशोकाने उभारलेल्या स्तंभाची प्रतिकृती होय. एका गोलार्धावर चार सिंह असून त्याखाली मध्यभागी धमचक्र आहे. चक्राच्या डाव्या बाजूला घोडा, उजव्या बाजूला बैल कोरलेले आहेत. त्याच्या खालच्या बाजूला 'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य आहे. भारताने २६ जानेवारी १९५० रोजी हा स्तंभ हे राष्ट्रीय चिन्ह म्हणून मान्य केले. भारताची परंपरा, संस्कृती, सामर्थ्य, आकांक्षा व लोककल्याणाची इच्छा इ. गोष्टी सूचित करणारी ही राजमुद्रा (राष्ट्रीय मानचिन्ह) आपण सर्वांनी वंद्य मानली पाहिजे. विद्यार्थ्यांनी, तुम्ही मोठे झाल्यावर सारनाथाचे दर्शन घेतल्याशिवाय राहू नका.

### आपले राष्ट्रीय पंचांग

देशात एकात्मता आणण्यास सर्वांना मान्य होणाऱ्या पंचांगाची जरुरी होती. १९५२ ला याकरिता सरकारने एक समिती नेमली. या समितीने 'शक कालावर' आधारीत असलेले नवे पंचांग सुचविले. ते १९५७ पासून अंमलात आणले. या पंचांगाप्रमाणे वर्षाला सौरवर्ष म्हणण्याचे ठरून वर्षाचे दिवस ३६५ ठरले. चैत्र हा वर्षाचा पहिला महिना व चैत्र १ हा वर्षाचा पहिला दिवस घेण्याचे ठरले. या पंचांगाप्रमाणे दिनांक मानण्याचे व लिहिण्याचे आपण ठरविल्यास आपल्या राष्ट्रीय एकात्मतेत आणखी भर पडेल.

### पारितोषिक वितरण समारंभ

मॉडर्न हायस्कूलचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ ७-३-१९६५ ला प्रा. ब. वें. बापट - आचार्य टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या अध्यक्षतेखाली

साजरा झाला. त्यावेळी मुख्याध्यापक श्री. ताटके यांनी आपले बहुमोल विचार मांडले. ते म्हणाले, "या शाळेचे संस्थापक कै. प्रा. शंकरराव कानिटकर यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांचे सहकारी मित्र व चाहते यांनी एक त्यांच्या स्मृत्यर्थ योजना आखली आहे, ती अशी. इयत्ता ११ वीतून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रत्येकी १०० रु. व ४ थीतून पास होणाऱ्यास २५ रु. ची पारितोषिके द्यावीत व संस्थेत कै. प्रा. कानिटकरांचे मोठे तैलचित्र तयार करून ते सर्वांच्या समोर राहील अशा रीतीने लावावे. ही योजना आम्हांस पार पाडता येईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

शिक्षणाच्या वाढीबरोबर शिक्षणाचा दर्जा कसा चांगला राहील व भोवतालच्या अस्थिर राजकीय व सामाजिक वातावरणातही शाळेतील शिस्त कशी ठेवायची या विवंचना आमच्यापुढे आहेत. आम्ही सहकार्याने यातून निश्चित मार्ग काढू असा मला विश्वास वाटतो.

माध्यमिक शिक्षण अधिक जीवनाभिमुख व्हावे यासाठी सरकारचे प्रयत्न चालू आहेत. या प्रयत्नात आमची शाळा नेहमीच सहकार्य देत आली आहे. प्रा. बापट हे शिक्षकांना प्रशिक्षित करणाऱ्या संस्थेचे अध्वर्यू !

शेवटी मला एवढेच सांगावेसे वाटते की, आपला देश मोठा व्हायचा असेल तर मुत्सद्दी सेनापती, शास्त्रज्ञ, साहसी व्यापारी, उत्तम कामगार, तंत्रज्ञ, कर्तव्यदक्ष शेतकरी व बुद्धिमान शासक वर्ग यांची अखंड परंपरा हवी. ही शाळा राष्ट्रसेवकांची गंगोत्री ठरो हीच या शाळेच्या चालकांची मनीषा !

■■■

**WITH BEST COMPLIMENTS FROM**

# Vrushali Engineers

**Gat No. 267/A/2, Plot No. 2A, Pirangut, Pune.**
**Phone : 98230-11116**

**Manufacturers of :**

**★ All Steel Dual Desk**
**★ Both Side Library Cupboard**
**★ Exclusive Children Bedroom Furniture**

# गुरुवर्य ताटके सरांच्या आठवणी

- श्री. ना . गो. प्रभुणे,
माजी मुख्याध्यापक, म.ए.सो. हायस्कूल, बारामती

मी १९५४ साली बी.एस्सी. झालो व लगेच १९५५ साली बी. टी. झालो. शिक्षकाच्या नोकरीसाठी मी निरनिराळ्या ठिकाणी अर्ज केले. जूनमध्ये मला सातारा जिल्ह्यातील एका लहान गावी शिक्षकाची नेमणूक झाल्याचे पत्र आले. गावापासून जवळ असल्याने ताबडतोब त्या शाळेत जाऊन हजर झालो. संस्थेचे तेवढे एकच हायस्कूल होते. त्या शाळेत कामास सुरुवात केली. आठ दिवसांत मला पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलचे मुख्याध्यापक ताटके सर यांच्या सहीचे मॉडर्न हायस्कूलमध्ये नेमणूक झाल्याचे व ताबडतोब हजर होण्याचे पत्र आले. मी दोन दिवस रजा काढून पुण्यास गेलो. मुख्याध्यापकांच्या खोलीत भीत भीत गेलो. पांढरे स्वच्छ काच्याचे धोतर, काळी टोपी, सोनेरी काड्यांचा चष्मा, गौरवर्ण रुबाबदार व्यक्तिमत्त्व पाहून थोडी भीती वाटली. गेल्याबरोबर त्यांनी मला बसण्यास सांगितले. मी ऑर्डर दाखविली. त्यांनी विचारले, ''आपणांस शिक्षकाच्या नोकरीचा अनुभव आहे काय ?''

''मी बी. टी. नंतर प्रथम नोकरी करीत आहे. आठच दिवस एका शाळेत काम केले आहे व करीत आहे.'' असे त्यांना सांगितले. नंतर त्यांनी ३-४ मोजके प्रश्न विचारले. ते म्हणाले, ''तुम्ही तेथील शाळेत हजर झाला आहात. सह्या केल्या आहेत, तेव्हा त्या शाळेचे डिसचार्ज सर्टिफिकेट आठ दिवसांत घेऊन या. मी तुम्हांस लगेच हजर करून घेईन. नाही तर खेड्यातील शाळेला बी.एस्सी.बी.टी. मिळणे कठीण जाते. त्या शाळेवर व तेथील विद्यार्थ्यांवर अन्याय केल्यासारखे होईल.'' मी थोडा निराश झालो. आठ दिवस काम केले हे सांगितले नसते तरी बरे झाले असते असे वाटले. परंतु खरे बोलण्याचा स्वभाव असल्यामुळे ते शक्य नव्हते. लगेच वडिलांना घेऊन खेड्यातील त्या शाळेत गेला. त्यांना मॉडर्न हायस्कूलची ऑर्डर दाखविली व आपले डिसचार्ज सर्टिफिकेट मागितले आहे असे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष म्हणाले, ''तुम्ही आम्हांस दुसरा बी.एस्सी. बी. टी. आणून द्या. आम्ही तुम्हांस लगेच मुक्त करु.'' त्या दिवशी तेथे मुक्काम केला. रात्री मुख्याध्यापकांची गाठ घेतली. अध्यक्ष परगांवी गेले होते. ते तेथे नेहमी नसत. ''तुम्ही महिन्याचा पगार द्या, मी उद्या तुम्हांस लगेच मुक्त केल्याचे सर्टिफिकेट देतो. तुम्हांस चांगली शाळा मिळाली आहे. मी तुमच्या आयुष्याचे नुकसान कशास करू ? अजून आम्हांस ३-४ महिन्यांचे पगार मिळाले नाहीत.'' दुसऱ्या दिवशी मी महिन्याचा पगार दिला. त्यांनी लगेच डिसचार्ज सर्टिफिकेट दिले. ते म्हणाले, ''शाळेला बी.एस्सी.बी.टी. मी कोठूनही आणीन. मॉडर्न हायस्कूल नावाजलेली शाळा आहे. तेथे तुम्हांस चांगला वाव मिळेल. मी त्याच्या आड कशास येऊ ?'' दुसऱ्या दिवशी पुण्यास जावून ताटके सरांच्या ऑफिसात जाऊन त्यांना सर्टिफिकेट दाखविले. त्यांनी लगेच हजर करून घेतले व मला ८ वी, ९वी, १० वीचे गणित, शास्त्र असलेले वेळापत्रक दिले. तयारी कशी करावी, कसे वागावे इ. संबंधी बारीक सूचना दिल्या व मी त्याच दिवसापासून वर्गावर जाऊन शिकविण्यास सुरुवात केली. मी एकदा ९ वीच्या वर्गावर बुलेटिन पिरियडला गेला होतो. तो सायन्स टीचरचा तास होता. त्यामुळे मी सायन्स शिकविण्यास सुरुवात केली होती. तेवढ्यात ताटके सरांनी वर्गात प्रवेश केला. कोणाचा तास आहे त्याची चौकशी केली. मला शिकविणे थांबविण्यास सांगितले व त्यांनी विद्यार्थ्यांना जनरल नॉलेजवर कितीतरी प्रश्न विचारले. त्यांचे ज्ञानभांडार विपुल होते. तासानंतर मला त्यांनी ऑफिसमध्ये बोलावले. ते म्हणाले, ''दुसऱ्या शिक्षकाचा विषय बुलेटिन तासाला शक्यतो शिकवू नये. प्रत्येकाला ते आवडतेच असे नाही. त्यासाठी स्वत:जवळ विविध प्रकारची गणितातील कोडी, कूट प्रश्न, विनोद, उत्तम संस्कार करणाऱ्या गोष्टी,

क्रांतिकारकांच्या गोष्टी, विविध गंमती इ. भरपूर साठा असावा. त्याची एक स्वतंत्र वही असावी. त्याचा बुलेटिन पिरीयडला उपयोग होतो.'' शिक्षक गैरहजर असल्यावर त्यांच्या तासावर गेलो असता या वहीचा मला चांगला उपयोग होऊ लागला. मुले माझ्या तासाची उत्सुकतेने वाट पहात असत. या वहीचा मला आयुष्यभर उपयोग झाला. दरवर्षी त्यात भर पडत असे.

एक दिवस ताटके सरांनी मला ऑफिसमध्ये बोलावून घेतले. त्यांनी विचारले, ''तुम्ही शिकवण्या घेता काय ? किती विद्यार्थी आहेत ?'' मी घेतच नव्हतो, त्यामुळे नाही म्हणून सांगितले. ते म्हणाले शाळेसमोर ८ वी, ९ वीतील एक भाऊ बहीण आहेत. त्यांना रोज सकाळी १ तास जाऊन फक्त गणित शिकवावयाचे. ते रु.१०० फी देतील. ही त्या काळातील फी होती. मी ते मान्य केले. ती मुले उत्तम तऱ्हेने प्रथम श्रेणीत पास झाली. मुलांच्या वडिलांनी शाळेत येवून श्री. ताटके सरांचे ऑफिसमध्ये माझे अभिनंदन केले. सरांनीही माझी पाठ थोपटली. सर मुलांच्या वडिलांना म्हणाले, ''माझी निवड चुकणार नाही.''

वर्ष संपत आले. माझी नोकरी १ वर्षभर रजेवर गेलेल्या शिक्षकांच्या जागी होती. त्यामुळे मॉडर्न हायस्कूलमधील माझी नोकरी संपली. मे महिन्याच्या सुट्टीत ताटके सरांनी मला बोलावून घेतले. ''सुट्टीत गावी जाण्याची गडबड आहे का विचारले'' मी नाही म्हणून सांगितले. ते म्हणाले, ''मी ८, ९, १० वीची गणिताचे पुस्तके लिहिली आहेत. अजून छापून व्हावयाची आहेत. त्यातील उदाहरणांची दिलेली उत्तरे बरोबर आहेत का ते तपासून पहा. जरूर वाटल्यास दुरुस्त करू.'' मी १५ दिवस राहून उदाहरणे सोडवून उत्तरे तपासून पहिली ९०% उत्तरे बरोबर होती. काही चुका सापडल्या. त्यांनी त्या मोठ्या मनाने मान्य करून दुरुस्त केल्या. ८-१० दिवसात हे काम पूर्ण झाले. काम पूर्ण झाल्यावर आग्रह करून त्याचा मोबदला ते देत होते. परंतु मी तो नम्रपणे नाकारला. पुढच्या वर्षी मॉडर्न हायस्कूल (मुलींचे) येथे मला एक वर्षासाठी नोकरी मिळाली. तेथे वर्षभर काम केले. परंतु तीही जागा तात्पुरती होती. नंतर १९५७ ते १९८८ पर्यंत बारामतीस म. ए. सो. हायस्कूलमध्ये नोकरी केली व १९८८ साली मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झालो. एक वर्षभर श्री. ताटके सरांच्या हाताखाली काम केले तरी त्यांनी दिलेली ज्ञानाची शिदोरी, मार्गदर्शन आयुष्यभर उपयोगी पडले. मला निवृत्त होवून १४ वर्षे झाली तरी अजून त्यांची करडी नजर व बहुरंगी अष्टपैलू रुबाबदार व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर कायम आहे. ते बाहेरून जरी फणसाप्रमाणे काटेरी वाटत असले तरी त्यांच्या अंतरंगात फणसाच्या गऱ्याप्रमाणे गोडवा होता. तो जवळ गेल्याशिवाय कळत नसे. काव्य शास्त्र विनोदेन कालो गच्छती धीमताम् । ही उक्ती त्यांना यथार्थ लागू पडते.

■ ■ ■

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनच्या
वेळी असणारे शिक्षणमहर्षी

**मा. कै. ताटके सरांच्या जन्मशताब्दी**
**वर्षानिमित्त विनम्र अभिवादन**

**स्नेहांकित**

**श्री. दीपक शहा**
(माजी प्रांतपाल, तळेगांव लायन्स)

**आशिष ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज**

जुना मुंबई-पुणे रस्ता,
तळेगांव दाभाडे, ता. मावळ,
जि. पुणे - ४१० ५०६.
फोन : २२५२५

# कै. ताटके सर - ध्येयवादी शिक्षक

- डॉ. स्नेहल तावरे
मराठी विभाग प्रमुख, मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५,

शाईची नवी बाटली घेऊन शाळेत गेले, नेहमीच्या बाकावर बाटली ठेवली आणि आता बरेच दिवस शाळेत शाई आणायला नको असा विचार करून मैत्रिणींमध्ये गप्पाटप्पा सुरू झाल्या. शाळा भरायला थोडा वेळ होता, तोच एकच गडबड उडाली, ''चला चला जा घरी लवकर, चला'' काहीसा आरडाओरडा गोंधळ, त्याक्षणी काहीच कळेना. शाळेत आलो काय आणि घरी जा म्हणून सांगतात काय ? इतक्यात काळी टोपी, कोट, पांढरे शुभ्र धोतर नेसलेले भारदस्त व्यक्तिमत्त्वाचे गुरुजी आत आले आणि म्हणाले, ''पोरांनो घरी जा लवकर नदीला पूर आलाय, निघा पटकन्'' तोपर्यंत म्हणजे इयत्ता चौथीपर्यंत गांभीर्य कळण्याचेही वय नव्हते. मी सगळ्यांप्रमाणेच दप्तर उचलले आणि वर्गाबाहेर पडले. मग लक्षात आले शाईची नवी बाटली आतच राहिली. ती घ्यावी म्हणून मी चाचरत म्हटलं, ''माझी शाईची बाटली घेते.''तसे ते म्हणाले, ''असू दे, कोणी येणार नाही, जा. शाळेच्या बाहेर पडलो, बस नव्हतीच. त्यामुळे चालत चालत आम्ही मैत्रिणी निघालो. माझे वडील तेव्हा चतु:श्रृंगीला राहात असत. पुराचे पाणी चढावर कसले येणार इतकाच विचार फक्त मनात आला. घरी पोहोचले तर घर माणसांनी भरलेले. सगळेच काळजीत. इतकी माणसे ! आई स्वयंपाकात गुंतलेली. त्या सगळ्यांच्या बोलण्यात फक्त पुराचाच विषय होता.

अर्थात शाळेला जवळजवळ महिनाभर सुट्टी मिळाली. नंतर शाळा सुरू झाली. धावत जाऊन वर्गात पाहते तो काय ! वर्गाचा रंगच बदललेला होता. भिंतीवर विविध डाग, बाके इकडे तिकडे... मग कळले की वर्गात पूरग्रस्त लोक राहात होते.

मी शाईची बाटकी कुठे आहे विचारले, तेव्हा ते हसले आणि पाठीवर थोपटत म्हणाले, ''बरं बरं देतो तुला दुसरी आणि ऑफिसमध्ये नेऊन हसले आणि बाटली मिळाल्याच्या आनंदात पळत वर्गात गेले.

त्या दिवसांपासून हे आपले ताटके गुरुजी आहेत हे समजले. नंतर जसजशी इयत्ता पार करत गेले तसा तसा त्यांच्याबद्दलचा माझा आदर वाढत गेला. ते कडक शिस्तीचे म्हणून प्रसिद्ध होते. आम्हा विद्यार्थ्यांना त्यांचा धाक वाटे. एखादे शिक्षक आले नसले तर ते आमचा तासही घेत आणि बरेच प्रश्न विचारीत. प्रश्न कोणालाही विचारीत असल्यामुळे आम्ही सर्व विद्यार्थी कान टवकारून बसत असू.

चौथीनंतर मी मुलींच्या शाळेत गेले. तसे ताटके गुरुजींचे दर्शन हळूहळू कमी होत गेले. कधी खेळाच्या मैदानावर तर कधी शाळेत फेरफटका मारताना ते दिसायचे. आम्ही काही मुली खडकावर डबा खायला मधल्या सुटीत बसत असू. हा खडक बराच मोठा होता. (तेथे सध्या बॅडमिंटन हॉल व सोसायटीचे ऑफिस उभे आहे.) एकदा ते तेथे आले तशा आम्ही दचकलोच. पण ते हसून म्हणाले, ''तुम्ही जेथे डबा खाता तेथे प्रभु रामचंद्र येऊन गेलेत. हा सर्व दंडकारण्याचा भाग आहे बरं का. या पवित्र परिसरात शिकता तेव्हा चांगला अभ्यास करीत जा.'' आम्ही सगळ्या आश्चर्यचकित झालो, आपण ज्या खडकावर बसतो तो खडक आणि शाळेचा परिसर किती पावन झालेला आहे याची आम्ही कितीतरी दिवस चर्चा करीत होतो.

शाळेबद्दल आत्यंतिक ओढ लावण्याचे काम त्या काळात ताटके सरांनी केले. सुट्टी लागली की आनंद व्हायचा, पण थोड्याच दिवसांनी शाळा कधी सुरू होईल याचे वेध लागायचे. आजही शाळेची तीव्रतेने आठवण होते

आणि ज्या अभिमानाने मॉडर्न हायस्कूलची विद्यार्थिनी आहे, हे मी सांगते त्याचे सारे श्रेय ताटके गुरुजी, भोंग गुरुजी यांना आहे. बालमनावर संस्कार करण्याचे उचित कार्य त्यांनी केले. त्यांचे उच्चार स्पष्ट असत. त्याचाही परिणाम माझ्यावर झाला. कामाला वाहून घेण्याची चिकाटी त्यांच्याकडे होती. एक ध्येयवादी शिक्षक अशीच प्रतिमा ताटके सरांच्या बाबतीत माझीच काय पण सर्वांची आहे.

संस्थेचे महाविद्यालय असावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. जेव्हा ताटके सरांनी आपल्या संस्थेचे महविद्यालय सुरू होणार असलयाचे आम्हा विद्यार्थिनींना सांगितले त्याच वेळी अकरावी झाल्यानंतर आपल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असे मी ठरविले. ज्या मॉडर्न गर्ल्स हायस्कूलमध्ये मी शिकले, त्याच संस्थेच्या महाविद्यालयातून बी. ए. पास झाले. पदवीधर होणारी आमची पहिली तुकडी होती. एम. ए. च्या मिळलोल्या पारितोषिकामुळे महाविद्यालयाने माझा सत्कार केला. तीच गोष्ट पी. एच. डी. ची. किंबहुना पी. एच. डी. होणारी महाविद्यालयाची मी पहिली विद्यार्थिनी आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

या अभिमानामागे ताटके गुरुजींची प्रेरणा होती. जर त्यांनी प्रवृत्त केले नसते तर अनेक चांगल्या गोष्टी मला शिकता आल्या नसत्या. परिश्रमामुळे मनातील ईप्सित साध्य करता येते या ताटकेसरांच्या संदेशाचा माझ्या मनावर एक संस्कार झालेला आहे. त्यांचे ऋण कसे फेडायचे ?

■■■



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या
स्थापनेतील थोर ज्ञानमहर्षी
मा. कै. ताटके सरांच्या जन्मशताब्दी
सोहळ्याच्या प्रसंगी त्यांच्या पुण्यशील
स्मृतीला विनम्र अभिवादन

• स्नेहांकित •

श्री. गणेश वसंतराव खांडगे,
अध्यक्ष, (शिक्षण मंडळ सभापती)

श्री. विनायक वसंतराव कदम
सचिव

**मामासाहेब खांडगे नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित**

मुख्य कार्यालय : मामासाहेब खांडगे आर्केड,
तळेगांव स्टेशन, फोन : २३६३९
शाखा : देहूरोड-७६७१८४४,कामशेत-६२०२२



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या
स्थापनेच्या वेळी कठोर परिश्रम करणारे
शिक्षणतपस्वी मा. कै. ताटके सरांच्या
जन्मशताब्दी वर्षानिमित्त
मन:पूर्वक सादर अभिवादन !

• स्नेहांकित •

श्री. कान्हू पडवळ
(मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५ चे माजी विद्यार्थी)

श्री. विशाल पडवळ श्री. सागर पडवळ

**विशाल सागर कन्स्ट्रक्शन्स्**
**सागर हॉटेल**

तळेगाव दाभाडे, ता. मावळ,
जि. पुणे ४१०५०६.
दूरध्वनी : २२२२८

# विष्णू त्र्यंबक ताटके : शिक्षणक्षेत्रातील एक प्रसन्न व कर्तबगार व्यक्तिमत्त्व

- श्री. विद्याधर विनायक कौजलगीकर
मॉडर्न हायस्कूल १९४० मॅट्रिक बॅचचे विद्यार्थी व कै. आप्पासाहेबांचे भाचे

श्री. आप्पासाहेब ताटके हे माझे सख्खे मामा. लहानपणापासून मी त्यांच्या सहवासात वाढलो व त्यांनीच माझे सर्व शिक्षण पूर्ण केले व माझ्या आयुष्याला प्रगतीपथावर नेणारे असे वळण लावले. सातारा जिल्ह्यातील माहुलीसारख्या एका लहान खेड्यातून आलेल्या एका गरीब ब्राह्मण कुटुंबातील तरुणाने पुण्यासारख्या मोठ्या क्षेत्रात येऊन आपल्या कर्तबगारीने व सतत उद्योग करून फार मोठे व उज्वल असे शिक्षणक्षेत्रात कार्य केले. श्री. आप्पासाहेब ताटके मॅट्रिकच्या परीक्षेसाठी पुण्यात आले तेव्हा त्यांच्याजवळ दाने वेळेला पुरेल एवढीच फडक्यात बांधलेली भाकरी होती अशा या आर्थिक परिस्थिमीमध्ये त्यांनी आपले शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. गणित व शास्त्र घेऊन पुरे केले. एक-दोन वर्षे केडगावच्या शारदा सदन या ख्रिश्चन समाजाच्या हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम केले व त्यानंतर ते पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नाना वाड्यात गणित व सायन्स हे विषय शिकवीत असत.

या त्यांच्या नाना वाड्यातील गणित शिकविण्याच्या पद्धतीमुळे एक उत्कृष्ट गणिताचे शिक्षक म्हणून नाव झाले. १९३२ मध्ये त्यावेळचे एक प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ कै. शंकरराव कानेटकर यांच्याबरोबर तेही प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी - मॉडर्न हायस्कूल, पुणे यात सामील झाले व त्या वेळेपासून त्यांच्या यशस्वी अशा प्रगतीला सुरुवात झाली. शाळेमध्ये उत्कृष्ट शिक्षक, त्याचबरोबर नवीन स्थापन झालेली संस्था पुढे नेण्यासाठी आवश्यक असलेली एकाग्रता व व्यवस्थापनाची हातोटी यामुळे संस्थेची प्रगती इतर सहकाऱ्यांबरोबर काम करताना झपाट्याने वाढत होती. आपली मुले मॉडर्न हायस्कूलमध्ये आहेत याचा एक प्रकारचा अभिमान सुशिक्षित, उच्च व मध्यम वर्गीय समाजामध्ये वाटत असे. शाळेच्या मॅट्रिकचे रिझल्टस् हे शभंर टक्के लागत असत. मॅट्रिकच्या परीक्षेत त्या शाळेचे विद्यार्थी प्रथम क्रमांकात येऊ लागले व या सर्व प्रगतीमध्ये श्री. आप्पासाहेबांचा मोठा वाटा असे. त्यावेळी मॉडर्न हायस्कूल ही शाळा मेहुणपुऱ्यातील सरदार रास्ते यांच्या मोकळ्या जागेत बांधलेल्या ... वजा जागेत भरत असे. आमच्या शाळेला तेव्हा कापडी शाळा म्हणत असत. कारण पत्रे तापून विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये म्हणून खालच्या बाजूस पांढरे कापड लावलेले होते.

त्यावेळची मेहुणपुऱ्यातील कापडी शाळा व १९४० मध्ये जंगली महाराज रोडवरील भव्य अशी दगडी तीन मजली इमारत पाहताना या त्यावेळच्या मंडळींच्या कर्तबगारीची साक्ष पटते. शाळेमधील प्रगतीची घोडदौड चालू असताना श्री. आप्पासाहेब यांची कौटुंबिक परिस्थिती अडचणीचीच होती. कुटुंबामध्ये असलेल्या दहा-बारा लोकांचे पालनपोषण करणे व त्यांना उत्कृष्ट शिक्षण देणे, त्यांकडे लक्ष देणे त्यांना करावे लागत असे. सकाळी सहा-सातच्या सुमारास त्यांच्याकडे विद्यार्थी गणित शिकविणीसाठी येत असत व हा कार्यक्रम पुढे दोन-तीन तास चालत असे. जेवण करून ते शाळेत येत असत. ते मोठा उत्साह घेऊन व शाळेचे पाच-सहा तास आपल्या प्रसन्न व सतेज व्यक्तिमत्त्वाने विद्यार्थ्यांना ज्ञानदान करीत असत. त्यांना दुर्मुखलेले व निरुत्साही असे कुणीही पाहिले नाही. शाळा सुटल्यानंतरही ते घरी येत ते असेच प्रसन्न व पुन्हा संध्याकाळी सहा ते रात्री दहापर्यंत शिकवण्याचे काम चालू असे. इतके कष्ट करूनही दिवसभरात ते कोठेही गेले तरी आपल्या विनोदी व बहुश्रुत अशा गोष्टी सांगण्याच्या पद्धतीमुळे उत्साह निर्माण करीत असत. हे सर्व लिहीत असताना त्यावेळच्या त्यांच्या अथक परिश्रमाचा मी एक

साक्षीदार आहे. मी जंगली महाराज रोडवरील शाळेतून १९४० साली मॅट्रिक झालो व तेंव्हापासून त्यांच्या निधनापर्यंतचा त्यांचा आयुष्यक्रम माझ्या डोळ्यापर्यंत येतो.

वरील सर्व गोष्टी करीत असतानाही त्यांचे अफाट वाचन चालू असे व त्या वाचनामध्ये आलेले प्रसंग व त्यामुळे झालेली माहिती यांचे योग्य वेळी चपखल वर्णन करणे ही त्यांची हातोटी होती. भूगोल हा त्यांचा आवडीचा विषय. गणिताबरोबरच पुढे ते भूगोल या विषयाचे अतिशय तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध झाले. शाळेमध्ये शिकवत असताना त्यांच्या वर्णन करण्याच्या पद्धतीमुळे वर्ग हा कंटाळवाणा न होता अतिशय माहितीपूर्ण व आनंददायी होत असे. निरनिराळ्या विषयांवर ते माहिती सांगत असत व खूप वेळेला सर आपणांस काहीतरी महत्त्वाचे सांगत आहेत, असे वाटून आम्ही विद्यार्थी त्यांनी सांगितलेली माहिती तारखेसह टिपून ठेवत असू.

योग्य वेळी योग्य असे संदर्भ देणे व अफाट वाचनामुळे आलेल्या बहुश्रुतपणामुळे एकंदर वातावरण मोठे प्रसन्न ठेवणे ही त्यांची हातोटी होती. आळस, दुर्मुखलेपणा, जगाची सर्व काळजी आपल्यावर आहे असा केलेला चेहरा त्यांना कधीच आवडला नाही.

शिक्षणासंबंधी श्री. आप्पासाहेब यांच्या मोठ्या प्रगल्भ कल्पना होत्या. शाळेमध्ये इतिहास, गणित इ. विषय शिकवणे व त्या विषयांत प्राविण्य मिळविणे एवढेच कार्य शाळेचे नसावे. शाळेमध्ये होणारे संस्कार यांतून विद्यार्थ्यांचे आयुष्यभर पुरेल असे सर्वांगी रूप निर्माण व्हावे ही त्यांची कल्पना होती. शाळेतून व कॉलेजमधून बाहेर पडणारा आज असलेला विद्यार्थी पुढे देशाचा उत्तम नागरिक व्हावा यादृष्टीने त्याची सर्वांगीण वाढ व प्रगती होणे आवश्यक आहे. पुस्तकी किडा तयार करणे असे स्वरूप शाळेच्या शिक्षणाचे असू नये. एकांगी असे रूप त्या विद्यार्थ्यात असता उपयोगी नाही, यासाठी तो शारीरिकदृष्ट्या सुदृढ झाला पाहिजे व त्यासाठी शाळेच्या मैदानावर सव तऱ्हेचे खेळ, तालीम, मल्लखांब इ. ची त्यांनी आवर्जून सोय केली. ते स्वत: उत्तम खेळाडू होते. हुतूतु, क्रिकेट, व्हॉलीबॉल इ. खेळ ते खेळत असत. घरामध्ये ते उत्कृष्टपणे सागरगोटेही खेळत. लहानात लहान तर मोठ्यांत तितकेच मोठे अशी त्यांची वागणूक होती. पूर्वीच्या काळी शाळेच्या तपासणीसाठी श्री. कॅमेरॉन, श्री. देसाई इ. इन्स्पेक्टर्स येत असत व त्यांच्याबद्दल अतिशय धाक शिक्षकांना वाटत असे. परंतु या शिक्षणाधिकाऱ्यांबरोबर तितक्याच धीटपणे त्यांचा वावर असे. आपल्या हेडमास्तर पदाला कोणत्याही प्रकारे धक्का लागू न देता त्यावेळच्या प्रांताचे मूल्य शिक्षणाधिकारी (डी.पी.आय.) श्री. एँगलर, श्री. पावटे, शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी, फलटणचे राजेसाहेब श्री. मालोजीराव निंबाळकर, श्री. बाळासाहेब देसाई इ. लोकांच्या बरोबर ते अगदी सहजतेने वावरत असत.

शाळेच्या व संस्थेच्या वाढीसाठी त्यांचे सारखे प्रयत्न असत. निरनिराळ्या सहली काढणे, शारीरिक शिक्षणासाठी राज्य स्तरावर संस्था संघटित करणे, कै. शंतनुराव किर्लोस्करांनी सुरू केलेल्या स्वच्छ शाळा या उपक्रमात सर्वतोपरी भाग घेणे हे सारखे चालू असे. आपल्या शाळेतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांस अन्य संस्थेच्या शाळेत जाऊन पुढील शिक्षण घेण्याऐवजी संस्थेच्याच कॉलेजमध्ये शिक्षण घेता यावे यासाठी आपले कॉलेज हवे हे असे त्यांचे स्वप्न होते व त्यांनी आपल्या अखंड परिश्रमांनी डॉ. वि. ना. भावे या सहकाऱ्याच्या मदतीने मॉडर्न कॉलेजची स्थापना केली व आज त्या कॉलेजचा मोठा विस्तार झाला आहे व त्या कॉलेजमध्ये अनेक विभाग विस्तार पावत आहेत.

वरील सर्व उपक्रम पाहिले म्हणजे एक गोष्ट प्रकर्षाने ध्यानात येते की, या व्यक्तीची हे सर्व करताना व्यापक व चौफेर अशी दृष्टी होती. मुलींची शाळा, मुलींचे वसतिगृह, व्यायामशाळा, मल्लखांब - वेताचा मल्लखांब इ. गोष्टीतून हेच लक्षात येते. वक्तृत्व स्पर्धा, सुरेख लायब्ररी इ.गोष्टी हेच दर्शवितात. हे सर्व होत असताना शाळेतील व कॉलेजमधील सहकाऱ्यांमध्ये अतिशय जिव्हाळ्याचे संबंध




होते. कोणी अडचणीत असेल तर त्यांस आपण होऊन सल्ला देणे व प्रसंगी स्वत: मदत करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. हे सर्व करीत असताना त्यांनी रँगलर श्री. पावटे यांच्या सहकार्याने गणितावर अगदी मराठी पहिलीपासून सातवीपर्यंत गणिताची पुस्तके लिहिली. हे सर्व करण्यासाठी त्यांना शारीरिक बळ व उत्साह कोठून मिळाला याचा प्रश्न मनात येतो. चांगले कार्य कोणत्याही वयात व केव्हाही करावे असे ते म्हणत असत.

श्री. आप्पासाहेब हे माझे मामा असल्यामुळे त्यांचा सहवास मला सुमारे ५० वर्षे लाभला व त्यामुळे त्यांच्या जीवनात आलेल्या अडचणी, आनंदाचे प्रसंग इ. अनेक प्रसंग मी पाहिले आहेत. एवढे मोठे व्यक्तिमत्त्व असूनही त्यांची वागणूक अतिशय साधी होती. पांढरे स्वच्छ धोतर, पांढरा शर्ट व त्यावर पिवळसर बदामी रंगाचा कोट, डोक्यावर काळी टोपी व पायामध्ये चपला ही त्यांची वेशभूषा होती. त्यांना राष्ट्रपती पारितोषिक त्यावेळचे राष्ट्रपती श्री. राधाकृष्णन् यांच्या हस्ते मिळाले व त्या बातमीबद्दल मुलाखत घेण्यासाठी 'केसरी'चे बातमीदार त्यांच्या घरी आले असता हे गृहस्थ हातामध्ये खराटा घेऊन अंगण झाडत होते. बातमीदाराने ताटके साहेब कोठे राहतात, असे विचारले असता त्या बातमीदारास त्यांनी वर माडीवर बसण्यास सांगितले व काही वेळाने ते स्वत: कपडे करून वर गेले. बातमीदार चकित झाले व त्यांस प्रश्न पडला, हातात खराटा घेतलेले हे गृहस्थ व राष्ट्रपती यांच्याकडून पारितोषिक घेतलेले एकच कसे असू शकतील ?

असे हे कर्तृत्ववान, चौफेर दृष्टी असणारे असे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्याबद्दल असे खूपच लिहिता येईल. हे लिहीत असताना निरनिराळ्या आठवणी येतात व अभिमानही वाटतो की, इतक्या मोठ्या व्यक्तीचे आपण इतके जवळचे नातेवाईक आहोत. त्यांच्या स्मृतीला शतश: वंदन. ■■■

हार्दिक शुभेच्छा

यश ॲडस्

कल्याणी मेडिकल्स्

१०२०, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०.
फोन : ४४७९५६८

विराज मेडिकल्स्

४, अमर अपार्टमेंट,
शिवाजी पुतळ्याजवळ,
मेमोरेक्ससमोर, कोथरुड, पुणे ४११०३८.
फोन : ५३८५५८७

हार्दिक शुभेच्छा

मे. मनीषा इलेक्ट्रिकल्स्

सर्व प्रकारची हाऊस वायरिंगची
व मेन्टेनन्सची कामे योग्य दरामध्ये
काळजीपूर्वक केली जातील.

प्रोप्रा. : प्रकाश ना. शेलार

मुळा रोड, आदर्शनगर,
खडकी, पुणे ४११००३.

फोन : ५८१ ४४५९

# स्मृती-गंध

- श्रीमती कमल लेले
निवृत्त उपशिक्षिका, प्रा. वि. मंदिर, पुणे ५.

*दिव्यत्वाची जेथे प्रचिती ।*
*तेथे कर माझे जुळती ॥*

माझ्या जीवनात काही आदर्श व्यक्ती आल्या आणि कायमचा ठसा उमटवून गेल्या. त्यात कै. मा. ताटके सर यांना मी कधीच विसरू शकत नाही. त्यांना मी अन्नदाताच मानते.

ताटके सर सेक्रेटरी असताना १९७३ साली मी हायस्कूलच्या कोणत्याही शाखेत मला शिक्षकाची नोकरी मिळावी म्हणून अर्ज केला होता. मला त्यांनी प्राथमिक शाळेत अर्ज करावयास सांगितला आणि योगायोगाने त्याच शाळेत १ जूनपासून उपशिक्षिका म्हणून कामाला सुरुवात केली. मला नोकरी मिळाली अशा अर्थाने मी त्यांना अन्नदाता म्हणत नाही, तर मला मार्गदर्शक म्हणूनही ते लाभले. माझा त्यामुळे जीवनप्रवाहच बदलला गेला म्हणून.

स्वत: ताटके सरांनी माझा इंटरव्ह्यू घेतला. पण तो नेहमीप्रमाणे प्रश्नांचा भडिमार करून किंवा सर्टिफिकेट पाहून नाही तर त्यांनी माझी गणिताची आवड पाहून व माझा विषय ही गणित होता म्हणून नवीन आलेली गणिताची पुस्तक माझ्यासमोर ठेवली. मी पुस्तके चाळली. त्यांनी काही प्रश्न विचारले. मी मोकळेपणाने माझी मते मांडली. त्यांच्या चेहऱ्यावर मला समाधान दिसले. नंतर प्रमुख्याध्यापक, मुख्याध्यापक व इतरांनी रीतसर इंटरव्ह्यू घेतला.

शाळेचा पहिला दिवस, सकाळी शाळा. समाधानी व आनंदी मनाने मी शाळेत प्रवेश केला. एका नावाजलेल्या मोठ्या शाळेत मला नोकरी मिळावी हा जणू स्फूर्तीचा जिवंत झराच गवसला. मला हवी तशी शाळा मिळाली. कार्याला इथे भरपूर वाव आहे हे माझ्या लक्षात आले. हा माझ्या आयुष्यातला दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल.

माझा एकच वर्ग मुलींच्या शाळेत होता. मा. ताटके सर त्या बाजूने बरेच वेळा कॉलेज आहे तिकडे ऑफिसला जात असत. कधीतरीच ते मला दिसत. त्यांचे लक्ष चौफेर असे. त्यावेळी ताटके म्हणजे मॉडर्न आणि मॉडर्न म्हणजे ताटके असू जणू समीकरणच बनले.

ताटके सर गणित शिकविण्यात हातखंडा असलेले, मितभाषी, त्यांचे मोजकेच पण बरेच काही सांगून जाणारे विचार असत. त्यांची गुणग्राहकता तर मला अनेकवेळा प्रकर्षाने जाणवली. त्यांची शिस्त कडक होती, पण मला कधीही त्रास झाला नाही.

माझ्याकडे आंतरशालेय स्पर्धेचे काम होते. ताटके सर त्यांच्या नातवाच्या चौकशीसाठी वर्गाबाहेर थांबत. मी 'आत या' असे म्हटल्यावर 'बाई, मी पालक म्हणून आलो आहे' असे म्हणाले व जास्त वेळ न घेता निघून गेले. ते वेळेला अतिशय महत्त्व देत. एवढे प्रो. ए. सो. चे सेक्रेटरी, पण किती नम्र !

पालक सभेला ते स्वत: वेळेवर हजर असत. एका वर्षी मला पालकांचे प्रश्न व नावे लिहावयाला पुढे बसवले होते. शैक्षणिक व इतरही प्रश्न पालक विचारत होते. पण सरांची उत्तरे देण्याची पद्धत वाखाणण्यासारखी होती. काही बाबतीत तर ते पालकांना निरुत्तर करीत.

शाळेत असतांना मागासवर्गीय मुलांकडून ते उत्तम प्रकारे गीता पाठ करून घेत असत. आम्हाला विस्तार अधिकाऱ्यांनी सांगितल्यावर मी ही पहिलीच्या वर्गातून मुलांकडून गीतेचा १२ व अध्याय पाठ करून घेतला. बक्षीस समारंभाला मा. श्री. द. मा. मिरासदार आले होते, त्यांनी मुलांचे कौतुक केले.

ताटके सरांनी गणित, विज्ञान या पुस्तकांचे लेखन केले. ते नेहमी म्हणत, 'शिक्षक हा विद्यार्थी असतो.' अध्यापनाबरोबरच अध्ययनही केले पाहिजे. मीही गणिताची पुस्तके, टि. म. वि., महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षेसाठी पुस्तके लिहिली. शिष्यवृत्तीच्या पुस्तकाचेही काम केले, पण मला मूल स्त्रोत मिळाला तो ताटके सरांकडूनच.

असे शिक्षकांशी आपुलकीने, जिव्हाळ्याने वागणारे व शिक्षकांचे हित पाहणारे ताटके सर. त्यांच्या स्मृतीला मी नम्र अभिवादन करते व फूल नाही पण फुलाची पाकळी म्हणून ही स्मृतिगंधाची श्रद्धांजली वाहते. म्हणावेसे वाटते.

*झाले बहु, होतील बहु*
*परंतु या सम हाच* ■■■

# मॉडर्न हायस्कूलच्या सुवर्णयुगाचे मानकरी- कै. विष्णू त्र्यंबक ताटके

- सौ. मनोरमा सीताराम अभंग

प्रो. ए. सो. चे प्राथमिक विद्या मंदिर, पुणे ५,

उदात्त ध्येयवादाने प्रेरित झालेली उत्तरोत्तर प्रगतीपथावर अग्रेसर होणारी, कर्तृत्वशाली व्यक्तींची परंपरा निर्माण करणारी अशी ही प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्था, कै. शं. रा. कानिटकर, व्ही. के. जोग आणि कै. वि. त्र्यं. ताटके सर ह्या त्रयींनी नावारुपास आणलेली ही संस्था, निरनिराळ्या क्षेत्रांत अग्रेसर असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनी समाजास देणारी ही संस्था, शिक्षणाबरोबरच सामाजिक, राजकीय क्षेत्रात आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटवणारी ही संस्था, अशी विविध रूपे असणारी आमची संस्था तिचे वैभव काय वर्णावे ? बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, थोर विचारवंत ग. प्र. प्रधान, भाऊसाहेब शिरोळे, उद्योगपती अरुण फिरोदिया, श्री. अविनाश वारदेकर, मा. शिवाजीराव ढेरे, वि. भा. पाटील, डॉ. लीला भागवत, डॉ. अशोक कानेटकर. डॉ. किणीकर, डॉ. अनिल अचवट, सौ. इंद्रायणी सावकार, प्रा. भैय्यासाहेब ओंकार ही आणि अशी अनेक मंडळी आमचे माजी विद्यार्थी, ज्यांनी समाजात आपल्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाने ठसा उमटवला आहे. वरील यादीमध्ये आणखीही वाढ होईल. पण ही परंपरा निर्माण करणारे कै. कानिटकर, कै. कोपरकर सर व कै. ताटके सर ह्या दुथडी भरून वाहणाऱ्या गंगेची गंगोत्री होत. ह्या पुण्यवान, यशवंत मंडळींचा वावर ज्या वास्तूत होता, तेथे सेवा करण्याचे भाग्य मला लाभले, यात माझ्या जीवनाचे सार्थक आहे असे मी म्हणेन.

१९५४ ते १९६६ या काळात श्री. वि. त्र्यं. ताटके सर जवळजवळ १ तप मुख्याध्यापक होते. त्यांच्या कारकीर्दीत शाळेने यशाचा कळस गाठला. अनिल खर्शीकर हा विद्याथी बोर्डात प्रथम आला. श्री. ताटके सर उत्तम वक्ते, शिस्तप्रिय, नि:स्वार्थी, निगर्वी, योग्य प्रशासक होतेच, पण त्याचबरोबर गणित, शास्त्र, भूगोल हे विषय अत्यंत रंजकतेने, आत्मीयतेने शिकवत. सेवानिवृत्तीनंतरही संस्थेचे ते कार्यवाह होते.

पुण्यातील मोठ्या शाळांमधील सहकाऱ्यांबरोबरच लहान शाळांबरोबरही त्यांचा संबंध होता. उत्तमोत्तम शिक्षक तयार करताना त्यांच्या गुणांना वाव देणे, त्यांना नवनवीन प्रशिक्षणाच्या शिक्षणाच्या वाटा उपलब्ध करून देणे, स्वत: पाठ घेऊन मार्गदर्शन करणे, या व अशा अनेक उपक्रमांचा ध्यास त्यांना लागत असे.

सर्व संस्थेतील कर्मचारी यांना आपल्या घरातील लोकांप्रमाणे वागणूक देणारे सर अत्यंत मृदू स्वभावाचे होते, हे सांगूनही खरे वाटणार नाही.

मी व माझा भाऊ त्यावेळी एम्.ई.एस्. (डेक्कन - आत्ताची विमलाबाई गरवारे) या शाळेत होतो. पण मॉडर्नमधील मित्रांच्या भूगोलाच्या नोटस्- सरांच्या विषयाच्या मिळवत असू व अभ्यास करत असू. त्यावेळेपासूनच ताटके सरांची शिस्त, दरारा, अभ्यासाची पद्धत याबद्दल आम्ही ऐकून होतो.

मॉडर्न कॉलेजची स्थापना हे ताटके सरांचे स्वप्न होते. कॉलेजच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. एका ठराविक आखून दिलेल्या मार्गाने प्रोग्रेसिव्हचा विकास करणे हे त्यांचे ध्येय होते. म्हणून नवीन शाळांचा विचार असो, शिक्षकांच्या नियुक्त्या असोत, किंवा देणगीदाराकडून संस्थेचे, शाळेचे नाव बदलण्याचा प्रस्ताव असो, या सर्व ठिकाणी ते निष्ठेने अढळ राहिले. तत्त्वासाठी यांनी कधीही तडजोड केली नाही, कुणापुढेही मान तुकवली नाही. त्यांच्याबरोबरच्या मंडळींना त्यांचे हे विचार ते पटवून देत. त्यांचा शब्द प्रमाण मानला जाई. आपल्या पश्चात् सेवानिवृत्तीनंतरही योग्य शिक्षकांची फळी त्यांनी तयार केली होती.

अशा या थोर शिक्षकाला, उत्तम प्रशासकाला माझे शतश: प्रणाम आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते.

*दिव्यत्त्वाची जेथ प्रचीती*
*तेथे कर माझे जुळती ॥*

■■■

# गुरुवर्य

सातार्‍यासी, माहुली गावी, कृष्णा-वेण्णा संगम ।
ताटके कुळी, संस्थेसाठीच, व्ही. टी. घेती जन्म ।। १ ।।

बालपणी ते मातापित्यांचे, जरी हरपले छत्र ।
वासुदेव या ज्येष्ठ बंधूंनी, विष्णु मानला पुत्र ।। २ ।।

सातार्‍यासी हायस्कूलमध्ये आले मॅट्रिक ऽ ।
पुण्यास येऊन, पदवी घेता, झाले अध्यापक ।। ३ ।।

शिक्षणाचा भक्कम व्हावा पाया तो म्ह ऽ णून ।
जिद्दीने सहकारी करती, संस्था ही स्थापन ।। ४ ।।

परिश्रम अन्, स्फूर्ती जिद्द पणास लावूनी ।
शिक्षक पेशा करीती सार्थ, रमती अध्यापनी ।। ५ ।।

त्रिवेणी संगम होता येथे विद्या, बुद्धी आणि यत्न ।
लेखक, अध्यापक अन् झाले, प्रशासक उत्तम ।। ६ ।।

भूगोल, शास्त्र, गणिताचे ते अतिरथी महारथी ।
पारितोषिके, सुवर्णपदके यांची नाहीच गणती ।। ७ ।।

संस्थेला तो सदा लाभला, सदैव उर्जित काळ ।
वास्तु आपुला, गळा घालितो, सदा यशाची माळ ।। ८ ।।

वेष साधा, भोळा होता, होते उच्च विचारी ।
बुद्धिमान नी कार्यकुशल ते, होते परोपकारी ।। ९ ।।

पत्नी मनोरमा, शांत मूर्ती, संसारी हो दक्ष ।
यास्तव होते, सदा संस्थेवर, व्ही. टी. चे हो लक्ष ।। १० ।।

संस्थेची मी, राहीन ऋणी, करीत ही प्रार्थना ।
व्ही. टी. ताटके, संस्थेसाठी, अवतरोत पुन्हा ।।११ ।।

- सौ. नीला वि. रानडे माजी शिक्षिका, प्रा. वि. मंदिर

# मला भावलेले ताटके सर

- सुधा कुलकर्णी

ताटके सर म्हटले की करारी, शिस्तप्रिय, वक्तशीर, थोडेसे गंभीर असे व्यक्तिमत्त्व डोळ्यापुढे उभे राहते. परंतु त्यांचा स्वभाव फणसासारखा होता. वरून जरी काटेरी तरी आतून मऊ गोड गरे असलेला. त्यांनी कितीतरी लोकांना पोटापाण्याला लावले.

कोट, डोक्याला काळी टोपी व पांढरे शुभ्र धोतर अशा पारंपारिक पोषाखात ते ज्यावेळी शाळेत राऊंड मारायला ऑफिसमधून बाहेर पडत त्यावेळी वर्गावर्गात मुले तर शांत बसतच पण शिक्षकही आपापल्या कामात गर्क होत असत. त्यांचा प्रेमळ धाकच तसा होता.

काही कामानिमित्त त्यांच्या ऑफिसमध्ये गेले तर शांत, धीरगंभीर स्वरात ते आपले स्वागत करीत व अगत्याने कामाची चौकशी करीत. त्यांच्या खुर्चीच्या मागे राष्ट्रपतींच्या हस्ते पारितोषिक स्वीकारतानाचा फोटो दृष्टीस पडे. त्यावरून कळून येई की या माणसानी अथक परिश्रम तर केले आहेतच पण त्याचबरोबर बुद्धीची जोडही आहे.

मी मुलींच्या मॉडर्न हायस्कूलच्या शाळेत काम करीत असल्याने प्रत्यक्ष हाताखाली काम करण्याची संधी मला मिळाली नाही, परंतु पूना रिजन ॲमेच्युअर ॲथलेटिक्स असोसिएशनचे ते कार्याध्यक्ष होते व मी सहचिटणीस होते, त्यावेळी त्यांच्या मार्गदर्शनाचा मला फार फायदा मिळे. काहीही अडचण असू दे ते त्यातून अचूक मार्ग काढीत असत. मुंबईला स्टेट मीट होती. पूना रिजनची टीम घेऊन जाण्याची दरवर्षीप्रमाणे माझ्यावर जबाबदारी होती. खेळाडू खूप व व्यवस्थापक त्यामानाने कमी. मी त्यांच्याकडे गेले व माझी अडचण सांगितली. त्यांनी ताबडतोब मॉडर्न हायस्कूलमधील प्रसिद्ध ॲथलेटिक्स कोच बापू गायकवाड यांना घेऊन जाण्यास सांगितल व माझे काम हलके झाले.

मुंबई-पुणे ड्युअेल मीटच्या वेळी मुंबईच्या खेळाडूंची राहण्याची व्यवस्था मॉडर्न हायस्कूल व मुलींची शाळा यांमध्ये होत असे. त्यावेळी व्यवस्था नीट झाली की नाही हे ते स्वत: जातीने बघत असत.

खेळाडूंचे शिबीर असो किंवा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ असो, अध्यक्ष म्हणून ते ताबडतोब येत. आपल्याच घरचे काम आहे असे म्हणून वेळेवर हजर असत.

पूना रिजनच्या वारंवार मीटिंग्ज होत असत. कधी कधी वादाचे मुद्दे उपस्थित होत. गरमागरम चर्चा होत. त्यावेळी अध्यक्ष म्हणून दोन्ही बाजूंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊन, तितक्याच निश्चयाने ते त्यातून मार्ग काढीत व दोन्ही बाजूंना शांत करीत. त्यावेळी त्यांच्या बुद्धीची तडफ व शांतपणे परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य लक्षात येई.

महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक असोसिएशनच्या मीटिंग्ज मुंबईला होत. त्यावेळी सुद्धा मीटिंग काबूमध्ये ठेवण्याची त्यांची तडफ उल्लेखनीय असे. एकदा मीटिंग झाल्यावर आम्हाला 'ताजमहाल'मध्ये जेवण होते. त्या ठिकाणी बार होता. बहुतेक लोक तिकडे पळाले. मी व सर संत्र्याचा रस पीत व त्या लोकांची वाट बघत बाहेर इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत थांबलो. कारण आम्ही दोघेही 'खाणारे' किंवा 'पिणारे' नव्हतो. वारंवार असे प्रसंग येत. जेवण झाले की आम्ही पुण्याकडे प्रयाण केले.

त्याकाळी अलका दिघे, लता जाचक या मुली नॅशनल लेव्हलवर उत्तम कामगिरी करीत होत्या. नवीन नवीन रेकॉर्डस् करीत होत्या. नॅशनल ॲवॉर्डस् मिळवीत होत्या. त्यावेळी त्यांनी बोलावून त्यांची ते तोंडभर स्तुती करीत. त्यांना प्रोत्साहन देत मी त्यांची मार्गदर्शक म्हणून माझी वाहवा करीत असत. त्यांच्या शाबासकीने मलाही काम करण्यास हुरूप यावयाचा.

व्यावसायिक दृष्टीने तर ते मला मार्गदर्शन करीत होतेच; पण माझ्या खाजगी आयुष्यातसुद्धा योग्य तो सल्ला देऊन त्यांनी मला उपकृत केले आहे. त्याचे असे झाले की माझ्या मुलीला माहुलीचे स्थळ बघितले होते. मुलगी पसंत होती. ताटके सर माहुलीची म्हणून ती माणसे चौकशीसाठी सरांच्याकडे गेली. त्यावेळी ताटके सरांच्या म्हणण्यावर मतावर त्यांचा होकार अवलंबून होता. त्यावेळी सरांनी माझ्याबद्दल व माझ्या मुलीबद्दल गौरवोद्गार काढले व हिरवा कंदील दाखविला व पुढे माझ्या मुलीचे लग्न झाले. आज ती सुखाने संसार करीत आहे. हे त्यांचे ऋण मी जन्मभर विसरणार नाही.

अशा या थोर व्यक्तिमत्त्वाला माझे शतश: प्रणाम.

■■■

# आठवणी कै. ताटके सरांच्या

- सौ. निर्मला कुलकर्णी
प्रा. वि. मंदिर

१९९१ च्या धरणफुटीपर्यंत मॉडर्न हायस्कूल व प्राथमिक विद्यामंदिरमधील आम्ही बऱ्याच शिक्षिका व शिक्षक शनिवार पेठेत राहात होतो. साहजिकच ओंकारेश्वरच्या कॉजवेवर किंवा मागे-पुढे कधी कधी ताटके सर असायचे. ते आमच्याशीही बोलायचे. आम्हाला मात्र गडबडल्यासारखे व्हायचे. आमच्या संस्थेचे संस्थापक, मॉडर्न हायस्कूलचे हेडमास्तर, एक गणिततज्ञ अशा सरांशी बोलताना मनावर दडपण यायचे.

पानशेतच्या पुराचे दिवशी वृद्धेश्वराचे मागील बाजूच्या मागास वस्तीतील लोक आपले सामान घेऊन शाळेत येताना दिसले. त्या दिवसापासून त्यांची वस्ती बरेच दिवस शाळेतच होती. सर रोज शाळेत जात व त्यांची चौकशी करीत. त्यांना सातारा, माहुली व वाईचा अभिमान होता. त्यांची राहणी अतिशय साधी पण दरारा मोठा होता. मॉडर्नचे नाव शिक्षणक्षेत्रात गाजत होते. ते अशा ध्येयवादी आणि उत्कृष्ट शिक्षकांमुळेच. ताटके सर म्हणत, ''कुणी कितीही देणगी दिली तरी मॉडर्न हायस्कूलचे नाव कधीही बदलले जाणार नाही.'' ही विचारधारा आजही कायम आहे. मी तुमच्या शाळेत येत नसलो तरी माझे सगळीकडे बारीक लक्ष असते, असे म्हणत.

संस्थेचे कॉलेज सुरू करण्यासंदर्भात एकदा त्यांनी आम्हा प्राथमिक शिक्षकांची एक सभा घेतली. पैशांची गरज होती. तुम्ही अगदी हजार दोन हजार रुपये ठेव म्हणून द्या. आम्ही योग्य ते व्याज देऊ असे ते म्हणाले. मी स्वतंत्रपणे त्यांना भेटून त्यांना सांगितले, ''माझी मुलगी लग्नाची आहे. लग्नासाठी ठेवलेले रुपये दहा हजार मी संस्थेकडे ठेवू शकते पण मुलीचे लग्न ठरल्याबरोबर ती रक्कम मला लागेल.'' ''नक्की देऊ'' असे म्हणाले व त्याप्रमाणे मला ते पैसे योग्य वेळी मिळालेच.

आम्ही त्यांचा सत्तरावा वाढदिवस इ. ४ थीच्या वर्गात अगदीच साधेपणाने साजरा केला. अशाच एका सभेत आपल्या संस्थेचे कॉलेज पाहण्याची इच्छा आम्ही प्राथमिक शिक्षकांची व्यक्त केली. त्यांनी ३-४ दिवसातच तशी व्यवस्था चहापानासह केली.

आम्हा कुणाच्याही घरी कधी समारंभानिमित्त बोलावले तर सहकाऱ्यांसह नक्की येत. संस्थेच्या वर्धापन दिनी दरवर्षी मुलांच्या वसतिगृहात सर्व सेवकांना जेवण असे. बेत उत्तम असे. जेवणाच्या मेनूवरही सरांचे लक्ष असे.

■■■

*With Best Compliments from*

**R. S. ENTERPRISES**

**CIVIL CONTRACTORS**

Prop. : Rahul Sandbhor

318, Shivajinagar,
Pune 411005.

Tel. No. 552 02 73

# संस्थेची भरारी

- ॲड. बाबा चव्हाण

माझे माध्यमिक शाळेतील शिक्षण मॉडर्न हायस्कूल, शिवाजीनगर येथे १९५४ ते १९६० साली झाले. भाषा, गणित व विज्ञान, इतिहास-भूगोल अशा सर्व विषयांना आम्हाला नामांकित अध्यापक शिकवत होते. त्या शिक्षकांचा आदर्श अजूनही आमच्या डोळ्यांपुढे आहे. गुरुवर्य कै. वि. त्र्यं. ताटके हे शाळेचे मुख्याध्यापक होते. शिवाय ते अत्यंत करड्या शिस्तीचे प्रशासक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा विलक्षण दरारा होता.

त्या काळात जवळ जवळ दरवर्षी आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांची नावे गुणवत्ता यादीत एस.एस.सी. बोर्डाच्या झळकत असत. मॉडर्न हायस्कूलचा सुवर्णकाळ असे ज्याचे वर्णन करता येईल असा तो काळ होता.

मॉडर्न हायस्कूलमधील त्या काळातील वर्गमित्र अधूनमधून एकत्र येतो. आता प्रत्येकाची नोकरी अगर व्यवसाय निरनिराळे आहेत. त्यामुळे सर्वांची कार्यक्षेत्रेही निरनिराळी आहेत. पण मॉडर्न हायस्कूलमधील विद्यार्थीदशेतील एकत्र घालविलेले दिवस हा आम्हाला जोडणारा दुवा आहे. आम्ही जेव्हा एकत्र येतो तेव्हा हमखास त्या काळातील आमच्या सरांच्या आठवणी निघतात. त्यांची वैशिष्ट्ये, त्यांनी आमच्यावर केलेले संस्कार किती मोलाचे आहेत ते आता जाणवते.

तसं पाहिलं तर संस्कार करण्यासाठी स्वतंत्र तास होता असं नव्हे, परंतु त्या शिक्षकांचे बोलणे-वागणेच इतके प्रभावी असे की आमच्यावर त्याचे संस्कार घडत असत. आता जाणवते ते असे की अगदी तुटपुंज्या पगारावर ते नोकरी करत असत. पण तसे दैन्य कुणीच दाखवून दिले नाही. आम्हां विद्यार्थ्यांवर आमच्या सरांनी उदंड प्रेम केले. आणि जसजसे आमचे वय वाढत चालले आहे तसतसे त्या संस्कारांचे महत्त्व आम्हाला प्रकर्षाने जाणवते आहे.

माझे शालेय शिक्षण संपले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. वकिलीची परीक्षा दिली व वकिली सुरू केली आणि त्याबरोबरच सामाजिक कामात रस घेऊ लागलो. या कामाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी या शिक्षणसंस्थेत काम करू लागलो.

त्याची थोडी पार्श्वभूमी अशी आहे. १९८६ साली काही उत्साही तरुण एकत्र आले व प्रो. ए. सोसायटीच्या नियामक मंडळाची निवडणूक लढवायची त्यांनी ठरविले. बहुसंख्येने ते निवडून आले. त्या सर्वांचा व माझा घनिष्ठ संबंध असल्यामुळे मीही संस्थेच्या कामात अधिक रस घेऊ लागलो. आता प्रो. ए. सोसायटीत प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे काम करायला लागून १६ वर्षे पूर्ण झाली.

प्रो. ए. सोसायटीची गौरवशाली परंपरा व मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ चा महाराष्ट्रभर असलेला नावलौकिक यामुळे आपल्यावर मोठी जबाबदारी आहे याची आमच्या सहकाऱ्यांना पहिल्यापासूनच जाणीव आहे. माझ्याप्रमाणेच इतर काहीजण मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ चे माजी विद्यार्थी आहेत. त्यामुळे आमच्या कामाला एक भावनिक मूल्यही आहे.

गेल्या सोळा वर्षांत आमच्या सहकाऱ्यांनी प्रचंड काम केले आहे. त्यामुळे संस्थेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. शिशु विद्या मंदिर, प्राथमिक शाळा, हायस्कूल, महाविद्यालय अशा सर्वच स्तरावर नवनवीन संस्था उभ्या केल्या आहेत. मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमात शिक्षण देण्याची सोय आहे. पुणे शहर व परिसर तसेच निगडी, भोसे, वारजे अशा ठिकाणीही प्रो. ए. सोसायटीच्या संस्था कार्यरत आहेत.

यापुढेही काही विस्ताराच्या योजना संस्थाचालकांच्या डोळ्यापुढे आहेत. काही भव्य प्रकल्प

आहेत. संस्थेच्या नित्याच्या कामकाजात सहभाग असणारी म्हणजे नियामक मंडळ, आजीव सदस्य मंडळ, आजीव कार्यकर्ता मंडळ या तिन्ही मंडळातील सदस्य एकदिलाने संस्थेचे काम करीत आहेत. गेले आठ वर्षे कार्याध्यक्ष या नात्याने डॉ. गजानन एकबोटे समर्थपणे नेतृत्त्व करीत आहेत.

संस्थेची ही भरारी पाहता आली हे मी माझे भाग्य समजतो.

कै. शंकररावजी कानिटकर, कै. ताटके सर, कै. चाफेकर सर, अण्णा पटवर्धन सर, मेहंदळे सर, पंचनदीकर सर, ठोंबरे सर व अन्य सहकारी शिक्षक यांच्या स्वार्थत्यागावर उभारलेली व वाढलेली ही संस्था आहे. या गोष्टीची सर्व सदस्यांना जाणीव आहे. त्यांनी घालून दिलेले आदर्श जपण्याचा सर्व सदस्य आटोकाट प्रयत्न करीत आहेत. प्रो. ए. सोसायटीची गौरवशाली परंपरा करण्यात त्या शिक्षकांचा अतुलनीय त्याग, कामावरील निष्ठा कारणीभूत आहेत. ती परंपरा जपण्यासाठी आम्हा सर्वांना शक्ती प्राप्त होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. ■■■

## गुरुवर्य कै. वि. त्र्यं. ताटके जन्मशताब्दी समारोहनिमित्त संस्थेने साजऱ्या केलेल्या व नियोजित घटना

१) १९ ऑक्टोबर २००२ या दिवशी समारोहाचे उद्घाटन : कै. ताटके सरांचे एक नामांकित विद्यार्थी माननीय श्री. अरुण फिरोदिया, मॅनेजिंग डायरेक्टर, कायनेटिक इंजिनिअरिंग यांचे 'आठवणीतील ताटके- सर'' ह्या विषयावर व्याख्यान. तसेच प्रसिद्ध व थोर शिक्षणतज्ञ डॉ. प्र. ल. गावडे यांचे ''गुरुवर्य-ताटके सर - थोर शिक्षक व प्रशासक'' ह्या विषयावर व्याख्यान.

२) पुणे विद्यापीठ इलेक्ट्रॉनिक्स् डिपार्टमेंट व मॉडर्न कॉलेज, पुणे ५ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६, १७, १८ डिसेंबर २००२ या दिवशी राष्ट्रीय पातळीवरील परिसंवाद, परिसंवादाचा विषय होता 'बेसिक सायन्सेस ॲज अ करियर' सदर परिसंवाद कै. ताटके सरांच्या स्मृतीला अर्पण केला.

३) मॉडर्न कॉलेज, पुणे ५ मधील अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज कॉम्प्युटर लॅबोरेटरीला कै. ताटके सरांचे नाव देण्यात येणार आहे.

४) कै. ताटके सरांचे विद्यार्थी, कुटुंबीय, परिचित, चाहते यांच्या लेखांचा एक स्मृतिग्रंथ प्रकाशित करण्यात येत आहे.

५) कै. ताटके सर गणिताचे नामवंत शिक्षक होते. यासाठी विश्वविख्यात शास्त्रज्ञ व गणिती डॉ. जयंत नारळीकरांचे व्याख्यान.

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

## संस्थेचे पदाधिकारी (१९३४-२००३)

### अध्यक्ष

| नं. | नांव | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | खान बहादूर एम. एन. मेहता | १९३४ | १९४२-४३ |
| २. | मेजर राजा श्रीमंत मालोजीराव मुधोजीराव उर्फ नानासाहेब नाईक निंबाळकर, राजा ऑफ फलटण | १९४३-४४ | १९४६ |
| ३. | सर मनेकजी एन्. मेहता | १९४६ | १९६३ |
| ४. | श्री. एन. व्ही. गाडगीळ | १९६३ | १९६६ |
| ५. | श्री. एस. जी. बर्वे | १९६६ | १९६७ |
| ६. | श्री. डी. जी. कर्वे | १९६७ | १९६७ |
| ७. | श्री. व्ही. एस. वैद्य | १९६८ | १९७९ |
| ८. | श्री. ए. एस. वारदेकर | १९८० | १९८२ |
| ९. | श्री. एम. बी. कटारिया | १९८३ | १९८५ |
| १०. | श्री. ए. एस. वारदेकर | १९८६ | १९८८ |
| ११. | मा. बॅ. विठ्ठलरावजी गाडगीळ | १९८८ | २००१ |
| १२. | मा. श्री. विघ्नहरीमहाराज देव | ६ फेब्रु. २००१ | ३१ डिसें. २००१ |
| १३. | पद्मभूषण मा. श्री. बाळासाहेब भारदे | १ जाने. २००२ | ३१ डिसें. २००३ |

### कार्याध्यक्ष, नियामक मंडळ

| नं. | नांव | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | खान बहादूर एम. एन. मेहता | १९३४ | १९६१ |
| २. | प्रा. एन. जी. सुरु | १९६१ | १९८० |
| ३. | श्री. व्ही. एम्. लिमये | १९८० | १९८३ |
| ४. | डॉ. आर. एस. काळे | १९८३ | १९८३ |
| ५. | श्री. एम. जी. चाफेकर | १९८६ | १९८९ |
| ६. | श्री. एस. आर. आपटे | १९८९ | १९९२ |
| ७. | श्री. एम. जी. चाफेकर | ऑगस्ट १९९२ | ३१ डिसें. १९९३ |
| ८. | डॉ. गजानन र. एकबोटे | १ जाने. १९९४ | ३१ डिसें. २००३ |

## कार्यवाह

| नं. | नांव | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | प्रा. एस. आर. कानिटकर | १९३४ | १९४८ |
| २. | श्री. व्ही. टी. ताटके | १९४८ | १९७४ |
| ३. | श्री. व्ही. एस. गोखले | १९७४ | १९८६ |
| ४. | प्रा. एस. आर. रायकर | १९८६ | १९९३ |
| ५. | प्रा. डॉ. ए. के. पांडे | १९९४ | १९९९ |
| ६. | प्रा. जी. पी. गायकवाड | १९९९ | आजपर्यंत |

*With Best Compliments from*

**MAX TELECOMUNICATIONS**

**" Any problem to your mobile / cordless / telephone ?"**
**Call : 9823034190 / 9823150399**

**Repairs & Services of all kind of**
**Telephone, Cordless, EPABX Systems.**

**Mobile Phone**

**Shop No. 13, Sankla Arcade, Opp. MKR Telephone Exchange,**
**Beside Girija Hotel, Near Nal Stop, Karve Road, Pune 4.**
**Ph. : (020) 5433700, 5447470**

# नियामक मंडळ

(दि. १ डिसेंबर २००२ रोजी अस्तित्वात असल्याप्रमाणे)

डॉ. गजानन र. एकबोटे, कार्याध्यक्ष
प्रा. गीताराम गायकवाड, कार्यवाह
श्री. दिलीपसिंग परदेशी, उप-कार्यवाह
ॲड. श्री. बाबासाहेब चव्हाण
प्रा. सुरेश तोडकर, सह-कार्यवाह
श्री. शरद इनामदार
श्री. बाळासाहेब हगवणे
श्रीमती अमिता किराड
श्री. मिलिंद र. एकबोटे
श्री. दिलीप परब
प्रा. सुधीर वैशंपायन
सौ. अश्विनी जोशी
ॲड. श्री. जगन्नाथ घुगे
श्री. अशोक औताडे
प्रा. श्री. अनंत गोसावी
(Ex-Officio-member)

डॉ. माधव शं. नामजोशी. उप-कार्याध्यक्ष
प्रा. प्रकाश दीक्षित, उप-कार्यवाह
प्रा. पद्माकर स. चिरपुटकर
श्री. निशिकांत बडवे
श्री. गजानन आपटे
श्री. चंद्रकांत शेट्टी
प्रा. प्रल्हाद काकडे
श्री. चित्तरंजन कांबळे
श्री. संभाजीराव पाटील
डॉ. अरविंद पांडे
प्रा. जगदीश चिंचोरे
सौ. सुजाता पंडित
श्री. यशवंतराव कुलकर्णी
श्री. व्ही. जे. ऊर्फ नाना कुलकर्णी
सौ. प्रतिभा बोपर्डीकर
(Ex-Officio-member)

## संस्थेचे आजीव सदस्य मंडळ (Board of Life Members)

प्रा. गीताराम गायकवाड, कार्यवाह
श्री. दिलीपसिंग परदेशी, उप-कार्यवाह
प्रा. सुधीर वैशंपायन
सौ. अश्विनी जोशी
प्रा. अरुण देशपांडे
प्रा. दत्ता लिमये
सौ. शुभांगी ओगले
श्री. उद्धव खरे

डॉ. अरविंद पांडे
प्रा. जगदीश चिंचोरे
प्रा. प्रकाश दीक्षित
सौ. सुजाता पंडित
सौ. प्रतिभा बोपर्डीकर
प्रा. मानसिंग साळुंके
सौ. मृगजा कुलकर्णी

## आजीव कार्यकर्ता मंडळ (Board of Life Workers)

डॉ. गजानन र. एकबोटे, अध्यक्ष
डॉ. माधव शं. नामजोशी, उपाध्यक्ष
प्रा. सुरेश तोडकर

ॲड. श्री. बाबासाहेब चव्हाण
श्री. संभाजीराव पाटील
प्रा. पद्माकर स. चिरपुटकर, कार्यवाह

# वाचनीय पुस्तकांची मालिका

**संवादविश्व - (ले. सुषमा दातार)** : प्रसारमाध्यमांविषयी सर्वंकश माहिती देणारे मराठीतील एकमेव पुस्तक. इ.स. पूर्व ४००० ते इसविसन २००० पर्यंतच्या कालावधीतील संवाद साधण्यासाठीच्या क्रांतिकारी शोधांची जंत्री. भरताच्या नाट्यशास्त्रापासून ते थेट रेडिओ, दूरचित्रवाणी, चित्रपट, जाहिरातमाध्यम, इंटरनेट पर्यंतचे सहजसुलभ भाषेत विवेचन. वृतपत्रविद्येच्या अभ्यासकांना तर सर्वार्थाने उपयुक्त असे पुस्तक. किंमत रु. १७५/-

**'गाथा पदभ्रमणाची' - (ले. श्री. रा. दि. भट)** : वयाच्या साठाव्या वर्षी पायी प्रवास व गिर्यारोहण सुरू करून २० वर्षांत १०,३८२ कि.मी. केलेला पायी प्रवास व १८,५०० फूट उंचीवरील हिमालयातील केलेला ट्रेक म्हणजेच कैलासमानस, अन्नपूर्णा बेस कॅम्प, पंचकेदार, एव्हरेस्ट बेस कॅम्प, लेह लडाख, अमरनाथ यात्रा, गंगटोक, छोटा कैलास, मणिमहेश, नर्मदा परिक्रमा व गुहागर-वेंगुर्ला ते कोचीन, कालिकत, कन्याकुमारीपर्यंत सलग सागरी किनाऱ्याची पायी सफर या सर्वांचे रोचक जिवंत अनुभवकथन. किंमत रु. ७०/- (सर्वत्र उपलब्ध)

**मी अनुभवलेला भूगोल - (ले. श्री. वा. म. गोगटे)** : जगातील पर्यटक जेथे सहसा जात नाहीत अशा १८ विविध देशांत प्रवासाची संधी मिळालेले लेखक श्री. वा. म. गोगटे यांनी स्वत: जाऊन पाहिलेल्या व प्रत्यक्ष अनुभवलेल्या भौगोलिक गमतींचे वर्णन. किंमत रु. ६०/- (सर्वत्र उपलब्ध)

**फक्त एक मुशाफिरी - (ले. डॉ. विजय घैसास)** : ज्या कोणाला गडभ्रमंती व निसर्गातील मुक्तसंचार शक्य नसेल त्यांना घरबसल्या त्याचा आनंद घेता येईल. ट्रेकिंगची खूप आवड आहे; पण वेळच होत नाही अशांना ट्रेकिंगचा 'मूड' आणणारे पुस्तक. दोन प्रथितयश डॉक्टर्सनी केलेले अफलातून ट्रेकिंग. किंमत रु. ६०/-

**झुंज हिमालयाशी - (ले. श्री. प्रभाकर पाटणकर)** : सर्वसामान्य माणसापासून ते अव्वल दर्जाच्या गिर्यारोहकापर्यंत सर्वांनाच हिमालयाचे आकर्षण सतत वाटत आलेले आहे. १९२० ते १९५३ मध्ये झालेल्या हिमालयातील एव्हरेस्ट, कांचनगंगा, नंदादेवी, नंगापर्वत या अत्युच्च शिखरावरील जीवघेण्या-खडतर मोहिमांचा रोमहर्षक इतिहास. शेरपा तेनसिंग व एडमंड हिलरी यांनी एव्हरेस्ट जिंकले. त्या मोहिमेपर्यंतचा वृत्तांत. किंमत रु. ७०/- (सर्वत्र उपलब्ध)

**समृद्धी - ललित लेखसंग्रह (ले. प्रमिला पटवर्धन)** : व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे, वैचारिक, मनोविश्लेषणात्मक विषयांवर सहजसुंदर भाषाशैलीतील लिखाण. वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके यामध्ये पूर्वप्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह. किंमत रु. ६०/- (सर्वत्र उपलब्ध)

**कोंबडीची दिवाळी आणि इतर कविता (ले. प्रमिला पटवर्धन)** : प्रसन्न आणि सुंदर शब्दातील छोट्यांची गाणी, कविता. बालवाडी आणि प्राथमिकसाठी अत्यंत उपयुक्त पुस्तिका. किंमत रु. ३५/- (सर्वत्र उपलब्ध)

संवादविश्व प्रकाशन

४५ वर्षांची प्रदीर्घ परंपरा. — **श्री मुद्रण मंदिर**

अक्षर मुद्रणाची अद्ययावत यंत्रणा. — **स्क्रिप्ट आर्ट**

**९१४, सदाशिव पेठ, नागनाथपाराजवळ, पुणे - ४११ ०३०. फोन : ४४७३३६०.**

हार्दिक शुभेच्छा

# अे. जी. तेलंग ॲण्ड असोसिएटस्

४, हृषीकेश अपार्टमेंटस्, २६, सानेवाडी, औंध, पुणे ४११००७.

**(इंजिनियर्स, कॉन्ट्रॅक्टर्स, डेव्हलपर्स, इंटिरियर्स)**

संपर्क : फोन : ५८८७०८१

***With Best Compliments from***

# MAYURI CONSTRUCTION

**(ENGINEERS & CONTRACTORS)**

101, Dharmanagar, Near Shankar Mandir,
Janwadi, Pune 411 016.

✆ : 5672657 / 5660472 / 5675770

***All types of Civil Works are Done***

Prop. : Anil R. Orse

हार्दिक शुभेच्छा

# मे. बी. बी. कैंची

## फर्निचर कॉन्ट्रॅक्टर

रेडिमेड व ऑर्डरप्रमाणे फर्निचर तयार करून मिळेल.
ॲल्युमिनियम विंडो व स्टील फॅब्रिकेशनची कामे करून मिळतील.
पेंटिंग व सिव्हिल कामे करून मिळतील.
५४, एच. पी. ७९१, लोहियानगर, महात्मा फुले पेठ, पुणे ४२.

फोन : ६३४४४८९

***With Best Compliments from***

# KULKARNI-POMAN ASSOCIATES

**(ENGINEERS & CONTRACTORS)**

***For Institutional, Residential, Industrial***
***&***
***all types of Civil Construction.***

5, Shri Siddhivinayak Apartments,
S. No. 44, Plot No. 2, Parvati, Pune 411009.

*With Best Compliments from*

# R. S. MADKAR & ASSOCIATES

## CIVIL ENGINEERS & CONTRACTORS

Prop. : Rajan Madkar

Office No. 12, Plot No. 60, Hari-Ram Building,
Chinar Society, Ideal Colony,
Kothrud, Pune - 411 029.

✆ : (O) 5465623, (R) 5424732

# ADEPT CONSTRUCTION CO.

## Engineers, Contractors & Builders

759/63, Deccan Gymkhana,
Prabhat Road, Pune - 411 004.

☎ : 543 2798

---

**With Best Compliments from**

# ENGINEERING SERVICES

7, Chaitanyaram Apartments,
Prosperity Society, Karvenagar, Pune 411052.
Telefax : 5461942

**Suppliers of :**

**Educational Equipments for**
- Engineering Colleges
- Medical Colleges
- Science Colleges
- Research Establishments

*With Best Compliments from*

# POWERCON

***MANUFACTURERS & CONSULTANTS IN :***
***Drives & Educational Equipments,***
***Lab, Kits for power electronics, Control Engg.,***
***Instrumentation, Basic Electronics & Communication.***

**2, Laxminagar Commercial Complex 1,**
**Shahu College Road, Pune 411 009.**
**Telefax : 020-4464444 (R) 4224595 Fax service : 4476451**
**Email address : powercon-pune@eth.net**
**Websites :**
**www.trainingkits.net www.seekandsource.com/powercon**

**Prop. : NINAD S. WALIMBE Mobile : 9422037730**

*With Best Compliments from*

# TECH. CONSULTANCY OF INDIA

**Contact for : Channel Partner of EDS Technologies Pvt. Ltd., for CATIA, I-GRIP etc.**
**Also Contact for : Administration Software to Automate Admission, Examination, Accounts, Library & Pay Roll**

**A-21, Gulmohar Habitat, Off Salunke Vihar Road,**
**Pune 411048. Tel. : 9822454607**
**Email : techconsultancyofindia@email.com**

Contact Person : JAI VALVANI

हार्दिक शुभेच्छा

# जयद्रथ क्लॉथ सेंटर

**सूटिंग, शर्टिंग, फॅन्सी साडी, ड्रेस मटेरियल, रेडिमेड, मॅचिंग**

शिवसाई कॉम्प्लेक्स, एन.डी.ए. रोड, वारजे माळवाडी,
पुणे ४११०२९.
फोन : निवास : ५३८४४३१, दुकान : ५२९३१३०

**प्रोप्रा. : के. एस. कडू**

WITH BEST COMPLIMENTS FROM

# Reliable Tech-Solutions (P) Ltd.

87-A/87-B, Patil Plaza, Mitramandal Corner,
Near Saras Baug, Pune 411009. (India)

PHONES : (020) 4446151 / 4446152
FAX : +91-20-4443838
EMAIL : RTSPL@eth.net




*With Best Compliments from*

**Keshar**

**ADVERTISING PRIVATE LIMITED**

1238, Bhawani Peth, Near Palkhi Chowk, Pune 411042.

Tel. : 6354681 - 6353364
Fax : 6354681

हार्दिक शुभेच्छा

**मे. सारंग एंटरप्राईझेस**

**आमचे येथे सर्व प्रकारची रंगाची कामे केली जातात.**

पी.एम्.सी. कॉलनी, ३/७० वाकडेवाडी,
पुणे ४११००३,
फोन : ५५११०९९

प्रोप्रा. : गणपत सोमा मांडवकर

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

# VEDANT SALES CORPORATION

**COLLEGE & OFFICE STATIONERY**

**Flat No. 7, Sukhamani Apartments,**

**330, Aundh, Pune 411007.**

**✆ : 43 20 220**

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

# VHS Electronics

**MANUFACTURERS OF**

**Electronics, Test, Measuring, Research & College Laboratory Instruments**

Dealers in : SCIENTIFIC EQUIPMENTS

**3, Fountainhead, Opp. Sangam Press,**
**Near Karishma, Kothrud, Pune 411029.**

**✆ : 5469834**

हार्दिक शुभेच्छा

# साई फर्निचर्स

## अॅण्ड फॅब्रिकेटर्स कॉन्ट्रॅक्टर

पी.एम्.सी. कॉलनी, ७/२१५,
छत्रपती संभाजीनगर, पुणे.
फोन : ५५११८९५

प्रोप्रा. : गुलाम पठाण

***WITH BEST COMPLIMENTS FROM***

# S. P. Engineers

All types of technical educational equipments

- Maintenance Contracts
- Design & Development
- Quality Equipment
- Timely Delivery

**Plot No. 19, Survey No. 49/2,
Ganesh Colony, Kothrud, Pune 411038.
Ph. : +91-20-5283544, Cell No. : 9422089050
E-mail : prashantcc@vsnl.net**

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

# E.D.S. Technologies Pvt. Ltd.

**153, IInd Cross, Frazer Town,**

**Promenade Road, Bangalore : 560005.**

हार्दिक शुभेच्छा

## प्रतिमा एन्टरप्राइजेस्

डी-८, स्वरुप सोसायटी, एरंडवणे,
पुणे ४११००४.

## प्रतिभा ऑफसेट

८/६, कर्वेनगर, पुणे ५२.
फोन : ५४४०४३१, ५४४००६३,
४२२२२२६

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

## SAP ENGINEERS & CONSULTANTS

(Manufacturers of Educational Trainers)

Nirmitee Vihar, Flat No. 2,
S. No. 52, Plot No. 35/2,
Opp. Guruganesh Nagar,
Kothrud, Pune 411038.

Telefax : (020) 5284960
Mobile : 9422088946
Email : pravinsdeode@vsnl.net

॥ जय श्रीराम ॥

मिनल फॅब्रिकेटर्स

४५, नरवीर तानाजी वाडी,
शिवाजीनगर, पुणे - ४११००५.

घाडगे ब्रदर्स

फोन : ५५२०७१६

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

DIAMOND
BOOK
CENTRE

661, Narayan Peth,
Pune - 411030.
✆ : 4480677

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**Ratnatara Printers**

Commercial Printers

**1238, Bhawani Peth,**
**Near Palkhi Chowk, Pune - 411042.**
**☎ : 6354681, 6353364**

हार्दिक शुभेच्छा

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

उत्कृष्ट व उच्च दर्जाच्या बांधकामाकरीता
विश्वसनीय नाव

**ए. व्ही. पिसाळ ॲन्ड असोसिएट्स्**

सिव्हिल इंजीनियर्स, कन्सल्टंटस् आणि कॉन्ट्रॅक्टर्स

ऑफिस : अमरदीप ज्योती को-ऑप. हौसिंग सोसायटी,
फा. प्लॉट नं. ७०/३अ, एरंडवणे, पुणे ४११००४.
फोन : ५४५६५८२,
(मोबाईल) ९८२३१४४९३३, ९४२२००१२८९

**उल्लेखनीय प्रकल्प**

प्रो. ए. सोसायटीचे
मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनियरिंगची इमारत,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

॥ ॐ गं गणपतये नमः ॥

# MILINDA KURANKAR

## ENGINEERS & CONTRACTOR

(All types of Building, Road,
Carpentary, Interior, Plumbing works)

FLAT NO. 31, SHIV PALACE, ANAND NAGAR,
SINHAGAD ROAD,
PUNE 411051.

**With Best Compliments from :**

**IDEAL**
**PRINTERS**

*'Our Success is in Our Service'*

**COMMERCIAL
QUALITY PRINTERS**

DEEPAK MARATHE

562 / 5, SAJ CHAMBERS,
NEAR CONGRESS BHAVAN,
SHIVAJINAGAR, PUNE 411 005
TEL. / FAX : 020-553 5973
E.MAIL : deepideal@yahoo.com




गुरुवर्य ताटके यांची स्वप्नपूर्ती

मॉडर्न महाविद्यालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५

## संस्था

| | |
|---|---|
| मॉडर्न हायस्कूल, पुणे - ५. | (स्थापना १९३४) |
| प्रार्थमिक विद्या मंदिर, पुणे - ५. | (स्थापना १९३६) |
| सर ससून डेव्हिड होस्टेल (मुलांसाठी) | (स्थापना १९४०) |
| मुलींचे हायस्कूल, पुणे - ५. | (स्थापना १९४६) |
| मॉडर्न हायस्कूल, पुणे - ५३. | (स्थापना १९६७) |
| शिशु विद्या मंदिर, पुणे - ५. | (स्थापना १९६८) |
| मुलींचे होस्टेल, पुणे - ५. | (स्थापना १९६८) |
| मॉडर्न महाविद्यालय - कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखा, पुणे - ४११००५. | (स्थापना १९७०) |
| कींडरगार्डन आणि प्रायमरी इंग्लिश मिडियम स्कूल, (एन. सी. एल. कॅम्पस) | (स्थापना १९७६) |
| एन.सी. एल. प्रायमरी स्कूल, पुणे - ८ | (स्थापना १९७६) |
| एन. सी.एल. सेकंडरी स्कूल, पुणे - ८ | (स्थापना १९८१) |
| डब्ल्यू. आय. ई. बॅडमिंटन कॉम्प्लेक्स, पुणे - ५. | (स्थापना १९८२) |
| प्री - प्रायमरी इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे - ५. | (स्थापना १९८५) |
| प्रायमरी इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे - ५. | (स्थापना १९८७) |
| शिशु विद्या मंदिर, निगडी, पुणे - ४४. | (स्थापना १९८६) |
| प्रार्थमिक विद्या मंदिर, निगडी, पुणे - ४४. | (स्थापना १९८६) |
| मॉडर्न सेंटर फॅार करिअर गायडन्स, पुणे - ५. | (स्थापना १९८९) |
| शिशु व प्रार्थमिक विद्या मंदिर, पुणे - १६. | (स्थापना १९९०) |
| मॉडर्न हायस्कूल, भोसे (ता. खेड) | (स्थापना १९९१) |
| इन्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड करिअर डेव्हलपमेंट, निगडी, पुणे - ४४. | (स्थापना १९९१) |
| मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस् , सायन्स ॲन्ड कॉमर्स, पुणे - ५३. | (स्थापना १९९२) |
| मॉडर्न इंग्लिश मिडियम मिडियम स्कूल, पुणे - ५. | (स्थापना १९९३) |
| मॉडर्न हायस्कूल (इंग्लिश मिडियम), शिवाजीनगर, पुणे - ५. | (स्थापना १९९३) |
| शिशु विद्या मंदिर व पंडित जवाहरलाल नेहरू प्रार्थमिक विद्या मंदिर, वारजे, पुणे - २९. | (स्थापना १९९४) |
| प्री-प्रायमरी ॲन्ड प्रायमरी इंग्लिश मिडियम स्कूल, वारजे, पुणे - २९. | (स्थापना १९९६) |
| मॉडर्न सेंटर फॉर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च | (स्थापना १९९७) |
| मॉडर्न हायस्कूल, वारजे, पुणे - २९. | (स्थापना १९९८) |
| मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे - ४४. | (स्थापना १९९८) |
| मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग, पुणे - ५. | (स्थापना १९९९) |
| एन्. सी. एल्. कनिष्ठ महाविद्यालय (विज्ञान विद्या शाखा), पुणे - ८. | (स्थापना २०००) |
| मॉडर्न ज्युनियर कॉलेज, निगडी, पुणे - ४४. | (स्थापना २००२) |